
आम्ही

# पार्लेकर

१९११ पासून

## वार्षिक विशेषांक २०२३



# Thank you
# Vile Parle, Thank you
# Mumbai

**Atharv**

*Redefining Vile Parle*

NAREDCO™
MAHARASHTRA
PRESENTS
HOMETHON™
PROPERTY EXPO 2023




## Homethon People's Choice Winner










**+91 77388 66111**

**sales@atharvlifestyle.com | www.atharvlifestyle.com**

आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वार्षिक विशेषांक २०२२
वर्ष ३१ वे

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
तानिया गायकवाड

विशेष सहाय्य
अशोक बेंडखळे
प्रा. वसंत सोनावणे
प्रज्ञा काणे

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे

मुखपृष्ठ
एम. रमन. पी. चारी

जाहिरात व्यवस्थापन
भावेश शिंदे

निर्मिती
अनिता चांदेकर

कार्यालय
१, अल्फा, महात्मा गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ५७.
दूरध्वनी : ०२२-२६१२२४७५
ई- मेल : editorial@parlekar.com
वेबसाईट: www.parlekar.com
www.facebook.com/AamhiParlekar
aamhiparlekarblog.wordpress.com

ही पत्रिका श्री. ज्ञानेश चांदेकर यांनी संकेत प्रकाशनसाठी सी.सी. प्रिंटर्स, ३०, कामदार शॉपिंग सेंटर, मोंगीबाई रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७ येथे प्रकाशित केली.

अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



एम. रमन. पी. चारी यांचा जन्म १९५८ मध्ये आंध्र प्रदेशात झाला. सध्या ते विलेपार्ले येथील सुकुमार सोसायटी येथे राहतात. १९८५ मध्ये जे.जे स्कूल ऑफ आर्ट्स मधून त्यांनी कला शिक्षणात पदवी प्राप्त केली व १९८७ मध्ये कला शिक्षक म्हणून रुजू झाले. त्याचबरोबर जीएमईएस हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेजमध्ये तत्त्व म्हणून कार्यरत होते. एवढचं नाही तर रोटरी मुंबई पार्लेश्वरच्या इंटरॅक्ट क्लबचे समन्वयक, आणि राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्स (NCC) Mah बटालियनशी देखील ते संबंधित आहेत.

सध्या मुंबईतील कलाध्यापक संस्थेचे मानद खजिनदार म्हणून ते आपले योगदान देत आहेत. त्यांनी ऊप G.M.E.S. हायस्कूलमध्ये आर्ट क्लब स्थापन केला आहे. या क्लबद्वारे ते विद्यार्थ्यांना चित्रकला, फ्लॉवर अरेंजमेंट, शिल्पकला, ओरिगामी, मेहंदी आणि इतर अनेक कलांसाठी प्रोत्साहन देतात.


त्यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी अनेक ‘कला कार्यशाळा’ घेतल्या आहेत. तसेच त्यांना कला क्षेत्रातील विविध पुरस्कार देखील मिळाले आहेत. त्यांच्या कलाकृती भारतातील नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट म्युझियम आणि परदेशातील अनेक खाजगी संग्रहांमध्ये संग्रहित केल्या आहेत.

चित्रकलेतील निपुणतेबद्दल त्यांची लंडन येथील बीबीसी चॅनलने मुलाखत घेतली होती. त्यांनी गेल्या ३९ वर्षांपासून जहांगीर आर्ट गॅलरी, नेहरू सेंटर आर्ट गॅलरी येथे आपल्या कलाविष्काराची समूह प्रदर्शने भरवली आहेत.

ईमेल - ramanchary@yahoo.in

मोबाईल - ९८६७० ३५३९०

# चित्राविषयी थोडेसे



प्रत्येक चित्रामागे निश्चित असा काही अर्थ दडलेला असतोच असं नाही. अनेक वेळा तो नसतोच . आपण मात्र त्याचा शोध घेत रहातो आणि शोध लागला नाही की आपापले तर्क लावत राहतो. ते कधी बरोबर असतात किंवा कधी चुकीचेही. तर्क चुकीचे असले तरीसुद्धा ते अपूर्ण नसतात. ते नेहमीच पूर्ण असतात. अगदी मुखपृष्ठावरील चित्रासारखे !

हे चित्र मुक्त आहे. त्याला तसा ठराविक, चौकटीबद्ध अर्थ नाही. आपण असे म्हणू शकतो की ते आकाराच्या शोधात वाऱ्यासोबत प्रवास करणाऱ्या निळ्याशार आभाळासारखे आहे किंवा असेही म्हणू शकतो की स्वर्गातून जमिनीवर ओघळून नवीन आकार घेऊ पाहणाऱ्या दवबिंदू सारखं आहे.

या चित्राच्या पद्धतीला Abstract (अमूर्त ) असं म्हणतात. हे चित्र आपल्याला वास्तविकतेपासून आभासापर्यंत घेऊन जातं. या चित्राला कोणत्याही तर्काची आवश्यकता नाही. त्या अर्थाने हे चित्र अमर्याद, उघड, अस्पर्श, शुद्ध आणि पूर्ण सुद्धा आहे.



# संपादकीय...

प्रिय वाचकहो,

'आम्ही पार्लेकर'चा २०२३ चा वार्षिक अंक आपल्या हाती देताना आम्हा सर्वांना विशेष आनंद होत आहे व आम्ही आपल्या प्रतिक्रियांची उत्सुकतेने वाट पहात आहोत.

काही दशकांपूर्वी पार्ल्याच्या चेहरा हा मुख्यत्वेकरून मराठी मध्यमवर्गीय असा होता पण मधल्या काळात पार्ल्यात अनेक बदल झाले. पुनर्विकासाच्या प्रक्रियेने वेग घेतला. मराठी जनांचे तर पार्ले हे 'ड्रीम डेस्टिनेशन' होतेच पण त्याच बरोबर नव्याने उपलब्ध झालेल्या महागड्या फ्लॅट्समध्ये अनेक बिगर मराठी कुटुंबे सुद्धा आली. हळूहळू पार्ल्याच्या बाजार सुद्धा फुलायला लागला, वेगवेगळ्या दुकानांनी सजला. पूर्वी पार्ल्यात मोजकीच रेस्टॉरंट्स होती पण आज वेगवेगळ्या थिम्सवर आधारीत असंख्य रेस्टॉरंट्स उघडली आहेत. जवळपास सर्वच महत्वाच्या बँकांच्या सुमारे ४० च्या वर शाखा आज पार्ल्यात कार्यरत आहेत. थोडक्यात म्हणजे एके काळी पुण्याचे जुळे भावंडं वाटणारे, संथ गतीने चालणारे आपले पार्ले आज मुंबईचे एक vibrant उपनगर बनले आहे. ह्या सर्व बदलांचा वेध घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न 'आम्ही पार्लेकर' नेहमीच करत असते. आमची मुळी टॅगलाईन च आहे,'प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे' !

'वर्षातून एकदा मोठा अंक काढायचा पण तो दिवाळी अंकांच्या भाऊगर्दीत नव्हे तर आपले वेगळेपण जपत, वर्षअखेरीस 'वार्षिक अंक' म्हणून काढायचा' ह्या विचाराने अनेक वर्षांपूर्वी वार्षिक अंक प्रकाशित करण्याची प्रथा सुरु झाली व ती आजही सुरु आहे. जानेवारी ते नोव्हेंबर हे ११ अंक बहुतांशी पार्ल्याशी निगडीत असणाऱ्या बातम्या, घडामोडी, कार्यक्रम, उपक्रम ह्यांना वाहिलेले असतात पण वार्षिक अंक हा फक्त पार्लेकरांच्याच नव्हे तर समस्त मराठी माणसांच्या भावविश्वाशी संवाद साधणारा, नाते जोडणारा असावा ह्या विचाराने आम्ही पार्ल्याशी संबंधित नसलेल्या अनेक विषयांचा ह्या विशेषांकात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करतो, ह्याही अंकात केला आहे.

आता थोडे ह्या अंकातील विषयांबद्दल. मराठी मनावर गारुड घालणाऱ्या, आपल्या क्षेत्रात विशेष कर्तृत्व गाजवणाऱ्या व्यक्तींशी, कलावंतांशी, व्यावसायिकांशी मनमोकळ्या गप्पा, २०२३ चे न्यूजमेकर्स, ISRO च्या आगामी अंतरिक्ष योजना, पाकिस्तानचे खडतर भवितव्य, गुदगुल्या करणारी व्यंगचित्रमालिका, पार्ल्यातील कवींच्या वैशिष्ठ्यपूर्ण रचना, अश्या अनेक वाचनीय सदरांनी खच्चून भरलेला हा 'आम्ही पार्लेकर'चा वार्षिक विशेषांक आपल्या पसंतीस उतरेल ह्याची खात्री वाटते.

आपणास माहित आहेच कि १९९१ साली सुरु झालेले हे मुंबईचे पहिले वाहिले उपनगरीय वार्तापत्र २०२० च्या मार्च पर्यंत छापील स्वरूपात प्रकाशित होत होते व पार्ल्याच्या घराघरात पोहोचत होते. त्यानंतर मात्र कोव्हीड च्या महामारीमुळे सर्वच व्यवहार काही काळापुरते ठप्प झाले होते व आपल्याला स्वतःच्याच घरी कैद व्हावे लागले होते. त्या वेळी आमच्या सारख्या काही प्रकाशनांनी 'डिजिटल फॉरमॅट'चा आसरा घेतला व वाचकांशी संवाद सुरु ठेवला. आज जवळ जवळ चार वर्षांनी कोव्हीड चा जरी नायनाट झाला असला तरी लोकांची संगणकावर किंवा मोबाईल वर वाचायची सवय तशीच आहे किंबहुना ह्याच गोष्टीला ते जास्त सरावले आहेत. छापील वर्तमानपत्रांची मागणी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे, अनेक मासिके बंद करायची वेळ प्रकाशकांवर आली आहे. ह्या परिस्थितीत हळूहळू अस्तंगत होणाऱ्या छपाईच्या व्यवसायापाठी धावण्यापेक्षा लोकांच्या पसंतीस उतरलेल्या, जगभरात पोहोचू शकणाऱ्या, अत्यंत सोप्या पद्धतीने, शून्य मिनिटात जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचणाऱ्या व अनेक संधींची दारे ठोठावणाऱ्या डिजिटल माध्यमालाच आम्ही पसंती दिली आहे. येणाऱ्या काळात जगण्याच्या प्रत्येक क्षेत्रात Digitalization वाढतच जाणार आहे व आपल्याला ह्या नवीन प्रणालीशी, नव्हे जीवनशैलीशी मैत्री करावीच लागणार आहे, होय ना ?

सर्व वाचकांना नूतन वर्षाच्या अनेक शुभेच्छा !

आपला,
**ज्ञानेश चांदेकर**

एअरफेअर्स हॉटेल्स ट्रान्सपोर्ट... सगळंच वाढलंय, पर्यटनही महाग झालंय तरीही

# वीणा वर्ल्डने केलंय वर्ल्ड अफोर्डेबल!

## तुमची जगप्रवासाची वा पर्यटनाची इच्छा अपुरी राहू नये हीच आमची इच्छा!

## फक्त दोन लाखात
अमेरिका/ऑस्ट्रेलिया/युरोप

## फक्त दीड लाखात
युरोप/जपान/कोरिया

## फक्त एक लाखात
व्हिएतनाम/दुबई/बाली/हाँगकाँग

## फक्त पन्नास हजारात
थायलंड/श्रीलंका/नेपाळ

## आणि फक्त तीस हजारात शिमला मनाली



एअरफेअर, हॉटेल स्टे, ट्रान्सपोर्ट स्थलदर्शन, व्हिसा फी* ब्रेकफास्ट लंच डिनर ट्रॅव्हल इन्शुरन्स* ड्रायव्हर गाईड टिप्ससह ऑल इन्क्लुसिव्ह टूर्स

नो डिस्काउंट्स नो हिडन कॉस्ट नो ऑप्शनल्स, नो गिमिक्स डॉलर, युरो वाढताहेत! काळजी नसावी! संपूर्ण टूर प्राईस भारतीय रुपयांत भरा

एकटे या किंवा फॅमिली फ्रेन्ड्स ग्रुपसह देशात किंवा परदेशात बिनधास्त चला! टूरवर तुमच्या दिमतीला आहेत वीणा वर्ल्ड टूर मॅनेजर



डायरेक्ट जॉइनिंग लीव्हिंग Ex-Destination टूर प्राईस उपलब्ध

Travel Now Pay Later
No Cost EMI
Only Processing Fee
by SanKash
T&C Apply

परदेश प्रवासासाठी फॉरेन एक्सचेंज वीणा वर्ल्ड फॉरेक्स

## चलो, बॅग भरो, निकल पडो! वीणा वर्ल्डसोबत!

त्वरीत बुकींग करा. वरील सहली मर्यादित असून त्यातील सीट्सही मर्यादित आहेत, त्यामुळे शुभस्य शिघ्रम!

मैं हूँ ना!

| अमेरिका(USA) | ऑस्ट्रेलिया | युरोप | युरोप | जपान | कोरिया | हाँगकाँग | व्हिएतनाम | बाली | दुबई | थायलंड | श्रीलंका | नेपाळ | शिमला मनाली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 200000 | 200000 | 200000 | 150000 | 150000 | 150000 | 100000 | 100000 | 100000 | 100000 | 50000 | 50000 | 50000 | 30000 |
| 6D-Feb 8-ईस्ट कोस्ट | 6 Days-Feb 29 | 9D-8 देश-Feb 9 | 6D-5 देश-Feb 20 | 5 Days - Feb 6 | 5 Days - Mar 7 | 5 Days - Jan 30 | 5 Days - Mar 26 | 5 Days - Feb 8 | 5 Days - Mar 14 | 4 Days - Mar 13 | 5 Days - Mar 20 | 5 Days - Feb 21 | 6 Days |
| US व्हिसा* | EMI ₹ 11133/- | EMI ₹ 11133/- | EMI ₹ 8412/- | EMI ₹ 8412/- | EMI ₹ 8412/- | EMI ₹ 5631/- | EMI ₹ 5631/- | EMI ₹ 5631/- | EMI ₹ 5631/- | EMI ₹ 2938/- | EMI ₹ 2938/- | EMI ₹ 2938/- | EMI ₹ 1860/- |

### वीणा वर्ल्डच्या ऑल इन्क्लुसिव्ह ग्रुप टूर्समधून तुमच्या आवडीची टूर निवडा. देशविदेशातील आणखी टूर्स व टूर्सची संपूर्ण माहिती veenaworld.com वर उपलब्ध

**साऊथ ईस्ट आणि फार ईस्ट एशिया**

सिंगापूर थायलंड मलेशिया (10 Days) 160000-166000
सिंगापूर मलेशिया विथ बाली (10D) 185000-190000
सिंगापूर मलेशिया विथ क्रूझ (9D) 175000 - 180000
सिंगापूर बाली (8 Days) 163000 - 167000
सिंगापूर मलेशिया (7 Days) 138000 - 145000
सिंगापूर फुकेत क्राबी (7 Days) 155000 - 160000
व्हिएतनाम कंबोडिया (10 Days) 175000 - 180000
व्हिएतनाम बाली (11 Days) 213000 - 218000
बेस्ट ऑफ व्हिएतनाम (8 Days) 130000 - 135000
बेस्ट ऑफ बाली (7 Days) 128000 - 135000
सिंगापूर /थायलंड (4D/6D) 75000 - 105000
बँकॉक पट्टाया फुकेत क्राबी (8D) 115000 - 125000
हाँगकाँग मकाव शेंझेन (7 Days) 155000 - 160000
जपान (7D/13D) 220000 - 365000
जपान विथ फुजाया हाक्कोने (9D) Feb 29 -255000
जपान विथ अल्पाइन रुट (10D) 300000 - 305000
जपान कोरीया (9 Days) 310000 - 315000
जपान कोरीया तैवान (12 Days) 330000 - 335000

**अंटार्क्टिका-ऑस्ट्रेलिया-आफ्रिका-अमेरिका**

अंटार्क्टिका (14D/17D) Feb 25 /Feb 14 - Sold Out
साऊथ अमेरिका – ब्राझिल अर्जेंटिना उरुग्वे पेरू चिले बोलिव्हिया (21 Days) Mar 11 - 1250000
ब्राझिल अर्जेंटिना पेरू बोलिव्हिया उरुग्वे (15D) Mar 6-975000
ब्राझिल अर्जेंटिना उरुग्वे (10D) Mar 13 - 775000
ऑस्ट्रेलिया (9D/14D) 310000 - 445000
न्यूझीलंड (10D/14D) 333000 - 420000
ऑस्ट्रेलिया न्यूझीलंड (17D) 515000 - 535000
अमेरिकन ड्रीम विथ बहामास क्रूझ (19D)625000-630000
अमेरिका (13D/15D) 465000 - 505000
युएस ईस्ट कोस्ट (7D) 250000 - 260000
बेस्ट ऑफ केनिया (7D) 205000 - 210000
बेस्ट ऑफ साउथ आफ्रिका (9D) 205000 - 215000
बेस्ट ऑफ मॉरिशस (7D) 125000 - 150000
साऊथ आफ्रिका मॉरिशस (14D) Mar 4-250000-260000
बेस्ट ऑफ दुबई अबुधाबी (7D) 128000 - 150000
बेस्ट ऑफ ओमान (7D) Feb 7- 135000
नेपाळ/भूतान/श्रीलंका(8D/9D/7D)69000-105000

**युरोप - वेस्टर्न, ईस्टर्न, नॉर्दन, मेडिटरेनीयन युरोप - 50 ग्रुप टूर ऑप्शन्स**

युरोपियन एक्सप्लोरर (27D) 500000 - 525000
युरोपियन ड्रीम (23D) 450000 - 475000
युरोपियन मॅजिक (19D) 400000 - 425000
युरोपियन मार्व्हल्स (17D) 375000 - 395000
युरोपियन ज्वेल्स+व्हर्साय/किनेरेल्स(15D)350000-370000
युरोपियन वंडर्स (13D) 275000 - 290000
युरोपियन हायलाइट्स (12D) 275000 - 290000
युरोपियन स्प्लेंडर्स (10D) 225000 - 235000
युरोपियन पॅनोरमा (8D) 200000 - 210000
लंडन पॅरिस स्विस इटली (9D) 250000 - 260000
बेस्ट ऑफ स्कॅन्डिनेव्हिया (9D) 295000 - 305000
आईसलँड स्कॅन्डिनेव्हिया नॉर्दन लाइट्स(14D)460000-470000
आईसलँड स्कॅन्डिनेव्हिया मिडनाइट सन (14D) 450000-470000
आईसलँड स्कॅन्डिनेव्हिया (14D) 450000 - 470000
स्कॅन्डिनेव्हिया नॉर्दन लाइट्स (9D)350000-360000
स्कॅन्डिनेव्हिया मिडनाइट सन (16D) 450000 - 470000
स्कॅन्डिनेव्हिया + ईस्टर्न युरोप (23D) 500000 - 525000
ऑल ईस्टर्न युरोप (8D/11D/15D) 200000 - 320000
स्विस पॅरिस लंडन (11 Days) 300000 - 310000
इंग्लंड स्कॉटलंड आयर्लंड वेल्स लंडन (13D) 335000 - 350000
इंग्लंड स्कॉटलंड ॲमस्टरडॅम ब्रसेल्स (10D) 275000 - 285000
स्विस पॅरिस/स्विस इटली/स्विस ऑस्ट्रिया (8D) 225000 - 235000
स्विस पॅरिस इटली/स्विस ऑस्ट्रिया इटली/स्विस पॅरिस ऑस्ट्रिया (11D) 275000 - 285000
ॲमस्टरडॅम ब्रसेल्स क्रूझ (7D) 200000 - 210000
इटली/स्वित्झर्लंड/ऑस्ट्रिया (8D) 225000-260000
स्पेन पोर्तुगाल (12D) 250000 - 265000
स्पेन पोर्तुगाल मोरोक्को (15D) 300000 - 320000
इजिप्त ग्रीस टर्की (15D) 335000 - 355000
ग्रीस टर्की (12D) 295000 - 310000
ग्रीस (8D/10D) 200000 - 265000
इजिप्त/स्पेन/टर्की (9D/11D) 175000 - 215000
इजिप्त जॉर्डन (9 Days) 195000 - 205000
बाकू (7D/5D) 95000 - 125000

**ग्रुप टूर्स - इंडिया**

राजस्थान (5D/6D/8D/9D/15 Days) 30K-85K
गुजरात (5D/7D/10D/15Days) 30000-99000
कर्नाटक कुर्ग/दांडेली/हम्पी (6D/8D/9D) 40K - 65K
कन्याकुमारी तामिळनाडू (12D) 79000 - 85000
वायनाड,ऊटी,आलप्पुझा, थेक्कडी, कोचीन (7D) 40K-45K
हैदराबाद श्रीशैलम रामोजी सिटी (6D) 45K-50K
पॉंडिचेरी महाबलीपुरम (5D) 40000 - 45000
केरळ (6D/8D/10D/15 Days) 35000 - 99000
बेस्ट ऑफ अंदमान (7D) 75000 - 87000
मध्यप्रदेश (5D/9D/13D/17D) 30000 - 95000
सिक्कीम दार्जिलिंग गंगटोक (7D/9D पेलिंग) 59K-80K
काश्मीर (6D/8D) 55000 - 80000
डलहौसी धर्मशाला अमृतसर (8D) (ex-Amritsar) 39000 - 42000
वाराणसी अयोध्या लखनऊ (8D) 45000 - 55000
नैनिताल मसुरी हरिद्वार (6Days/9Days कॉर्बेट) 35000 - 60000

ख्रिसमस-न्यू इयर देशविदेशातील सहली हाऊसफुल्ल होत आहेत
Book Now!

ग्रुप टूर्सच्या सहलखर्चात विमानप्रवास, ट्रान्सपोर्ट, हॉटेल वास्तव्य, ब्रेकफास्ट-लंच-डिनर, एन्ट्री फी सह स्थलदर्शन, ड्रायव्हर-गाईड टिप्स, ट्रॅव्हल इन्शुरन्स*, टूर मॅनेजर सर्व्हिसेस, व्हिसा फी (USA आणि 'फ्री व्हिसा देश' व्यतिरिक्त), आदि गोष्टींचा समावेश आहे. EMI (24 months) subject to financial partner's approval.

**veenaworld.com • Call: 1800 22 7979 • Mon-Sat 10 to 7 • travel@veenaworld.com**

**Vile Parle: Sun-Vision Classic, Hanuman Road, Vile Parle (E), Mumbai 400057. Call: 887 997 2213**

VEENA WORLD
Travel. Explore. Celebrate Life.

All group tours are ex-Mumbai. Tour and Customized Holiday price is per person on twin sharing basis. Customized Holidays include accommodation, meals, sightseeing, and transfers as per the itinerary. These tour prices are nett and no discount is applicable. At the time of booking, tour price to be paid in full INR by UPI/NEFT/RTGS/Cheque, in the name of 'Veena Patil Hospitality Pvt. Ltd.' No cash transactions at Veena World. Government taxes apply. Any increase in YQ taxes, airport taxes, VISA fees, surcharges (if any) will have to be borne by the travellers. T&C apply.

# अनुक्रम


स्वर माझे सांगाती पंडित अजय पोहनकर.. ........ ७
अनुश्री क्षीरसागर

लय विलय कविता ........ ११
माधवी कुंटे

सविता प्रभुणे एक समृध्द अभिनेत्री ........ १२
डॉ. मृण्मयी भजक

चव म्हटलं कि चितळे !! ........ १७
संगीता बेहेरे

विझले भान कविता ........ १९
-अशोक बेंडखळे

नव्या क्षितिजांच्या शोधात डॉ.आसावरी बापट ........ २०
अमेया जाधव

बाहुली कविता ........ २३
अल्पना कशाळकर

'वजनदार' साथीचे तबला वादक
एस. व्ही. पटवर्धन ........ २४
भरत चंद्रकांत कामत

न्युज मेकर्स २०२३ ........ २७
प्रेरणा देवस्थळी

कार्लोस अल्कराज ........ २८

मोहम्मद शमी ........ २९

प्रज्ञानंद रमेशबाबू ........ ३०
संकलन - प्रज्ञा काणे

हम....... है तो क्या हुआ दिल वाले है! ........ ३१
मुक्ता चैतन्य

इसरो : आकांक्षा पुढती जेथे अवकाश ठेंगणे! ........ ३३
अंबरीश पवार

पाकिस्तान : आराजकाकडून विभाजनाकडे ........ ३६
संजय देवस्थळी

अद्वैत कविता ........ ४०
चारुलता काळे

मादागास्कर - बुचकळ्यात टाकणारा देश ........ ४३
सतिश जोशी

रवी महाजन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स-
बदलत्या नाशिकची नव्याने ........ ४६
मांडणी करणारं नाव

सकल जनांचा आधारू! ........ ४७
सुधीर सुखठणकर

ज्येष्ठ कविता ........ ४९
सदानंद डबीर

व्यंगचित्रे
अशी ही फेकाफेकी ........ ५०
श्रीनिवास प्रभुदेसाई

अनुत्तरीत प्रश्न
लता गुठे
कविता ........ ५४
चिमण्या
सविता दामले

वाहत्या नदीच्या काठी
रमेश नागेश सावंत कविता ........ ५५
अर्थ काढणे म्हणजे पाप...
विजयराज बोधनकर

'लोकांना चित्रपट आपला वाटायला हवा'
क्षिती जोग ........ ५६
गणेश आचवल



# स्वर माझे सांगाती

## पंडित अजय पोहनकर..

पंडित अजय पोहनकर आजवर देशातील मोठ्या समारोहांतून गायले आहेतच. परदेशांतूनही दक्षिण आफ्रिकेतील बॅक्स्टर कॉन्सर्ट हॉल, केंब्रिज युनिव्हर्सिटी ऑडिटोरियम, हार्वर्ड बोस्टन, दुबई येथील राजदूतावास अशा अनेक नामांकित समारोहातून सन्माननीय उपस्थिती लावली आहे. संगीत क्षेत्रातले संगीत प्रवीर, सूरमणि, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार, माणिक रत्न पुरस्कार, तानसेन सन्मान, श्रीमती वत्सलाबाई भीमसेन पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, नारायण सन्मान, बसवराजगुरु सन्मान, संगीतरत्न पुरस्कार असे महत्वाचे सन्मान प्राप्त केले आहेत.



अनुश्री क्षीरसागर

पंडित अजय पोहनकर यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९४७ रोजी मध्य प्रदेशातील जबलपूर येथे सुशिक्षित, सुसंपन्न कुटुंबात झाला. आई डॉ. सुशीला पोहनकर डबल एम. ए संगीत विषयातील डॉक्टरेट पदवी प्राप्त. किराणा घराण्याच्या शास्त्रीय संगीत गायिका आणि संगीतज्ञ. त्यांनी स्वतः अनेक बंदिशी बांधल्या आहेत. 'स्वरमोही' हा त्यांनी बांधलेल्या दुर्मिळ बंदीशींचा संग्रह आहे. त्या मुळच्या नागपूरच्या आहेत आणि त्यांचे वडील किराणा घराण्याचे उत्तम हार्मोनियम वादक होते. पंडित पोहनकर यांचे वडील श्री जनार्दन शंकर पोहनकर व्यवसायाने ऍडव्होकेट होते तरी त्यांचा गाण्याकडेही ओढा होता. लखनौ येथील मॉरिस कॉलेजात अण्णासाहेब रातंजणकर यांच्याकडे पं.के.जी. गिंडे, पं. व्ही.जी.जोग, पं.दिनकर कैकिणी असे दिग्गज शिष्य शिकत असत. त्यांच्याबरोबर जनार्दन पोहनकर देखील शिकत असत.

पंडितजींच्या जबलपूर येथील बंगल्यावर हिंदुस्तानातील पं. जितेंद्र अभिषेकी, आमिर खां साहेब, पंडित भीमसेन जोशी, पंडित वसंतराव देशपांडे, अभिनेता गोविंदा यांच्या मातोश्री गिरीजा देवी अशी सगळी कलाकार मंडळी उतरत असत. पत्ता वगैरे ठाऊक नसे. 'पोहनकर साब के घर जाना है' असं टांगेवाल्याला सांगितलं की पाहुणे सुखरूप घरी पोहोचत. घरातील स्वयंपाकी,खानसामा त्याला सांगून ठेवलं होतं की कुठल्याही कलाकाराने अगदी रात्री एक वाजता ही जेवायला मागितलं तरी त्याला वाढायचं कारण बऱ्याच जणांचा रियाज रात्री एक वाजता संपत असे. कित्येकदा सगळे मिळुन स्वयंपाक करून डबे घेऊन एकत्र सहलीला जात. मी मोठा कलाकार वगैरे विसरलं जात असे. हीच गोष्ट साहित्यिकांची. सगळे उत्तम साहित्यिक घरी उतरत. असं घरात कायम संगीतमय सांस्कृतिक वातावरण होतं.

वयाच्या पाचव्या वर्षी पंडित अजय पोहनकर यांनी आपल्या मातोश्रींकडून किराणा घराण्याचं रीतसर शिक्षण घेण्यास सुरुवात केली. संगीताचं प्राथमिक शिक्षण त्यांना आईकडूनच मिळालं नंतर वसंतराव देशपांडे, कुमार यांच्याकडून बंदिशी घेतल्या. त्यातून रियाज,

# GOLDEN GATE TO IIT

*"Making your dreams come true since 2005"*

- **Target 2024 batch for std. X students** (ICSE, CBSE, IGCSE, SSC)
- A 2 year Online/Offline/Hybrid Group Tuition Programme from May 2022
- **Tri-pillar foundation** (Tried and tested pedagogy technique!)
  - **Sound Fundamentals**: Learn the concepts & their application
  - **Sufficient Practice**: Practice over and over till you achieve mastery
  - **Skill development**: Time & stress management, fault analysis etc.
- **Selected batch of 35** Don't feel lost in the crowd anymore!
- **Mentored 400+ students** to excel in academics since 2005
- **Single programme** for JEE (Adv. + Main), BITSAT, CET & XI, XII (HSC)
- **Guidance to choose among top-notch institutes** like IIT, NIT, IISER, BITS, DAIICT, ICT, VJTI, SPCE, SPIT, DJS, KJS & many others

## Our Top Scorers : 2020 Batch


Abhishek Mungekar
IIT Gandhinagar


Anokhi Mehta
IIT Bombay


Mihir Dharap
IIT Palakkad

## Our Top Scorers : 2019 Batch


Shreyas Nadkarni
IIT Bombay


Om Prabhu
IIT Bombay


Atharva Varde
IIT Guwahati


Omkar Nadkarni
IIT Madras

## Our Faculty


Prof. Vinayak Antarkar
B.Tech IIT Bombay

Mathematics


Prof. Manoj Karmarkar
M.Tech IIT Bombay


Prof. Indraneel Naik
M.Tech NIT Trichy

Physics



Dr. U.R. Kapadi
Ph.D. IIT Bombay


Prof. Sudhanshu Mishra
B.Tech NIT Rourkela

Chemistry

**Contact**: Mr. Prashant 7039679129/ 9004607404, Dr. Kapadi 9867244891
Prof. Karmarkar 9930198249, Prof. Antarkar 9820651068
**Address**: Golden Gate to IIT, 107/B, Hemu Arcade, Vile Parle West, Mumbai, 400056

चिंतन, मनन करून स्वतःचं गाणं विकसित करत गेले. लहानपणापासून उस्ताद आमिर खां साहेब, उस्ताद बडे गुलाम अली खां साहेब, पंडित ओंकारनाथ ठाकूर यांचा खूप प्रभाव होता. एकीकडे शालेय शिक्षणही चालू होतं. गाण्याची आवड असली तरी घरात रीतसर शिक्षणाला सुद्धा तेवढंच महत्त्व होतं. पंडित अजय पोहनकर यांची शैक्षणिक कारकीर्द दीप्तिमान् अशीच आहे. डबल एम. ए विथ डॉक्टरेट. इंग्लिश वाङ्मयात एम.ए पदवी प्राप्त, संगीत विषयात एम.ए पदवी प्राप्त सुवर्णपदकासह. तसंच गांधर्व महाविद्यालयाची ऑनररी डॉक्टरेट देखील प्राप्त केली आहे. मुंबई विद्यापीठात संगीत विषयात बराच काळ अध्यापन केलं. पुढे शास्त्रीय संगीत गायनाच्या मैफिलींच्या निमित्ताने बराच प्रवास घडू लागला त्यामुळे ते थांबवलं.



पंडित अजय पोहणकर यांची व्यावसायिक कारकीर्द वयाच्या आठव्या वर्षी सुरु झाली. शाळेतून गाण्याच्या स्पर्धांमध्ये भाग, नंबर मध्ये येणे. वगैरे त्यांच्या बाबतीत कधी घडलं नाही. त्यांची स्पर्धा कायम मोठ्या कलाकारांबरोबर राहिली. वयाच्या बाराव्या वर्षी गोपाल गायन समाज, पुणे तर्फे घेतल्या जाणाऱ्या गायन स्पर्धेत भाग घेतला. त्यांनी भाग घेतलेली ही एकमेव स्पर्धा. इतकं लहान वय असूनही परिपक्व असलेलं त्यांचं गाणं ऐकून सारी सभा चकित झाली. पुणेकरांनी त्यांना 'संगीत प्रवीर' ही उपाधी प्रदान करून त्यांचा गौरव केला.

पंडित भीमसेन जोशी यांनी १९५९ साली पोहनकरांना सवाई गंधर्व महोत्सवात गायला बोलावलं. त्यांचं गाणं झाल्यानंतर सभा इतकी स्तब्ध झाली की पुढचा अर्धा तास कोणीच गायलं नाही. पंडित भीमसेन जोशी यांनी नंतर त्यावेळच्या प्रथेनुसार कौतुकाने संपूर्ण मांडवात फिरवलं. वयाने लहान असले तरी लहान मुलगा म्हणून नव्हे तर प्राप्त केलेल्या कलेचा एक कलाकार म्हणून पंडित भीमसेन यांनी आदर केला.

त्यानंतर कलकत्ता कॉन्फरन्सला उस्ताद आमिर खां साहेबांनी बोलावलं. त्यात गाणारे बडे गुलाम अली खां साहेब, पंडित रविशंकर, विलायत खां, गंगुबाई हंगल, डॉ. प्रभाताई अत्रे, हिराबाई बडोदेकर, हाफिज अली, सलामत-नजाकत खां साहेब, केसरबाई असे दिग्गज होते. सगळी बडी नावं. बारा दिवस समारोह चालत असे आणि तेरावे दिवशी जे कार्यक्रम अप्रतिम होत त्यांना पुन्हा आपली कला सादर करण्यासाठी पाचारण केलं जाई. त्या फेस्टिव्हलला पंडितजींचं गाणं अप्रतिम झालं. पंडितजींना तेराव्या दिवशी कला सादर करण्यासाठी पुन्हा बोलावलं गेलं. हा मोठा बहुमान होता. लहान वयात 'उस्ताद' ही उपाधी मिळाली. त्यावेळी रेकॉर्डिंग ची सोय नव्हती. त्यामुळे हळहळ वाटते. पण त्या वेळेची वर्तमानपत्रांची कात्रण जपून ठेवली आहेत.

लहानपणीची सवाई ची एक गंमत पंडित अजय पोहनकर सांगतात. 'सवाईत गाण्यासाठी 'गानहिरा' हिराबाई बडोदेकर यांच्या घरी उतरत असत. हिराबाईंच्या घरी देव्हाऱ्यात साईबाबांची मूर्ती होती. पंडितजी साईबाबांना सांगत साईबाबा माझं गाणं नीट होऊ दे, नाहीतर आई मला घरात घेणार नाही.' ही हिराबाईंनी सांगितलेली गंमत. कारण पंडितजी तेव्हा खूप लहान होते आणि आईने सांगितलं होतं की' you have to conquer.. नुसतं चांगलं गायचं नाही. सर्वोत्तम तेच दिलं गेलं पाहिजे !'

पंडित अजय पोहनकर आजवर देशातील मोठ्या समारोहांतून गायले आहेतच. परदेशांतूनही दक्षिण आफ्रिकेतील बॅक्स्टर कॉन्सर्ट हॉल, केंब्रिज युनिव्हर्सिटी ऑडिटोरियम, हार्वर्ड बोस्टन, दुबई येथील राजदूतावास अशा अनेक नामांकित समारोहातून सन्माननीय उपस्थिती लावली आहे. संगीत क्षेत्रातले संगीत प्रवीर, सूरमणि, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार, माणिक रत्न पुरस्कार, मध्य प्रदेश सरकार द्वारा तानसेन सन्मान, श्रीमती वत्सलाबाई भीमसेन पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, गंगुबाई हंगल यांच्या हस्ते नारायण सन्मान, बसवराजगुरु सन्मान, पंडित जसराज यांच्या नावाचा संगीतरत्न पुरस्कार असे महत्वाचे सन्मान प्राप्त केले आहेत. नुकताच ज्ञानेश्वर माऊलींच्या आळंदीत 'गुरु महाराव' पुरस्काराने त्यांचा सन्मान झाला आहे. संगीत क्षेत्रातले बाकी सारे मानसन्मान मिळाले, पण सरकारी दरबारी दखल घेतली गेली नाही. 'पद्मभूषण' पुरस्कारासाठी विचार झाला नाही, ही मनातील खंतही ते व्यक्त करतात.

'आठव्या वर्षापासून इतक्या मोठ्या कालखंडात तुम्ही इतक्या समारोहांतून गायले आहात, तुम्हाला विशेष आठवणारी, विशेष कौतुकाची मैफिल कोणती?' असं विचारल्यावर पंडितजी म्हणतात, 'प्रत्येक मैफिल मी लढाई समजतो. तुम्हाला जिंकायचं आहे. प्रत्येक कॉन्सर्ट तेवढीच जबाबदारीने गातो. कधी पैसे कमी मिळतात. पण आयोजक गाण्याचे जाणकार असतात, कलावंतांची कदर करणारे असतात. त्यांनी पैसे कमी दिले म्हणून

# अमृतधारा

हाऊसिंग कॉम्प्लेक्स

2 BHK HOMES

Member of CREDAI NASHIK METRO

**25+ अॅमेनिटीज**

## नाशिक शहरातील इंदिरानगरची नवीन ओळख



## 2 BHK HOMES

| ELEGANT+ | CLASSIC | LUXURIA |
|---|---|---|
| 40.50 L* | 43.13 L* | 50.80 L* |

*सर्व करांसहित

ही किंमत मर्यादित कालावधीसाठी

**रवि महाजन बिल्डर्स अँड डेव्हलपर्स** सादर करीत आहेत बदलत्या नाशिक शहरातील भव्य दिव्य गृहप्रकल्प '**अमृतधारा**'! 25 पेक्षा अधिक अॅमेनिटीज असणाऱ्या ह्या गृहप्रकल्पात आहेत तुमच्या मनाला भावतील व तुमच्या बजेट मध्येही बसतील अशी सुनियोजित 2 बी.एच.के. घरे. तेव्हा आजच अमृतधाराला भेट द्या आणि लगेच बुक करा तुमच्या सुखाचा पत्ता.

### सोबत आनंद देणाऱ्या 25+ अमेनिटीज

स्विमिंग पूल | क्लब हाऊस | मल्टिपर्पज कोर्ट | डिझायनर लॉबी | अॅम्पिथिएटर | नेट क्रिकेट | चिल्ड्रन्स प्ले एरिया | पार्टी लॉन | ग्रीन जिम | गेटेड कम्युनिटी | सिक्युरीटी

**साईट : सर्वे. नं. 82, राजसारथी सोसायटी जवळ, इंदिरानगर, नाशिक | 7304 7304 83**

Project approved by

SBI | HDFC HOME LOANS | ICICI Bank Home Loans | Bank of Baroda

ऑफिस : ११३ ते ११६,
द प्रेसिडेन्सी, जुना आग्रा रोड,
गडकरी चौक, कालिका
मंदिर जवळ, नाशिक - २.

P51600034501
P51600034278

RAVI MAHAJAN
BUILDERS & DEVELOPERS
सुख समृद्धीच्या चार भिंती, प्रत्येकासाठी
www.ravimahajan.com

त्यांची मैफिल चांगली करायची नाही असं होऊ शकत नाही. आपल्या तत्त्वात बसत नाही. जे द्यायचं ते शंभर टक्के.' असं म्हणून पुढे म्हणतात, 'मी माझं मोठं नशीब समजतो, अंजनीबाई मालपेकर, ज्यांना प्रत्येक कलाकार गुरुस्थानी मानतो, भीमसेनजी, वसंतराव यांनी मला लहानपणापासून गाताना ऐकलं आहे .

परदेशात वगैरे कार्यक्रम भरपूर केले आहेत. पण तिथे एक प्रोग्राम मिळाला की जाणं. पुढे प्रोग्रॅम मिळतोय का ते पाहणं. पुढचा प्रोग्रॅम मिळेपर्यंत कुणाच्यातरी घरी वाट बघत थांबणं. हे अजय पोहनकरांना स्वतःला आवडत नाही. जायचं. आपलं आपलं हॉटेलमध्ये राहायचं, प्रोग्रॅम आवरला की मायदेशी परत. असे स्वतःचा आब राखत कार्यक्रम केले. असं ते म्हणतात. २००२ साली अमेरिकेत असताना मोठा अपघात झाला पण जबरदस्त इच्छाशक्ती मुळे पाय प्लास्टर मध्ये असतानाही लागोपाठ सहा कॉन्सर्ट केल्या. साथीदारांचे पैसे चुकते केले. त्यानंतर घरी येऊन ऑपरेशन केलं. बरं नाहीये म्हणून बसलोय असं आवडतच नाही. असही ते म्हणाले. तेव्हापासून परदेशात जाणं मात्र कमी केलं. आमचे झाकीर भाई, पंडित रविशंकर जी, बिस्मिल्ला खां साहेब, पंडित किशन महाराज, अल्लारखा साहेब.. सारे जगप्रसिद्ध कलाकार. पंडित हरिप्रसाद चौरसिया.. त्यांचे फ्लूट ऐकून पुऱ्या जगात लोकांना असं वाटतं आपणही बासरी शिकावी.. वाजवावी. या साऱ्यांच्या कलेला संपूर्ण जगातून मान आहे. आपल्या साऱ्या कलाकारांनी भारतीय संगीत जगाच्या कानाकोपऱ्यात नेलं आहे. परदेशी कलाकार आपल्यापेक्षा जास्त सिन्सिअर असतात शिकायला एकदा सुरुवात केली की रस्त्यावर सुद्धा जागा मिळेल तिथे बसून रियाज करतात.'

**तुम्हाला स्वतःला गाण्यातला कुठला प्रकार जास्त आवडतो?**

असं विचारल्यावर पोहणकर म्हणतात.. 'ख्याल, ठुमरी, दादरा.. प्रत्येक प्रकार. मोठमोठ्या लोकांनी मला ख्यालिया म्हटलं आहे पण ठुमरी मला तितकीच आवडते. गाण्यातला प्रत्येक प्रांतमला प्रिय आहे. अगदी लावणीत सुद्धा मजा आहे. एवढे मोठे गायक भास्कर बुवा बखले, लावणी आवडीने गात. मी हिंदुस्थानातील प्रत्येक शहरातून खूप गायलो आहे. मला स्वतःला वैचारिक गाणं आवडतं. बे दुणे चार हे पाठांतर झालं. पण अडीच आणि दीड मिळून देखील चार होऊ शकतात. हा विचार. इसको बोलते हैं सोच !!' पोहणकर जबलपूरचे असल्याने बोलता बोलता सहज बोलण्यात हिंदी येतं. 'फक्त रियाज उपयोगाचा नाही त्याला चिंतनाची जोड हवी. ' असं ते आवर्जुन सांगतात. घराण्याची परंपरा जपावी. घराण्याच्या उत्तम गोष्टी घ्या. मी या घराण्याचा असा नुसता मोठेपणा दाखवू नका. घराणं आपल्या ठिकाणी मोठंच आहे. कलाकारांमुळे मोठं होतं ते. हे मोठेपण जपलं पाहिजे.

आजच्या गाण्याच्या क्षेत्रातील वस्तुस्थितीबद्दल प्रकट चिंतन करताना



पंडितजी म्हणतात, 'आजकाल स्वतः स्वतःची जाहिरात करायचे दिवस आले आहेत. एकमेकांशी लागेबांधे असतात. आम्ही तुम्हाला बोलावतो, तुम्ही आम्हाला बोलवा. कुणीही उठतो, स्वतःच्या नावामागे पंडित पदवी लावतो. आमच्या वेळी 'उस्ताद' म्हणत असत आणि ही पदवी स्वकर्तुत्वाने कमवावी लागे. पूर्वी ऑर्गनायझर्स गाण्याच्या क्षेत्रातले, गाणं कळणारे असत. आता सरळ व्यवहार आला आहे. पूर्वी सशक्त स्पर्धा होती. ती आम्ही अनुभवली आहे. एखाद्या मोठ्या माणसाचं गाणं एखाद्या दिवशी चांगलं झालं नाही तर म्हणत आज उसका दिन है आणि समोरचा चांगला गायला तर माझी ही जबाबदारी आहे चांगलं गायची. आकस नसावा, नम्रता असावी. गाणं आणि क्रिकेट काही बाबतीत समान आहेत. क्रिकेटमधलं ताजं उदाहरण.. विराट कोहली सारखा दिग्गज खेळाडू सुद्धा सचिन तेंडुलकर यांना गुरुस्थानी मानतो. विक्रमाची बरोबरी झाली तर झुकून मानवंदना देतो. कलाकारांवर शिक्षणाचे ही संस्कार असायलाच हवेत, त्यामुळे वैचारिक खोली वाढते. गाणं असो की कोणतीही कला, सखोल विचार करून आलं पाहिजे. बागेतील माळ्याने सुंदर सुंदर गुलाब, मोगरा अशी निवडक फुलं वेचून गुलदस्ता तयार करावा, तश्या सर्वांच्या गाण्यातल्या चांगल्या गोष्टी टिपाव्यात. पण कॉपी नसावी. मी कसा स्वतंत्र राहीन हा विचार करून स्वतःच गाणं शैलीदार करावं. त्यासाठी सर्वप्रथम दुसऱ्याचं गाणं स्वीकारण्याची, दुसऱ्याच्या गाण्याचं कौतुक करण्याची तुमची दानत हवी.'

पंडित अजय पोहणकर यांच वय आज ७७ वर्षे आहे. पण गाण्यातली कारकीर्द जवळपास ६७ वर्षांची आहे. पंडित पोहणकर आजवर तीन विद्यार्थ्यांनी शोधनिबंध लिहिले आहेत. त्यांची शिष्य परंपरा फार मोठी आहे. अनुराधा पौडवाल काही दिवस शिकल्या. नांदेड चे धनंजय जोशी, सटाण्याचे विनोद मिश्रा, नितीन शर्मा, सुरंजन खंडाळकर, कल्याण गायकवाड.. कार्तिकी गायकवाड चे वडील.. पंडितजींचे असे अनेक शिष्य आहेत. हे सगळे शास्त्रीय तसंच सुगम संगीत गाणारे ही आहेत. सगळे पंडितजींना खूप मानतात. शास्त्रीय संगीत गायक सुगम संगीताला दुय्यममानतात हे पंडितजींना पटत नाही. लताबाई, आशाताई.. अशा सुगम संगीत क्षेत्रातील गायकांनाही पंडितजी खूप मानतात.

**सर्वसाधारण पणे शास्त्रीय संगीत गायक, सुगम संगीत दुय्यम मानतात. तुम्ही आयुष्यभर शास्त्रीय संगीत शिकत आणि गात आलात, फ्युजन संगीताकडे कसे वळलात?**

पंडितजी म्हणतात, हम दिल दे चुके सनम चित्रपटासाठी 'अलबेला सजन' ही अहिर भैरव रागातील बंदिश पंडितजींनी सुचवली होती. सुप्रसिद्ध अभिनेते विक्रम गोखले यांच्यावर चित्रीत होणार होती आणि पंडितजींच्या स्वरात रेकॉर्ड होणार होती. दुसऱ्या दिवशी रेकॉर्डिंग ठरलं होतं. पण कळलं की आदल्याच दिवशी

शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे



# २०२४
# नववर्षाभिनंदन!

हे नवीन वर्ष सर्वांना
सुखसमृध्दीचे, ऐश्वर्याचे,
समाधानाचे जावो
ह्याच सदिच्छा!



**सौ. जुईली ओमकार शेंडे**
(विलेपार्ले विधानसभा समन्वयक)



येऊन सुलतान खान ही बंदिश गाऊन गेले. हा खूप मोठा मानसिक धक्का होता. त्यानंतर पंडितजी कधीही चित्रपटासाठी गायले नाहीत. त्यांच्या स्वरात ही बंदिश आली असती तर समस्त मराठी बांधवांसाठी ही निश्चितच अभिमानाची बाब होती. संगीत क्षेत्रातही राजकारण आहे, परंतु पंडितजी त्यापासून दूर राहिले आहेत. बंदिशीचा अनुभव कुटुंबीयांसाठीही क्लेशदायक होता. पुत्र अभिजीत पोहनकर म्हणाले, 'मी एक फ्युजन करतो आहे. त्यात तुम्ही गाल का ?' त्यावर पंडितजींचं म्हणणं आहे, 'Every classic music is classical for me.' पत्नी अंजलीताईंनी शब्द लिहिले, अभिजीत पोहनकर यांनी चाल बांधली, पंडितजी गायले आणि अप्रतिम असं फ्युजन 'पिया बावरी' तयार झालं. अतिशय गाजलं. देशातच नाही तर जगभरातून ऐकलं गेलं, प्रशंसलं गेलं.

किशोरीताई, भीमसेनजी, डॉक्टर वसंतराव देशपांडे, पंडित जसराज.. हे पंडितजींचे आवडते गायक. त्यांच्या अगोदरचे म्हणजे उस्ताद बडे गुलाम अली खान साहेब, आमिर खान साहेब, कुमार साहेब.. हे गाण्यातले दादा लोक. आम्ही त्यांचं सुंदर किर्तन केलं आहे.. अभ्यास केला आहे. कलाकारांची मुलं चांगलं काम करू शकतात असं पंडितजींचं मत आहे. कारण एक तर घरातच संस्कार मिळतात आणि त्यांच्यावर मोठी जबाबदारी असते आई वडिलांचं नाव राखण्याची. राहुल शर्मा, राहुल देशपांडे, अभिजीत पोहनकर, अमजद अली खान साहेबांची मुलं अमान..आयान खान, सुरेश तळवलकर यांचा मुलगा सत्यजित या मुलांवर हे सगळे संस्कार आहेत. उभरत्या तरुण कलाकारांबद्दल विचारल्यावर पंडितजी आपलं मत व्यक्त करताना म्हणतात कलाकार वयाने लहान असले तरी पंडितजींना नेहमी त्यांच्याबद्दल आदर वाटतो. तरुण कलाकारांना सल्ला देताना ते म्हणतात, ''तू त्या त्यांच्यासारखं गायलंस.. वाजवलंस.. पण त्यात तुझ स्वतःचं काय लेका ?''.. ब्लाइंड कॉपी नसावी.

पंडितजींचं स्वतःचं यूट्यूब चॅनल आहे. त्यावर टेम्पल म्युझिक, पिया बावरी, अर्बन..रागा, बिरहा.. सेपरेशन, सुरमयी, परंपरा. असे असंख्य अल्बम्स आहेत. लाखो व्ह्यूज आहेत. पंडितजी म्हणतात, संकीर्तन..टेम्पल म्युझिक.. खूप गायलो आहे, खूप गाजलं आहे. जसं गोविंद जय जय, गोपाल जय जय, राधा रमण हरी गोविंद जय जय पंडितजी स्वतः गाऊन दाखवतात. पंडितजींची मुलाखत ही नुस्ती गप्पांची होत नाही. श्रोता चांगला असेल तर गाण्याच्या प्रत्यक्षिकासह होते. त्यांची आणि गुलाम अलींची जुगलबंदी, त्यांची आणि हरिहरन यांची जुगलबंदी यूट्यूब वर जरूर ऐकण्यासारखी आहे. पाकिस्तानी गझल गायक गुलाम अली वास्तविक वयाने मोठे आहेत, पण पंडितजींचा गौरव करताना म्हणाले आहेत की 'अजय भाई उम्रमे मुझसे छोटे है पण गाण्यात मोठे आहेत.'

पंडितजींच्या मातोश्री विदुषी सुशीलाताई पोहनकर यांची शिष्य परंपरा खूप मोठी आहे. स्वतः अजयजी मातोश्रींचे शिष्य आहेत. पंडितजींचे बंधू श्री. सुधीर पोहनकर देखील आईकडून गाणं शिकले आहेत. उत्तम गातात. पण विज्ञान शाखेकडे वळले आहेत. बहिण श्रीमती स्वाती नाटेकर लंडनला असतात त्याही उत्तम गातात. तिघंही भावंडं संगीताचे गर्भसंस्कार घेऊन जन्माला आली आहेत. सुशीला बाईंचे शागीर्द म्हणजे गझल गायक जसविंदर, घनश्याम वासवानी, उर्मिला बेल्लूर, अंजली पोहनकर, डॉ. अजय पोहनकर, स्वाती नाटेकर, सुलोचना देऊलकर, उत्तरा तवसाळकर, नितीन पत्की.. पैकी आज किमान चाळीस जण हिंदुस्थानात संगीत क्षेत्रात कार्यरत आहेत.

पंडितजींच्या पत्नी अंजली देखील सुशीलाताईंच्या शिष्या. संगीत विषयात एमए केलं आहे. एकाच वर्षी पंडितजी विद्यापीठातून

# भारतीय जनता पार्टी

# विलेपार्ले कल्चरल सेंटर

PARLE **MAHOTSAV**

तर्फे

# हार्दिक शुभेच्छा



**पराग अळवणी**

(आमदार - विलेपार्ले विधानसभा)

मुख्य आयोजक - पार्ले महोत्सव

अध्यक्ष - विलेपार्ले कल्चरल सेंटर



**सौ. ज्योती अळवणी**

(माजी नगरसेविका - वॉर्ड क्र. ८५)

विलेपार्ले (पूर्व), मुंबई महानगरपालिका

सहआयोजिका - पार्ले महोत्सव

PARLE **MAHOTSAV**

www.parlemahotsav.in

**विलेपार्ले कल्चरल सेंटर, विलेपार्ले (पूर्व), मुंबई**

एमए ला पहिले आले, त्यांच्या बरोबर त्याच वर्षी अंजलीताई दुसऱ्या आल्या. त्या देखील शास्त्रीय संगीत गायिका आहेत. देशा परदेशातून दौरे केले आहेत. ठुमरी गायनात त्यांचं विशेष प्राविण्य आहे आणि या विषयावरील त्यांचा 'सफर ठुमरी गायकी का' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांचे वडील पंडित कृष्णराव मुजुमदार व्यवसायाने इंजिनियर होते. त्यांचंही कुटुंब सुसंस्कृत आणि संगीतात बुडालेलं. अंजलीताईंचं गाणं लाजवाब होतं. गाण्याच्या निमित्ताने विशेष नातं निर्माण झालं हळूहळू मैत्री आणि नंतर तिचं पर्यावसान प्रीती विवाहात झालं. पुढे सुपुत्र अभिजीत यांचं संगोपन आणि पंडितजींचे दौरे यामुळे त्या एक पाऊल मागे राहिल्या. तरीही अजूनही गाणं सुरू आहे. मोठ्या समारोहांतून गायल्या आहेत. संगीत अध्यापन करत आहेत. पंडितजींचे सुपुत्र अभिजीत पोहनकर शास्त्रीय संगीत शिकले आहेत. ते कीबोर्डवर शास्त्रीय संगीत वाजवतात. पं. भीमसेन जोशी यांनी अभिजीत लहान असताना त्यांना सल्ला दिला होता.. 'राजा, नेहमी मध्ये बसायचं साईडला बसायचं नाही'.. तो एकमेव असा वादक आहे की जो कीबोर्डवर शास्त्रीय संगीत वाजवतो, साईडला बसत नाही. फक्त वडील अजय पोहनकर यांच्याबरोबर साथीला असताना बाजूला बसतो. तो नुसती रागाची सुरावट वाजवत नाही. रागाचा भाव रागाचा फील घेऊन वाजवतो. अभिजीतने काही काळ शिवजींकडे देखील शास्त्रीय वादनाचे धडे घेतले आहेत.

पंडितजी आणि अभिजीत यांनी ऑनलाईन संगीत प्रशिक्षण प्रदान करणाऱ्या पोहनकर ऑनलाईन म्युझिक अकादमी ची गुरुकुलची स्थापना केली आहे. ज्या द्वारे सर्व वयाचे स्त्री पुरुष, विद्यार्थी शास्त्रीय संगीत, गझल्स, भजन, ठुमरी आदी आपल्या आवडीच्या संगीत प्रकारात शिक्षण घेऊ शकतील.

पंडितजींच्या सुनबाई भाग्यश्री खांडेकर पोहनकर या देखील विदुषी सुशीला ताई पोहनकर यांच्या शिष्या आहेत. त्या प्रत्यक्ष गात नाहीत. पण गाण्याचा उत्तम कान त्यांच्याकडे आहे. पंडितजी, अंजली ताई आणि अभिजीत या तिघांच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभ्या आहेत. तिघांच्या मैफिली, त्यांचे दौरे, त्यांचे आर्थिक व्यवहार वगैरे त्या स्वतः सांभाळतात. एक प्रकारे स्वीय सहायक पदच आहे. पंडितजींची नात, भाग्यश्री आणि अभिजीत यांची कन्या सारा आता दहावीत आहे. तिच्यासह घरातील सर्वांची काळजी घेण्याकरिता त्यांनी गृहिणीपद स्वीकारलं आहे.

पंडितजी आणि अंजलीताई आजही आपल्या संगीत अध्यापन आणि मैफिलींमध्ये व्यस्त आहेत.

दोघांनाही संगीतमय आणि निरोगी आयुष्यासाठी आम्ही पार्लेकर अंकातर्फे तसंच समस्त पार्लेकरांतर्फे हार्दिक शुभेच्छा

**अनुश्री क्षीरसागर**

व्यावसायिक गायिका, निवेदिका, लेखिका

९८२०५ ०९७६२

anu29467@gmail.com



# लय विलय

मी बाई म्हणून जन्माला आले
तेव्हाच आईपण ही घेऊन आले
आईपण विस्तारत वैश्विक झालं
त्यालाच बुद्धानं परम करूणा म्हटलं

काटक्या कुटक्याचं घरटं आपलं
बांधताना पिलांचं रक्षण पालन पोषण
करतांना संसाराच्या यज्ञात टाकत
गेले आहुती त्यालाच उपनिषदांनी
म्हटलं प्रकृति वादळवारे अनिष्ट
गोष्टी थोपवल्या दुष्ट बुद्धी विनाशाय
तलवारी उपसल्या शुभ आणि
शिवासाठी मी रक्तही सांडलं
पुराणांनी काली म्हणून स्तवन केलं


हे परम कारूणिका आता मोकळा
श्वास घेऊ दे आता मला आईपणातून
मोकळं होऊ दे आता मी काली नाही
आणि प्रकृती नाही माझं मी पण
विस्तारत शून्यत्वाला जाऊ दे



**माधवी कुंटे**

**परिचय:** कथा कादंबरी कविता ललित अध्यात्म अनुवाद अशा विविध प्रकारात ९८ पुस्तके प्रकाशित. १०० वे पुस्तक लवकरच.पुस्तकाना अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त.

**दिवाळी अंक २०२३:** विपुलश्री सुवासिनी श्यामसुंदर लोकसंवाद लीलायी व दर्याचा राजा मध्ये कथालेखन.






शिवसेना

समस्त पार्लेकरांना

# नववर्षाच्या

हार्दिक शुभेच्छा

**शुभेच्छुक - डॉ. दीपक रा. सावंत**

अध्यक्ष - टास्क फोर्स कुपोषण निर्मूलन, महाराष्ट्र राज्य

माजी आरोग्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

शिवसेना उपनेते

पूर्व विदर्भ संपर्क नेता



# सविता प्रभुणे
## एक समृध्द अभिनेत्री



डॉ. मृण्मयी भजक

**तुम्ही मूळच्या वाईच्या, वडील प्रख्यात डॉक्टर, अभिनय क्षेत्राकडे कशा वळलात ?**

माझं संपूर्ण बालपण वाई मध्ये गेलं. आई गृहिणी होती, वडील डॉक्टर होते. घरामध्ये शास्त्रीय संगीत, नाटक ,कला याची आवड होती. संगीत मैफिली आवर्जून पाहिल्या जायच्या. उत्तमोत्तम कार्यक्रमांना हजेरी लावली जायची. घरात त्याबद्दल चर्चा व्हायची आणि या सगळ्या कलाप्रकारांबद्दल घरात आदराने पाहिलं जायचं.

**मुंबई पुण्याच्या मानाने, वाई हे छोटं गाव. तरीही त्यावेळी वाईत इतक्या मैफिली किंवा इतके कार्यक्रम व्हायचे का?**

वाई जरी भौगोलिक दृष्ट्या छोटं असलं तरी सांस्कृतिक दृष्ट्या अतिशय समृद्ध होतं. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशींचं हे गाव! भीमसेन जोशी , कुमार गंधर्व यांच्यासारख्या दिग्गजांच्या छोटेखानी मैफिली वाईत व्हायच्या. अशा कार्यक्रमांना आई बाबा, मला आवर्जून घेऊन जात. या सगळ्यामुळे, कला क्षेत्राकडे पाहायची दृष्टी बनत गेली. कलाक्षेत्रा प्रति आदरभाव निर्माण झाला. शाळा कॉलेजमध्ये वक्तृत्व स्पर्धांमध्ये, नाटकांमध्ये मी नेहमीच भाग घेत असे. त्यासाठी घरून नेहमीच पाठिंबा असे. बाबांचे प्रोत्साहन होतेच आईचाही पाठिंबा होता. त्यामुळे विरोध असा कधीच झाला नाही. जरी घरी कुणी या क्षेत्रात नसलं तरी कलेप्रती प्रेम आणि आदरामुळे मी या क्षेत्राकडे वळले .

**व्यवसाय म्हणून निवडताना घरून पाठिंबा होता का?**

बीए झाल्यानंतर पुढे काय करायचं हा प्रश्न होता. मला सायन्स मध्ये रस नव्हता, रुची नव्हती त्यामुळे मी आर्ट्स घेतलं होतं. मग बीए झाल्यानंतर पुढे काय करायचं ? एम ए करायचं की आणखी काही ? असा प्रश्न पडला होता . मला अभिनयाची आवड होती. त्यामुळे माझ्या वडिलांनी मला विचारलं की जर तुला अभिनयात काम करायचं असेल तर त्यामध्ये रीतसर शिक्षण घेणं खूप महत्त्वाचं आहे. तो काळ होता १९८० चा . वाईला ओम पुरी शूटिंगसाठी आले होते . बाबा त्यांच्याशी बोलले. सुहास जोशींची बहीण वाईमध्ये होती, त्यांना



विचारलं. अशा पद्धतीने माझ्या वडिलांनी, नाटकाचे रीतसर प्रशिक्षण कुठे दिलं जातं याची माहिती काढली. एवढच नाही तर, त्याच्या परीक्षेचीही माहिती काढली आणि नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा माझ्या पुढच्या आयुष्यात मैलाचा दगड ठरले. त्यासाठी मी बाबांची नेहमीच ऋणी राहीन. आईनेही, एकटी मुलगी दिल्लीला जाणार याचा बाऊ केला नाही. तिनेही प्रोत्साहनच दिले. अभ्यास करून मी एन.एस.डी. ची परीक्षा दिली आणि अर्थातच परीक्षा पास झाल्यानंतर मला दिल्लीला ॲडमिशन मिळालं.

**वाईच्या कम्फर्ट झोन मधून तुम्ही एकदम दिल्लीला म्हणजे देशाच्या राजधानीत गेलात. आपल्या राज्याच्याही पलीकडे गेलात. भाषा वेगळी, तिकडची संस्कृती वेगळी, तर कसं जुळवून घेतलं ?**

नक्कीच वाई मध्ये खूप सुरक्षित वातावरण होतं. आई-बाबांना सगळे ओळखायचे वाई मध्ये त्यामुळे त्याचाही फायदा ही होतच होता. अशा अतिशय सुरक्षित वातावरणातून मी एकदम वेगळ्या वातावरणात गेले पण तिथे वेगवेगळ्या राज्यांमधून आलेली मुलं होती वेगवेगळ्या राज्यांमधून आलेले लोक होते. त्यामुळे माझ्यासारखेच अनेक लोक तिथे आले होते. पहिले तीन महिने तर अतिशय जिकरीचे गेले . मला खूप घरची आठवण यायची. तेव्हा बाबांनी सांगितलं होतं की तुला जर ते जमलं नाही झेपलं नाही तर तू कधीही कोर्स सोडून परत येऊ शकतेस . पण मला या गोष्टीची जाणीव होती की एन एस डी ची परीक्षा देणं , त्यामध्ये राज्यातून निवड होणं हे अतिशय अवघड असतं . त्यामुळे ते सोडायचं नाही हे मी ठरवलं. सुरुवातीचे काही दिवस खूपच कठीण गेले. हळूहळू मी एन.एस. डी मधे रुळत गेले .

**एन. एस. डी. चे दिवस कसे होते ?**

१९८० ते १९८३ मी एन.एस.डी मध्ये होते. मी आधीपासून नाटक करतच होते, पण एन.एस.डी मध्ये गेल्यावर माझी दृष्टी विस्तारली. व्यवस्थित रीतसर अभ्यास झाला . सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे लाईट्स, कॉस्टच्यूम, मेकअप या सगळ्या गोष्टी नाटकासाठी महत्त्वाच्या आहेत हे कळलं . आम्ही तिथे स्टुडंट्स प्रोडक्शन करायचो आणि त्यामध्ये लाईट्स असो, मेकअप असो, किंवा वेशभूषा असो या सगळ्या गोष्टी आम्ही स्वतः तिथे करत असू. अभिनयाबरोबरच या सगळ्या गोष्टी आम्ही करायचो. त्यामुळे या सगळ्या गोष्टींचं महत्त्व आणि यातलं एक प्राथमिक शिक्षण आम्हाला एन.एस.डी मध्ये मिळालं. तिसऱ्या वर्षाला स्पेशलायझेशन असतं. त्यामध्ये मी अभिनय हा विषय निवडला आणि अभिनयामध्ये पुढच्या कारकिर्दीची पायाभरणी झाली.

**एन.एस.डी.मध्ये तुमच्या बरोबर कोण कोण होतं? तुमच्या आठवणीतले मित्र मैत्रिणी आणि शिक्षकांबद्दल.**

सुष्मिता मुखर्जी ही माझी मैत्रीण होती, माझी क्लासमेट होती. वामन केंद्रे हे मला सीनियर होते. शिवदास घोडके, रत्ना पाठक ही सगळी मंडळी पण सीनियर होती. म्हणजे आम्ही एकाच वेळी एन. एस. डी त शिकत होतो . तिथे प्रख्यात शिक्षक वेगवेगळ्या भाषांमधून अनुवादित झालेली नाटकं बसवत होते. सगळी क्लासिकल नाटकं इथे करण्याची संधी मला मिळाली. वेगवेगळ्या राज्यातून अनुवादित झालेली नाटक होती. रॉबिन शर्मा, बादल सरकार यांच्याबरोबर नाटकं करायची संधी त्यावेळी मिळाली आणि प्रेक्षकही ती नाटकं बघायला यायचे त्यामुळे असं व्हायचं नाही की आमचं आम्ही काहीतरी केलंय आणि आमचं आम्हीच सादर करतोय.

दिल्लीतले प्रेक्षक लांबून लांबून तिथे एन.एस.डी ची नाटकं बघायला यायचे. तोही एक सुंदर आणि वेगळा अनुभव होता. बासी नावाचं नाटक आम्ही बसवलं होतं. त्यात तर मला आठवतंय, प्रेक्षकांच्या हातात हात घेऊन आम्ही काही संवाद म्हणत असू . खरंच मंतरलेले दिवस होते ते .

**दिल्लीतून मुंबईला आल्यावर , नाट्यसंपदा चे 'महाराणी पद्मिनी' हे पाहिलं नाटक तुम्ही केलं, ज्यात महाराणी पद्मिनी ची भूमिका तुम्ही केली.**

पुन्हा मुंबईत आल्यानंतर, मला पहिलंच नाटक मिळालं ते म्हणजे महाराणी पद्मिनी. पहिलीच भूमिका, इतकी महत्वाची आणि ऐतीहासिक मिळाली, याचा आनंद वाटला. नाट्यसंपदा या दर्जेदार संस्थेबरोबर मी जोडले गेले. महाराणी पद्मिनी या नाटकावर त्यावेळी माधव गडकरी यांनी अग्रलेख लिहिला होता. ही फार मोठी गोष्ट होती माझ्यासाठी. महाराणी पद्मिनी या कॅरेक्टर बद्दल आणि सद्य स्थितीत तशा व्यक्तिमत्वांची किती गरज आहे याबद्दल त्यांनी लिहिलं होतं. मला असं वाटतं की नवीन कलाकाराला पाय रोवण्यासाठी अशी कौतुकाची थाप खूप मोलाची ठरते. त्यानंतर कामातून काम मिळत गेलं. एक काम बघून मला दुसरं काम मिळत गेले ह्या गोष्टीचाही आनंद आहे.

**निष्पाप हे तुमचं पाहिलं व्यावसायिक नाटक.**

हो, इतकी उत्तम दर्जाची नाटकं मला सुरुवातीपासूनच मिळाली, हे भाग्यच आहे. खूप वेगवेगळ्या नाटकात त्याकाळी काम केलं. अनेक मराठी चित्रपटही केले. १९८४ ते २००९ पर्यंत मी नाटक आणि मराठी सिनेमे केले.वहिनीसाहेब , धाकटी सून ,छक्के पंजे, कुलदीपक असे अनेक चित्रपट केले. लेक चालली सासरला सारखा सिल्वर जुबिली सिनेमा मी केला. कळत नकळत हा सिनेमा तर एक माइल स्टोन आहे.

**कळत नकळत हा सिनेमा आजही सर्वांच्या लक्षात आहे,या चित्रपटाने मराठी प्रेक्षकांना भरभरून दिलंच . या चित्रपटणे तुम्हाला काय दिलं?**

स्मिता तळवलकर ही खूप माझी चांगली आणि जवळची मैत्रीण होती. त्यामुळे मैत्रिणीबरोबर काम करणं हा खूप आनंदाचा भाग होता. सगळे उत्तम सहकलाकार त्यामध्ये होते. शं. ना नवऱ्यांसारखे लेखक होते, त्यामुळे अशा चित्रपटात काम करणे हा उत्तम अनुभव होता. वेगळ्या सामाजिक विषयावरचा हा चित्रपट प्रेक्षकांनीही उचलून धरला. या चित्रपटामुळे माझ्याकडून उत्तम काम झालं , मराठी रसिकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण झालं. मला महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार देखील चित्रपटाने मिळवून दिला .

**चार दिवस प्रेमाचे या नाटकात तुम्ही वेगवेगळ्या भूमिकांमध्ये होता. नाटकही वेगळ्या धाटणीचं होतं . आज** you tube **वर हे नाटक पाहताना, तुम्हाला वेगळ्या भूमिकेमध्ये पाहताना मौज वाटते.**

चार दिवस प्रेमाचे हे नाटक माझ्याकडे आलं. सुधीर भट्टानी मला त्याचं स्क्रिप्ट पाठवलं होतं. मला ते काम खूप आवडलं, मी त्यांना विचारलं की खरंच मी हे करू शकेन असं तुम्हाला वाटतंय का ? पण सुधीर भट्ट आणि वामन केंद्रे यांच्यामुळे हा रोल मला मिळाला. त्यांच्यामध्ये नाचायचं होतं, गायचं होतं. आतापर्यंत मी गंभीर रोल करत होते. हे वेगळं काम करण्याची एक मोठी संधी मला मिळाली. या नाटकाचे हजार प्रयोग आम्ही केले आणि कायम स्मरणात राहील असं हे नाटक आहे.

**पवित्र रिश्ता, कुसुम ,कोशिश एक आशा अशा अनेक हिंदी मालिका तुम्ही केल्यात. हिंदीमध्ये गेल्यावर, हिंदी वातावरण काही वेगळं होतं का? तुम्हाला काही फरक जाणवला का?**

त्यावेळी हिंदीचं मार्केटिंग, बजेट हे सगळं मराठीपेक्षा खूप वेगळं होतं. त्याची मला तिथे गेल्यावर जाणीव झाली. कशा पद्धतीने त्या सिरीयलचं मार्केटिंग केलं जातं, प्रमोशन केलं जातं, मालिका लोकांपर्यंत पोहोचवली जाते हे कळलं. हिंदीत काम केल्यामुळे एक गोष्ट होते की चुटकीसरशी तुम्ही भारतातल्याच नव्हे तर जगातल्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचता. अर्थात जगभरात मराठी प्रेक्षकही भरपूर आहेत. त्यामुळे जगात कुठेही गेलं तरी मराठी माणसं भेटतात आणि तुम्ही मराठीत काम करता याच्याबद्दल आनंद वाटतो असेही सांगतात आणि तसंच हिंदीच देखील एक वेगळं दालन या वेगळ्या मालिकांमुळे खुले झालं, नवीन प्रेक्षक जोडला गेला आणि तोही अनुभव उत्तम होता .

**अभिनय करताना हिंदी मध्ये काही वेगळेपण तुम्हाला जाणवलं का?**

मला असं वाटतं की चांगले दिग्दर्शक मिळणं ही अतिशय चांगली गोष्ट असते, ती खूप महत्त्वाची गोष्ट असते. मी बालाजी साठी खूप काम केलं. एकता कपूर ही दिग्दर्शक होती आणि मीटिंग घेऊन ती त्या कॅरेक्टरचा आलेख खूप उत्तम पद्धतीने समजून सांगायची. सिरीयल मध्ये कॅरेक्टरचा आलेख हा नेहमी बदलत असतो आणि ते सगळं होत असताना जेव्हा तुम्हाला उत्तम दिग्दर्शक लाभतात तेव्हा त्या कॅरेक्टरला एक वजन येतं किंवा ते उत्तम पद्धतीने निभावलं जातं. तरीही सिरीयल ही दमवून टाकणारी असते कारण तुमच्या शिफ्ट्स बदलत असतात आणि त्या सिरीयलच्या मागणीप्रमाणे तुम्हाला काम करावे लागतं .

**सध्याचे प्रोजेक्ट्स काय आहेत ?**

सध्या स्वाभिमान करतीय, अनुपमा ही स्टार प्लस वर सिरीयल आहे ज्याच्यामध्ये अनुपमाची आई म्हणून मी काम करते आहे. जानेवारीपासून नवीन काम सुरू होईल. मराठी सिनेमा वडापाव हा लवकरच प्रदर्शित होणार आहे. प्रसाद ओक याचे दिग्दर्शक आहेत. प्रसाद ओक, गौरी नलावडे, अभिनय बेर्डे अशी स्टारकास्ट त्याच्यात आहे. सगळे चांगले ओळखीचे आहेत. लंडनला त्याचं शूट झालं होतं आणि तो अनुभवही खूप चांगला होता.



**कुठलाही काम स्वीकारताना तुम्ही काही चाळणी लावता का? कशी ?**

नाटकात पूर्ण स्क्रिप्ट आधी वाचायला मिळत असतं. संपूर्ण गोष्टी मध्ये किंवा संपूर्ण नाटकांमध्ये, चित्रपटांमध्ये तो पर्टिक्युलर रोल किती महत्त्वाचा आहे किंवा महत्त्वाचा आहे का हे आधी मी बघते. पहिल्यापासून उत्तम आणि महत्त्वाचे रोल्सच मी करत आल्यामुळे आजही मला महत्त्वाच्या भूमिकांसाठीच विचारलं जातं. याशिवाय दुसरी गोष्ट मी बघते की निर्माते चांगले आहेत का. कारण काही वेळा असं होतं की प्रोजेक्ट खूप चांगले असतात पण ते रेंगाळतात आणि ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे त्या प्रोजेक्टचे निर्माते चांगले आहेत का, दिग्दर्शक चांगले आहेत का आणि संपूर्ण गोष्टी मध्ये तो रोल किती महत्त्वाचा आहे

अशा काही गोष्टी मी रोल स्वीकारायच्या आधी बघते .

**तुमचे रोल हे घरगुती, समंजस स्त्री असे बऱ्याचदा असतात, तुम्ही प्रत्यक्ष आयुष्यात कशा आहात?**

हा हा. प्रत्यक्ष आयुष्यातही मी साधी आहे, घरगुती आहे म्हटलं तरी चालेल. साधी राहणी असते. काही ग्लॅमर असं नसतं आणि त्यामुळे मला प्रेशरही नसतं की लोकांसमोर अमुक पद्धतीने मला प्रेझेंट व्हायचं आहे. राहणं, वागणं, बोलणं नैसर्गिक असतं, कारण माझा तोच कल आहे. (हसत हसत )हं, आता मी किती समजूतदार आहे हे माझ्या आजूबाजूच्या लोकांना विचारायला पाहिजे. मला ना, कधी कधी असं वाटतं की मी अति समजूतदार आहे कारण मी सगळ्यांना समजून घेत असते .

**तुम्हाला कधी राग येतो का हो?**

राग.... हो काही गोष्टींचा राग येतो

बेशिस्त पणाचा राग येतो. वेळेच्या बाबतीत जर कोणी चालढकल केली तर त्या गोष्टीचा राग येतो. ज्या कामासाठी आपण इथे आलोय ते काम व्यवस्थित झालं पाहिजे असं वाटतं. जे काम ज्याला नेमून दिलेला आहे ते त्यांनी मनापासून करायला पाहिजे असेही वाटतं. एकदा काम स्वीकारल्यानंतर किरकिर करणं मला आवडत नाही. जर तुम्ही एखादं काम स्वीकारताय त्याचे तुम्हाला पैसे मिळणार आहेत, तर तुम्ही ते मन लावूनच केलं पाहिजे या मताची मी आहे . तुमच्या बेशिस्त पणामुळे इतर लोकांना त्रास होता कामा नये, असं वाटतं. हे जरी असलं तरी मी स्वतः खांद्यावर धुरा घेऊन कुणालाही शिकवायला जात नाही. माझा सुर नेहमी समजावण्याचाच असतो .

**नोकरी करणं आता स्त्रियांसाठी अगदीच सामान्य झालेलं आहे किंवा आता वेगवेगळी क्षेत्र ही मुली किंवा स्त्रिया हाताळताहेत. तुमचं क्षेत्र असं आहे की ज्याला काही ठराविक वेळा नाहीयेत किंवा कामाचं स्वरूप आहे तेही अतिशय वेगळं आहे. तर काम आणि घर हे सगळं सांभाळताना तारेवरची कसरत होते का किंवा तुम्हाला काही आव्हान वाटतात का ?**

मी जेव्हा कॉलेजमध्ये काम करत होते तेव्हाच



आईने सवय लागली होती लावली होती की घरातली काम करून मग तालमींना जायचं. त्यामुळे ही शिकवण मला खूप लहानपणापासूनच होती. हळूहळू घरातली काम आणि आपलं व्यावसायिक काम हे कसं सांभाळायचं हे मी शिकत गेले. मुलगी झाल्यानंतर मात्र नक्कीच आव्हान जाणवली आणि अक्षरशः ती तारेवरची कसरत झाली. तेव्हा एक ते दीड वर्ष मी गॅप घेतला होता. माझ्या आईची मला खूप मदत झाली आणि नेहमीच होते. तसेच घरातल्या ज्या मदतनीस असतात त्यांची मला खूप मदत झाली आणि सगळ्यांच्या सहकार्याने मी काम करत आहे. मला असं वाटतं की आपल्याला जर शांत मनानेकाम करायचं असेल तर घरच्यांचं सहकार्य आणि पाठिंबा हा नक्कीच आवश्यक आहे .

**तुमच्याकडे दोन पाळीव कुत्री आहेत. तुमच्या श्वान प्रेमाबद्दल आम्हाला जाणून घ्यायला आवडेल . पहिल्यापासूनच हे श्वान प्रेम आहे का?**

छे, मला कुत्र्यांची खूप भीती वाटायची. मला एकदा कुत्रा चावला पण होता. त्यासाठी मी इंजेक्शन्स देखील घेतली होती . त्यामुळे सगळे प्राणी लांबून बघायचे असतात त्यांना हात बित लावायचा नसतो अशीच धारणा अनेक वर्ष माझी होती पण त्यानंतर आमच्या घरात कुत्री आली आणि मग ती आमच्या कुटुंबाचाच एक भाग झाली कारण हे प्राणी आपल्यावर इतकं प्रेम करतात की भीती तर नाहीशी होतेच आणि जीवही लागतो. असं वाटतं की आपण त्यांच्यावर काहीच प्रेम करत नाही, इतकं प्रेम मुके प्राणी आपल्यावर करत असतात. आपल्या घरातली जशी लहान मुलं असतात तसेच हे कुत्रे असतात. त्यामुळे त्यांची कुठेही आबाळ होऊ नये याची नेहमीच आम्ही काळजी घेतलेली आहे. ते काही स्वतःहून आपल्याकडे आलेले नाहीयेत, आपण आपल्या हौसे खातर त्यांना घेऊन आलेलो आहोत. त्यामुळे त्यांची देखभाल व्यवस्थित होईल याची मी दक्षता घेते. माझ्या मुलीलाही खूप आवड आहे. माझी मुलगी कुत्र्यांबरोबरच वाढलेली आहे लहानपणापासून त्यामुळे तिच्यासाठी देखील ते कुटुंबाचा भागच आहेत. आता मुलगी लग्न होऊन सासरी गेली आहे तरीही तिचं कुत्र्यांकडे लक्ष असतं. माझ्या आईला कुत्री विशेष आवडत नाहीत पण तरीही त्यांचं सगळं व्यवस्थित चाललय ना त्यांच्या जेवणाच्या वेळा सांभाळल्या जात आहेत ना, त्यांना फिरायला घेऊन घेतलं जातंय ना, ह्या गोष्टीची देखील ती अगदी आवर्जून चौकशी करत असते .

**तुमच्या आवडीच्या क्षेत्रातच तुम्ही काम करताय पण तरीही त्या व्यतिरिक्त इतर तुम्हाला काय आवडतं काही छंद आहेत का?**

झाडं आणि स्वयंपाक यात मी रमते. मला झाडं लावायला आवडतात घरात जितकं शक्य आहे तितक्या कुंड्या ठेवत असते, रोप लावत असते. तसेच मला वेगवेगळ्या रेसिपीज करायला खूप आवडतात. वेगवेगळ साहित्य वाचायला आवडतं. रोजचा स्वयंपाक करायला

माझ्याकडे मदतनीस आहे, पण काही वेगळं करायचं असेल, एखादा वेगळा पदार्थ करायचा असेल तर नक्कीच तो करायला खूप आवडतो .

**तुम्ही इतकी वर्ष अभिनय क्षेत्रामध्ये काम केलेला आहे तुम्ही एनएसडी मधून प्रशिक्षण घेतलेला आहे तर इतक्या वर्षानंतर आपण दिग्दर्शनाकडे वळावं किंवा निर्मितीकडे वेळेवर असं तुम्हाला वाटलं का ?**

मला बरेच जण हा प्रश्न विचारतात. माझे घरचे देखील विचारतात. पण त्यावर माझं उत्तर असं आहे की मी जे करतीये त्यामध्ये मी आनंदी आहे. आणि निर्मिती करणं ही खूप अवघड गोष्ट आहे. त्यामध्ये चौफेरी लक्ष घालावे लागत. सगळ्यात मुख्य म्हणजे माझा तिकडे कल नाहीये, त्यामुळे मला अभिनयात काम करायला आवडेल. चांगल्या दिग्दर्शकांकडे काम करायला मला आवडेल, चांगले निर्मात्यांकडे मला काम करायला आवडत. अभिनय करत असताना मराठीत तरी तो मोकळेपणा आहे की दिग्दर्शकाला तुम्ही तुमची बाजू सांगू शकता. पण आत्ता तरी मला दिग्दर्शन किंवा निर्मितीकडे जावसं वाटत नाहीये.

**तुमचा एखादा ड्रीम रोल आहे का की मला अशी भूमिका करायला आवडेल असं वाटतं का ?**

चाकोरी बाहेरच्या एखाद्या भूमिकेसाठी विचारणा झाली तर मला आवडेल. आत्ताही मला चांगलेच रो ल्स मिळतात. पण ह्यापेक्षा काहीतरी वेगळं काहीतरी जे मी केलेलं नाहीये अशा पद्धतीचे काम करायला मला नक्कीच आवडेल .

**हल्ली दिसण्याबाबत, लूक्स बाबत सगळे खूप जागरूक असतात. अभिनय क्षेत्रात येण्यासाठी लौकिक अर्थाने सुंदर दिसणं किती महत्वाचं आहे ?**

मला अजिबात असं वाटत नाही की अभिनय क्षेत्रात येण्यासाठी शारीरिक सौंदर्य किंवा दिखाऊ सौंदर्य पाहिजे. ती भूमिका काय आहे आणि त्या भूमिकेमध्ये ते कॅरेक्टर कसं दिसलं पाहिजे हे जास्त महत्त्वाचे. तुम्ही त्या भूमिकेमध्ये चपखल बसलं पाहिजे. ते कॅरेक्टर जेव्हा उत्तम बसतं, तेव्हा तुम्ही लढाई जिंकलेली असते .

**अभिनय क्षेत्राकडे हल्ली अनेक नवीन मुलं-मुली येतात त्यांना तुम्ही काय सांगाल?**

मला वाटतं आत्ताची मुलं खूप हुशार आहेत . वेगवेगळ्या कार्यशाळा करून येतात. ते तयार असतात आणि त्यांनाही स्पर्धा ही कळून चुकलेली आहे. त्याची जाणीव त्यांना आहे . स्पर्धाही राहणारच आहे. त्यामुळे दर्जेदार कलाकार व्हायचं असेल तर चांगली काम आपण बघायला हवीत, डोळसपणे काम केलं पाहिजे आणि आपण फक्त कसे दिसतोय यापेक्षा आपल्याला ह्या क्षेत्रात महत्त्वाचं काम करायचे करिअर करायचा आहे ही गोष्ट सगळ्यांनीच लक्षात ठेवली पाहिजे .

धन्यवाद सविता ताई, तुमच्याशी गप्पा मारून खूप मजा आली. वाई पासून सुरु झालेला प्रवास! आज साता समुद्रा पलीकडे जाऊन पोहोचला आहात तुम्ही. मराठी आणि हिंदी रसिक तुमच्यावर असेच प्रेम करत राहतील. तुम्हाला नव्या भूमिकांमध्ये पाहण्याची आम्हीही वाट पाहतोय. धन्यवाद .

डॉ. मृण्मयी भजक या टी व्ही आणि स्टेज वर मराठी, हिंदी,इंग्रजी सूत्रसंचालन , व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट म्हणून कार्यरत आहेत . शासकीय कार्यक्रम , कॉर्पोरेट कार्यक्रमांचे संचालन करणे यामध्ये त्यांचा हातखंडा आहे . त्यांची दोन पुस्तकं प्रकाशित आहेत .
९४२२५३५०८४



**चित्रा वाघ**
**परिचय**

'अथांग' हा कथासंग्रह आणि 'मनोबल- तिमिरातून तेजाकडे' हे दिव्यांग मुलांच्या संघर्षाच्या कहाण्यांचे पुस्तक प्रसिद्ध.

अनेक कथा, ललित लेख तसेच साहित्य व चित्रपटांवरील रसग्रहणात्मक लेख प्रसिद्ध.

प्राचीन संस्कृत नाटकांचे सौन्दर्य उलगडणाऱ्या कार्यक्रमांचे विविध ठिकाणी सादरीकरण.

साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मुलाखतकार व निवेदक म्हणून सहभाग.

**दिवाळी अंक सहभाग-**

शोध घटोत्कचाचा.... भास ते भैरप्पा (विपुलश्री दिवाळी २०२३)

मेघमोहिनीचे नेत्रकटाक्ष

(हेमांगी दिवाळी २०२३)

सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका सावनी शेंडे यांची मुलाखत

( आश्लेषा दिवाळी २०२३)






# चव म्हटलं कि चितळे !!



संगीता बेहेरे

मायक्रोसॉफ्ट या आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्युच्च स्थानावर असलेल्या कंपनीचे वार्षिक संमेलन अटलांटा अमेरिका येथे भरले होते. जगभरातून १०० एक देशातले सेल्सचे कर्मचारी जमलेले असताना तेव्हाचे मायक्रोसॉफ्टचे अध्यक्ष श्री स्टीव बामर यांनी आवाज उंचावत विचारले, 'येथे कोणी भारतातून आले आहे का?' जेव्हा भारतीय चमूने आपली ओळख दर्शवली तेव्हा त्यांचा पहिला प्रश्न होता, 'तुमच्यात कोणी चितळे बाकरवडी आणली आहे का?' बिल गेट यांनाही चितळे बाकरवडी मनापासून आवडते व त्यांच्या बोर्ड मीटिंगमध्ये ती आवर्जून वाटली जाते. अशी पुस्ती ही त्यांनी जोडली. मला सांगा, पुणेकर दुपारी झोपतात, आमची कोठेही शाखा नाही वगैरे वगैरे टोमणे व विनोद ज्यांच्या नावाने आजवर मारले गेले त्या चितळे बंधू मिठाईवाल्यांच्या कर्तृत्वाचा याहून मोठा पुरावा तो काय असणार? हे सांगण्याचा उद्देश म्हणजे गोऱ्या साहेबांना सांगितलं की आपल्याला लगेच पटत.

तर आमची कोठेही शाखा नाही पासून महाराष्ट्र आणि महाराष्ट्रा बाहेर ऐंशीहून अधिकृत फ्रेंचाजी स्टोअर्स, दहापेक्षा जास्त



राज्यात आणि जगभरातील तीसहून अधिक देशात आपली उत्पादने विकणे ही झेप घेतली चितळे बंधूंनी. यात चार पिढ्यातील प्रत्येकाची अविश्रांत मेहनत, चिकाटी तर आहेच शिवाय गरजेप्रमाणे स्वत:ला बनवणे, गुणवत्तेसाठी सतत आग्रही राहणे, आणि नाविन्याचा सतत शोध घेणे हे आत्मसात केलेले गुणही आहेत. त्याहूनही मोठं आहे संपूर्ण कुटुंबाच्या एकीचे बळ. आणि हे सर्व काही पुढच्या पिढीला आचारातून, विचारातून, आणि संस्कारातून पोहोचवणे. असा जबरदस्त पिढीजात वारसा पाठीशी घेऊन चितळे बंधूंच्या चौथ्या पिढीतला वारसदार श्री इंद्रनील चितळे व्यवसायात सहभागी झाला. श्री संजय चितळे यांचा पुत्र आणि श्री राजाभाऊ चितळे यांचा नातू.

इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलेकम्युनिकेशन इंजीनियरिंगचे शिक्षण घेतलेले इंद्रनील यांनी सुरुवातीला जी.इ.ए. फूड्स (जर्मनी) या फूड



प्रोसेसिंग मधील सर्वाधिक मार्केट व्यापणाऱ्या कंपनीत कामाचा अनुभव घेतला. २०११ पासून ते घरच्या व्यवसायात पूर्ण वेळ सक्रिय झाले. याच वर्षी हार्वर्ड बिझनेस स्कूल बोस्टन येथून एक्झिक्यूटिव्ह एमबीएचा अभ्यासक्रमही पूर्ण केला. इंद्रनील कॉलेजमध्ये असल्यापासूनच त्याच्यावर त्यांचे काका श्री विश्वास चितळे यांचा खूप प्रभाव होता. प्रत्येक सुट्टीत जेव्हा इतर मित्र कुठे ना कुठे सहलीचा आनंद घेत तेव्हा इंद्रानील भिलवडीला जाऊन विश्वास काकांनी निर्माण केलेल्या कॅटल आणि आर. एफ. आय. डी चे निरीक्षण करीत. व्यवसायात सहभागी झाल्यावर त्यांच्या बॉसेसच्या (वडील,काका व आजोबा) अपेक्षा नेहमीच मोठ्याच होत्या. सुरुवातीच्या काळात कान व डोळे उघडे ठेवणे आणि तोंड फक्त शंका विचारण्यासाठी उघडणे हा पवित्रा घेतल्याने त्यांना सर्वांकडून भरपूर शिक्षण मिळाले. कोलोगी येथे झालेल्या फूड प्रोसेसिंग व मॅन्युफॅक्चरिंग मशीनच्या मोठ्या प्रदर्शनाला उपस्थित असताना त्यांना तिथे क्रेट व ट्रे स्वच्छ करायचे मशीन दिसले. जे चितळे डेअरीसाठी अत्यंत उपयोगी पडेल असे वाटले. त्यातील तांत्रिक बाबी जरी त्यांनी तपासल्या असल्या तरी आर्थिक बाबींसाठी त्यांना मदतीची गरज वाटली. त्यांचे मोठे काका श्री माधव चितळे हे ताबडतोब त्यांच्या मदतीला धावले. ही मशीन्स चितळे फॅक्टरीत आली व ती अतिशय उपयुक्त ठरली. सुरुवातीच्या दिवसातील इंद्रनील यांच्या कर्तुत्वाची व बुद्धिमत्तेची ही पहिली झलक होती. त्यानंतर चितळ्यांची आवडती उत्पादने पेढा, मोदक व मोतीचूर लाडू याचे उत्पादन वाढवण्यासाठी त्यांनी ब्राझील, जर्मनी येथे वेगवेगळ्या मशीनरींचा शोध व अभ्यास केला. त्यात मोतीचूर लाडवातील कळ्या न तुटता लाडू मशीन वरच वळला जाणे यासाठी अथक प्रयत्न करून त्यांनी स्वतःचे तांत्रिक ज्ञान सिद्ध केले. त्यामुळे जिथे दहा माणसे एका तासात ३० किलो लाडू बनवायची तिथे चार माणसे एका तासात २७० किलो लाडू बनवू लागली. हा व्यवसायासाठी फार मोठा फायदा होता. हे घडत असतानाच चितळे बंधूंनी उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने मोठी फॅक्टरी निर्माण करण्याचा निश्चय केला. रांजे येथे मोठी जागा घेऊन तेथे दोन लाख स्क्वेअर फुटाच्या उभारणीचा घाट घातला. तांत्रिक प्रशिक्षण, सिद्ध केलेली व्यवसायिकता आणि त्याचवेळी इतर विभागांवर



ताण न येता याची निर्मिती करणे गरजेचे. त्यामुळे ही जबाबदारी इंद्रनील यांच्यावर आली. ते झपाटून कामाला लागले. यावेळी इंद्रनील आधीच मार्केटिंग व डिस्ट्रीब्यूशनची जबाबदारी व मोतीचूर लाडवांचे प्रयोग यात गर्क होते. पण ही मोठी जबाबदारी ही त्यांनी अंगावर घेत समर्थपणे पेलली. वडील, काका, आर्किटेक, इंजिनियर या साऱ्यांचा मेळ घालत इमारतीचा आराखडा बनवणे, तो प्रत्यक्षात उतरतोय यावर लक्ष ठेवणे व नंतर त्यात हवी तशी मशिनरीची क्रमवारी लावून ती यंत्रणा कार्यरत करणे. फार मोठी जबाबदारी त्यांनी लिलया पेलली. त्यामुळे उत्पादन चार पटीने वाढले. त्याचे पॅकेजिंग व वितरणही व्यवस्थित सुरू झाले. बर्फी, लाडू ,काजू कतली, बाकरवडी, चिवडा, नमकीन यांच्या पारंपारिक निर्मिती प्रक्रिया पूर्णपणे ऑटोमॅटिक स्वरूपात घडवण्यासाठी त्यांनी विशेष मेहनत घेतली. थियरी ऑफ कन्स्ट्रेन्टस् चा वापर, वेअर हाऊस सारख्या पायाभूत सुविधांची निर्मिती, तसेच महत्त्वपूर्ण पदावर व्यवस्थापकांची नेमणूक करणे असे धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांनी चितळे बंधू व्यवसायाला एक नवी दिशा दिली. महाराष्ट्र (रांजे) पुणे व गुजरात (सिल्वासा येथे नमकीन) उत्पादनासाठी योग्य ती यंत्रसामग्री उभी करण्याचे श्रेयही त्यांच्याकडे जाते.

भारतीय पदार्थांना अधिक आरोग्यपूर्ण बनवण्याचा ते कटाक्षाने प्रयत्न करीत आहेत. त्याच उद्देशाने चितळे बंधू एम स्क्वेअरच्या अंतर्गत साखर, ग्लूटेन, लॅक्टोस यांचा वापर न करता तयार केलेले पदार्थ बनवले जात आहेत. त्यात आरोग्यपूर्ण ब्रेकफास्ट देणारे पदार्थ लवकरच समाविष्ट होणार आहेत. चितळे बंधू बिंज बार हे केवळ दहा रुपयात मिळणारे उत्पादन येत्या चार वर्षात दहा लाख दुकानदारांपर्यंत पोहोचवण्याचं त्यांचं ध्येय आहे.

अतिशय लहान वयात त्यांनी घेतलेल्या या व्यवसायिक कर्तृत्वाच्या झेपेच श्रेय ते घरच्या वडीलधाऱ्यांना व त्यांच्या संस्कारांना देतात. ‘आम्हाला घरून कधीच कोणतेही बंधन घातले गेले नाही. त्यामुळे लहानपणापासूनच काहीही लपवाछपवी करावीशी वाटली नाही. पण घरचे सर्वच जण एवढे जीव ओतून काम करताना, त्याचवेळी स्वतःचे छंद जोपासताना व सामाजिक भान ठेवताना दिसत होते की ते संस्कार आपोआपच होत गेले. व्यवसाय शिकवला गेला नाही पण घरातील डायनिंग टेबल हे ब्रेकफास्टला कॉन्फरन्स रूम झालेली असायची. त्यामुळे व्यवसायिक चर्चा सतत कानावर पडायच्या. आम्ही सर्वजण एकाच परिसरात पण वेगवेगळया घरांत राहायचो.




त्यामुळे नात्यांचे बंध घट्ट राहिले पण प्रत्येकाला स्वत:ची स्पेसही मिळाली. ज्याचा काम करतानाही फायदाच झाला.' असे इंद्रनील चितळे आवर्जून सांगतात. इंद्रनील यांना संगीताची आवड असून त्यांनी तबला, कीबोर्ड व ड्रम्स वाजवण्याचे प्रशिक्षण घेतलेले आहे . बाईक चालवणे हे त्यांचं अजून एक प्रेम असून त्यांनी जगभरातील विविध कॅम्पस, सत्र व टूर्स मध्ये सहभाग घेतला आहे. चितळे बंधूंची व्यवसायिक गणित सांभाळतानाच त्यांनी स्वत:च वेगळेपण जपत वुमन्स क्रिकझोन, हर्बिव्होर फार्म्स वर्शॉपमाइझ अशा विविध स्टार्टअप्स मध्ये गुंतवणूकदार म्हणून सहाय्य केले आहे. आपल्या उत्पादनातून आयुर्वेदाचा प्रसार करणाऱ्या हर्बिया या स्टार्टअपचे ते सहसंस्थापक आहेत.

अशा या अत्यंत व्यस्त वेळापत्रक असलेल्या तरुण उद्योजकाचे पाय मात्र जमिनीवर आहेत. आलेल्या प्रत्येकाशी त्यांच बोलणं मृदू , संयत व आदरयुक्त आहे. हा विशेष स्वभाव गुण. त्यांच विश्रांती स्थळ म्हणजे त्यांची पत्नी सौ. अमिता व दोन छोटे मुलगे अन्विक आणि युग. सौ. अमिता याही इंजिनिअर असून स्वत:च्या वडिलांच्या व्यवसायात कार्यरत आहेत. त्याचबरोबर 'बिग लिटिल वर्ल्ड' या स्पेशल मुलांच्या शाळेचे संयोजनही त्या करतात. चितळे कुटुंबाचा व्यावसायिक आणि सामाजिक कार्याचा वारसा ही दोघे समर्थपणे चालवत आहेत असेच दिसते. इंद्रानील यांची बहीण सौ.जान्हवी चितळे अक्कलकोटकर ही सुद्धा चितळे कुटुंबाच्या व्यवसायात कार्यरत आहे. ती चितळ्यांकडील पहिली मुलगी जी व्यवसायात भाग घेत आहे.

मराठी माणूस व्यवसायात पडत नाही, त्याला तो जमत नाही असे म्हणणाऱ्यांना चितळे बंधूंच्या तीन पिढ्यांनी शिस्तबद्ध रीतीने, गुणवत्तापूर्वक व मुख्य म्हणजे सचोटीने व्यवसाय कसा करतात ? हे दाखवले. आता ही चौथी पिढी हे सर्व गुण सांभाळत उत्पादन, मार्केटिंग व जगभरात ओळख निर्माण करते आहे. अर्थात दिवसाला १२ टन कुरकुरीत,खमंग व चविष्ट बाकरवडी बनवणाऱ्यांना असाध्य ते काय असणार ?


**संगीता बेहेरे**

गेल्या अनेक वर्षांपासून 'आम्ही पार्लेकर' या वाचकप्रिय सदराचे लेखन.

sangeetabehere9920@gmail.com

९८६७७ ५८३१०




# विझले भान

पाण्याच्या शांत किनारी
अवचित विझले भान
अंगांगाच्या स्पर्शातही
नाही राहिले त्राण.

ओठावरले स्मित भाव
जाहले नकळत गूढ
पापण्यांच्या डोहात
जाहली अचानक वाढ.

विझलेले निबिड मन
जळात भिरभिरताना
त्या जड अंधारात
कुठून येती ताना

विस्कटली मनाची नाव
कुणी शोधीत होते
कोवळी तनु सावरताना
चिरफाड आतून होते

पाण्याच्या शांत किनारी
बुडून गेला पदर
निसरड्या काठावरची
भिजून जाई नजर.




**-अशोक बेंडखळे**

९८६९२५८५८५


**परिचय- प्रसिद्ध लेखक.**
स्वतंत्र,अनुवादित व संपादित अशी ४१ पुस्तके प्रकाशित. एकूण बारा साहित्य पुरस्कारांनी सन्मानित त्यात एक राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार.

**दिवाळी अंक सहभाग:**
दीपावली,प्रतिभा साहित्यवारी, हेमांगी यात कविता.दर्याचा राजा व पोर्ट ट्रस्ट कामगार मध्ये लेख आणि चतुरंग अन्वय मध्ये कथा अशा सहा दिवाळी अंकात लेखन तसेच आश्लेषा दिवाळी अंकाचे संपादन केले.



# नव्या क्षितिजांच्या शोधात

## डॉ.आसावरी बापट



अमेया जाधव

**संस्कृत भाषेसह आपला जीवनप्रवास कसा आणि कधी सुरु झाला? थोडक्यात म्हणजे तुमच्या करीयरची सुरुवात कशी झाली ?**

माहेरची मी पद्मजा (पद्मा) केळकर. लग्न झाले तेव्हा माझे शिक्षण बी.ए.एम.ए भाग एक समाजशास्त्र इथपर्यंत झाले होते. लग्नानंतर जवळपास दहा वर्षे पूर्णवेळ गृहिणी होते. लहानपणापासून संस्कृतमध्ये खूप ज्ञान आहे असे संघ, राष्ट्रसेविका समिती तसेच इतरही अनेक लोकांकडून ऐकले होते. हे ज्ञान कशाप्रकारचे आहे ते जाणून घेण्याची सुप्त इच्छा मनात खूप पूर्वीपासून होती. १९९५ साली मात्र आतून मनापासून वाटले की आपण संस्कृत शिकलेच पाहिजे. खरी संस्कृत शिकण्याची सुरुवात सोमैया कॉलेज मधून १९९४ साली 'स्टडी ऑफ इंडियन कल्चर' ह्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला तेव्हा झाली. संस्कृत भाषेत काती प्रचंड ज्ञान आहे त्याचा परिचय झाला. त्या आधी महाकवी कालिदास, पतंजली यांची नावे ऐकली होती पण त्यांच्या कार्याचा परिचय नव्हता. मग जाणवत गेले कि हे सगळे खूप मोठे आहे, अथांग आहे. संस्कृतची एक एक वैभवशाली दालने माझ्यासमोर उलगडत गेली. संस्कृत डिप्लोमा, एम. ए करत असताना नोकरी, घराची जबाबदारी, मुंबईत कायम स्वरूपी स्थायिक होण्याचा निर्णय असे सगळ्यांच्या आयुष्यात जसे कसोटीचे क्षण येतात तसे ते माझ्या आयुष्यातही आले. त्यामुळे एम. ए केल्यावर मुलांच्या शिक्षणासाठी लगेच पी.एच.डी करण्याचा विचार पुढे ढकलला. मध्यंतरीच्या काळात विभागात, त्यावेळच्या संस्कृत विभाग प्रमुख डॉ .गौरी माहुलीकर यांनी काही लेक्चर घेण्यासाठी अभ्यागत अध्यापिका म्हणून बोलावले. इथेच आयुष्याला कलाटणी मिळाली. विद्वज्जन संपर्क खूप मोठ्या प्रमाणात मिळाला, अनेक संधी मिळत गेल्या आणि मुख्य म्हणजे अभ्यासाला वेळ मिळाला जो एम. ए करतानासुद्धा मिळाला नव्हता. संसारिक गोष्टींना महत्व देऊन तब्बल पाच वर्षांनी पुन्हा पी.एच.डी. साठी प्रवेश घेतला. पुन्हा नव्याने डॉ. गौरी माहुलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासाला सुरुवात झाली.

मधल्या काळात कौटिल्य अर्थशास्त्रासारखा मोठा ग्रंथ हाती आला. लहानपणीच हृदयस्थ झालेल्या चाणक्याच्या ग्रंथाने अर्थातच वेडावून टाकले.कौटिलीय अर्थशास्त्रातील विविध विषयांवर मुंबई पोलीस गुप्तचर विभाग, पोलीस अकादमी, फोर्स वन, आर्मी वॉर कॉलेज, महू, नवसारी management institute अशा मोठ्या संस्थांमध्ये व्याख्याने होऊ लागली. त्याच वेळी लोकसत्ता, लोकप्रभा मध्ये साप्ताहिक लेखमाला सुरु होत्या. आकाशवाणी, दूरदर्शनवर कार्यक्रम सुरू होऊ लागले होते,



मुलाखतींना बोलावले जाऊ लागले होते. एक दिवस ह्या संचालक पदाची जाहिरात आली आणि मी अर्ज केला. मुलाखतीसाठी दिल्लीला बोलावण्यात आले. माझी निवड होऊन पहिली नियुक्ती ऑगस्ट २०१८ मध्ये म्यानमार (ब्रह्मदेश) देशात भारतीय विदेश मंत्रालया मार्फत झाली.

**स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्राची संचालक म्हणून जबाबदारी २०१८ मध्ये स्वीकारली. ह्या केंद्राचे उद्दिष्ट आणि कार्य याबद्दल वाचकांना जाणून घ्यायला आवडेल.**

भारतीय परराष्ट्रीय धोरणांतर्गत सांस्कृतिक केंद्रे विविध देशांत स्थापन केली गेली आहेत. सध्या जवळपास ३५ केंद्रे कार्यरत आहेत.

माझी नियुक्ती म्यानमारला झाली होती. म्यानमारबद्दल थोडीफार माहिती होती. महाराष्ट्राचा आणि म्यानमारचा तसा जवळचा संबंध होता. ब्रिटिशांनी म्यानमारचा राजा थिबा याला रत्नागिरीमध्ये नजरकैदेत ठेवले होते तर रत्नागिरीच्या लोकमान्य टिळकांना म्यानमारमधील मंडालेच्या (म्यानमारमधे त्याचा उच्चार 'मांडले' करतात) तुरुंगात ठेवले होते. इथेच 'गीतारहस्य' ह्या विख्यात ग्रंथाची निर्मिती झाली होती. १८५७ च्या उठावातील बहादुरशहा जफर राजा याला रंगूनला स्थानबध्द ठेवले होते आणि तिथेच त्याचा मृत्यू झाला होता. सुभाचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचे गुप्तचर शिक्षण केंद्र रंगून, म्यानमार येथे होते, त्यांची सुवर्ण तुलाही तिथेच झाली होती.अश्या काही प्रमुख गोष्टी सोडल्यास फारशी माहिती नव्हती. याशिवाय आणखी एक माहिती होती ती म्हणजे 'मेरे पिया गये रंगून' हे हिंदी सिनेमातले गाणे! माझ्या लहानपणी ते फारच प्रसिद्ध होते. ह्याच रंगूनमध्ये पुढली तीन वर्ष राहाणार होते.

अर्थात म्यानमारला नियुक्ती झाली असे जेव्हा समजले तेव्हा त्या देशाबद्दल माहिती गोळा करायला सुरुवात केली. ह्या अभ्यासाचा नक्कीच उपयोग झाला.

**स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्राचं काम कसं चालतं आणि केंद्राला स्वामी विवेकानंदांच नाव देण्यामागे काही विशिष्ट हेतू आहे का?तसेच तुमच्या कारकिर्दीत म्यानमार आणि नेपाळमध्ये कोणते उपक्रम राबविले गेले?**

प्रारंभी ह्या सांस्कृतिक केंद्रांपैकी काही केंद्रांनाजवाहरलाल नेहरू, अमृता शेरगील, इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र अशी नावे देण्यात आली. तरी बहुसंख्य केंद्र भारतीय सांस्कृतिक केंद्र ह्या नावानेच ओळखली जात होती. २०१८ च्या प्रारंभी ज्या केंद्रांच नामकरण झालं नव्हतं त्या साऱ्या केंद्रांना स्वामी विवेकानंद, ज्यांनी भारतीय संस्कृतीचा प्रसार जगात केला, त्यांचे नाव देण्यात आले. सर्व केंद्रांत योग, भारतीय नृत्य, भारतीय संगीत याचे अत्यंत अल्प शुल्क घेऊन वर्ग चालविले जातात. ह्या वर्गातून अक्षरशः शेकडो विद्यार्थी जोडले जातात. त्याशिवाय ह्या केंद्रांतून विविध कार्यक्रम, व्याख्याने, स्पर्धांचे आयोजन केले जाते. शिवाय भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद् (आय सी सी आर) अनेक शिष्यवृत्ती देत असते. ह्या सगळ्या कार्यक्रमांतून दोन देशांमध्ये छान स्नेहबंध तयार होतात. हे करत असताना फक्त आपल्याच संस्कृतीचे कौतुक किंवा जाहिरात न करता दुसऱ्या देशातील संस्कृतीला सुद्धा समान महत्त्व देऊन जोडून घेणे आवश्यक असते.

नेपाळमध्ये नुकताच कला संवाद नावाचा कार्यक्रम सुरू केला ज्यात नेपाळ मधील स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन दिले जाते. भारतीय वीणा आणि म्यानमारचे वाद्य सॉंग आणि समुद्रगुप्ताच्या हातातली वीणा यात बरेच साम्य आहे. भारतीय संस्कृतीचा विश्वसंचार कसा झाला याचे उदाहरण म्हणून सॉंगकडे बघता येईल. हे साधर्म्य लक्षात घेऊन म्यानमारचे सॉंग वाद्य आणि आपली वीणा असा एकत्रित कार्यक्रम सादर केला गेला. वीणावादन कलाकार योगा वंदना भारतातून तेव्हा एका कार्यक्रमासाठी म्यानमारला आल्या होत्या. माझ्या मनातला ह्या कार्यक्रमाचा हेतू त्यांना सांगितल्यावर त्यांनी खूप सहकार्य केले.

येणाऱ्या महिन्यात शालेय मुलांसाठी Fun and Learn कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ज्यात ब्राह्मी लि शिकविण्यात येईल अश्या विविध कार्यक्रमांची आखणी सतत सुरू असते.

**परराष्ट्रीय धोरण अधिकारी** (Diplomat) **म्हणून कोणत्या जबाबदारी निभावाव्या लागतात ?**

एक सांस्कृतिक केंद्राची प्रमुख म्हणून आणि तेही दुसऱ्या देशात फार विचारपूर्वक कृती करावी लागते. विचार मांडावे लागतात. प्रत्येक कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत काळजीपूर्वक आणि विचारपूर्वक करावे लागते.कुठल्याही कार्यक्रमातून दोन्ही देशांच्या भावनांना कुठेही तडा जाणार नाही याची फार काळजी घ्यावी लागते. ह्या कार्यक्रमांतून राखीच्या सूत्राप्रमाणे संबंध वृद्धिंगत होतात. राखीचे सूत जे असते ते रेशीम धाग्याचे असते जे टोचत कधीच नाही, पण त्याची गाठ पक्की बसते असे नातेसंबंध मला म्यानमार आणि नेपाळ ह्या दोन्ही देशात अनुभवता आले. सांस्कृतिक संबंध हे असेच आहेत असे मला वाटते, न टोचणारी पण पक्की गाठ...! आपली भारतीय संस्कृती खूप समृद्ध आहे. त्यात विविधता आहे. बाहेरच्या देशात याचे आकर्षण पण आहे. लोकांना भारतीय संस्कृती जाणून घ्यायची असते. वसुधैव कुटुंबकम आपली संस्कृती आहे आपण एक कुटुंब म्हणून जर सर्व विश्वाकडे पाहत असू तर सांस्कृतिक संबंधातून ते नातेसंबंध घट्ट होणे नुसते बोलून नाही तर सांस्कृतिक संबंधातून ते निर्माण करावे लागतात.

**ह्या कार्यकालात तुमच्या हातून झालेल्या एखाद्या भरीव कामाबद्दल माहिती द्याल का?**

म्यानमारमधील आयेयारवाडी प्रांतात १४० वर्षे जुनी रामायणाची परंपरा आहे. काही हौशी

लोककलाकारांनी स्नेह आणि भक्तीने ती जपली आहे. ह्या परंपरेविषयी कळल्यावर त्या कलाकारांना भेटायला जाण्याचे ठरवले आणि जगाला ग्रासणारा कोवीड सुरू झाला. त्यातच म्यानमारमधे सत्तांतर झाल्याने परिस्थिती अधिकच बिघडली. बघता बघता माझा कार्यकाल संपत आला. आता मी हातपाय हलवले नाहीत तर हे काम न केल्याची खंत कायमची बोचत राहिल हे जाणवलं. असं जाणं धोक्याचं होतं तरी तो धोका पत्करला. त्या प्रांतात गेले. कलाकारांना भेटले. रामायणाच्या कार्यक्रमांबद्दल जाणून घेतले.अश्या भेटींतून त्यांचा विश्वास संपादन केला आणि एक दिवस त्यांच्या शंभरीच्या जवळ आलेल्या पोथीची जतन करण्यासाठी मागणी केली. स्थानिक लोकांच्या भेटींमधून त्यांना माझ्याविषयी एक प्रकारचा विश्वास वाटला होता. त्यांनी ते जीर्ण हस्तलिखित आणि रामायणाशी संबंधित प्रत्येक कागद, प्रत्येक फोटो माझ्या हातात दिला. तो क्षण अविस्मरणीय होता. ज्या विश्वासाने त्यांनी मला ते साहित्य दिले त्यावेळी ते पूर्ण रिकामे आणि मी अत्यंत श्रीमंत झाले होते. त्या हस्तालिखिताचे योग्य जतन, संवर्धन करण्यासाठी आवश्यक ते सर्व करून त्यांची मूळ प्रत आणि फोटो शिवाय स्कॅन केलेली नवी प्रत असं सारं त्यांना दिलं. ह्या साऱ्या उपक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या डॉ. रामनिवास ह्यांच्या नावाचा उल्लेख अटळ आहे. माझ्या प्रत्येक भेटीत ते माझ्याबरोबर येत होते.माझ्या भावना म्यानमारमधील बांधवांपर्यंत पोहोचवण्याचं काम त्यांनीच केले. त्यांच्या शिवाय हे काम होणे अशक्य होते.

**महाराष्ट्राची संस्कृती आणि महान व्यक्तिमत्त्व यांची आपल्या शेजारील राष्ट्रांमध्ये ओळख करून देण्याचा प्रयत्न आपण कसा केलात ?**

म्यानमार मध्ये असताना २०२० साली लोकमान्य टिळकांचे स्मृती शताब्दी वर्ष होते. कोविडच्या साऱ्या मर्यादा सांभाळून चार कार्यक्रम घेतले गेले. मंडालेला लोकमान्यांनी तुरुंगात गीतारहस्य लिहिले ह्या पार्श्वभूमीवर भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदे मार्फत आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन आय सी सी आर तर्फे घेण्यात आले. त्यात म्यानमारमधील विद्वानांचा सहभाग होता. एका स्थानिक प्राध्यापकांना टिळकांचा अभ्यास करायला लावून त्यांचे म्यानमारी भाषेत व्याख्यान आयोजित केले.




लोकमान्य टिळकांच्या छायाचित्रांचे डिजिटलप्रदर्शन भरविण्यात आले. यात टिळक कुटुंबांचे मोलाचे सहकार्य मिळाले. त्यांनी मला आनंदाने त्यांच्या जवळचे फोटो देऊ केले होते हे मी इथे आवर्जून सांगू इच्छिते. शालेय विद्यार्थ्यांच्या स्पर्धा घेण्यात आल्या ज्यात लोकमान्यांवर मुलांनी भाषणे केली. मुख्य म्हणजे गीतारहस्यचे म्यानमारी भाषेत भाषांतर करण्याच्या प्रकल्पाचे काम माझ्या कारकिर्दीत सुरु झाले.

काठमांडू, नेपाळ येथील भारतीय दूतावासात गेली दोन वर्षं छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेकाचे औचित्य साधून कार्यक्रमांचे आयोजन केले. त्यात नेपाळमधील मुलांनी शिवरायांवरील गाणी गायली. यंदा पार्ल्याच्या जनसेवा समितीच्या सहकार्याने विविध दुर्गांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यासाठी श्री.पराग लिमये आणि अमोल यांनी उत्तम विषयमांडणी केली. काठमांडू मधील प्रतिसाद पाहून पोखरा मध्ये सुद्धा हेच प्रदर्शन भरवावे अशी मागणी झाली. तिथेही उत्तम प्रतिसाद मिळाला. पोलिस दल, सैन्यदल, शालेयविद्यार्थी, छायाचित्रकार, स्थापत्य शास्त्राचे विद्यार्थी अश्या विविध लोकांनी या प्रदर्शनाला भेट दिली.

**आपल्या कारकिर्दीत घडलेला एखादा अविस्मरणीय प्रसंग सांगाल का?**

भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे म्यानमार भेटीला आले असतानाचा एक प्रसंग कधीही विसरता येणार नाही असा होता. त्यावेळी मी event अधिकारी होते. राष्ट्रपती कालीबाडी देवळातून बाहेर पडले. ठरलेल्या कार्यक्रमानुसार त्यांनी गाडीत जाऊन बसणे अपेक्षित होते त्याऐवजी त्यांनी अचानक मार्ग बदलला आणि ते रस्त्यावर आले. त्यावेळी त्यांना पहाण्यासाठी तिथले भारतीय जमले होते. ह्यातल्या काहींच्या दोन दोन पिढ्या भारतात गेल्या नव्हत्या पण त्या सर्वांनी आपल्या राष्ट्रपतींना पाहून जो भारताचा जयजयकार केला तो क्षण आठवताना सुद्धा आज माझ्या अंगावर रोमांच उभे राहतात.

**दोन्ही देशांमध्ये वास्तव्य असताना काही संकटे, समस्यांना सामोरे जायची वेळ आली का?**

राजकीय समीकरणे काळाच्या ओघात बदलत असतात पण जे टिकून राहतात ते सांस्कृतिक संबंध..!आपल्या देशात वैचारिक स्वातंत्र्य आहे तरीही आपण तक्रारी करतो. म्यानमार मध्ये तिथे असताना परिस्थिती मी पहिली होती. एका रात्रीत सत्तांतर कसे होते ते प्रत्यक्ष पाहिले. माझ्यासाठी खूप मोठा धक्का होता. आपण कल्पना पण करू शकत नाही असा बदल काही तासात झाला. कोविड आणि कु यांचा धोका, त्यामुळे असलेल्या मर्यादा असूनही माझ्या कालखंडात तिथे काम सुरु ठेवले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या डॉ. रामनिवास यांचे सहकार्य मिळाले.

**आपल्या जीवनप्रवासात कुटुंबाची**



**भूमिका आणि सहकार्य कसे होते ?**

माझे यजमान, मुलं, सून ह्यांच्या सहकार्याशिवाय हा प्रवास शक्यच नव्हता. माझं माहेरही जवळ असल्याने आई- वडील, भाऊ भावजया सगळ्यांच सहकार्य मिळत होतं. ह्या सगळ्यांचे सहकार्य आहे म्हणूनच इतकं जबाबदारीच पद मी निश्चिंतपणे सांभाळू शकते आहे.

**तुमचे जे व्यक्तिमत्त्व जगासमोर आहे, ते घडविण्याचे श्रेय तुम्ही कुणाला द्याल ?**

माझ्या व्यक्तिमत्त्व घडण्यात माझ्या आईचा खूप मोठा वाटा आहे. ती शेवटपर्यंत कार्यरत होती, समाज कार्य करत होती. तिचा सेवाभाव, कार्यत्तत्परता ह्या सगळ्यातून निश्चितच शिकत गेले.

त्याच बरोबरीने माझ्या संस्कृतच्या शिक्षक वर्गाचा त्यात प्रामुख्याने डॉ. गौरी माहुलीकर, डॉ. उमा वैद्य यांचा प्रभाव निश्चितच आहे. मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागात अनेक विद्वज्जनांचा सहवास घडला, व्यक्तिगत आयुष्यातही अनेक चांगली माणसे भेटत गेली, समिती मध्ये जात होते तिथली शिस्त अशा अनेक गोष्टी एकत्रितपणे मला उपयोगी पडत आहेत.

या साऱ्याचा उपयोग करण्याची संधी देशाने मला दिली, भारतीय संस्कृतीच्या प्रचारात खारीचा वाटा उचलण्याच भाग्य मला मिळालं म्हणून मी खूप भाग्यशाली आहे.

डॉ. आसावरी बापट एक उत्कट संस्कृत संशोधक आणि प्राध्यापक आहेत. स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र, नेपाळ येथे संचालक म्हणून कार्यरत आहे.

संशोधन शिष्यवृत्तीच्या श्रेणीमध्ये स्मृती साहित्य, कौटिलीय अर्थशास्त्र, प्राचीन वास्तुकला आणि स्थापत्य अभियांत्रिकी आणि आर्थिक व्यवस्थापन यांचा समावेश.

संरक्षण आणि सुरक्षा, मूल्य शिक्षण, संस्कृत नाटक, वैदिक अभ्यास, आयुर्वेद, भूकंप विज्ञान इ. त्यांनी एशियाटिक सोसायटी, मुंबई अंतर्गत प्रधान धर्मस्तुर आणि मनुस्मृतीच्या प्रकाशात ब्रह्म आणि क्षत्र नावाचा एक संशोधन प्रकल्प.

ब्राह्मण सभा, गिरगाव, कुलगुरू शिष्यवृत्ती आणि रॉयल एशियाटिक सोसायटीच्या सन्माननीय न्यायमूर्ती के.टी. तेलंग शिष्यवृत्तीचे ज्ञानवंत पुरस्कार प्राप्त.

विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सर्वोत्कृष्ट संशोधन पेपरची पारितोषिके मिळविली.

प्रा. अमेया प्रकाश जाधव
अहिल्यादेवी महिला व्यासपीठातर्फे २०१५ मध्ये 'यशस्वी युवा महिला' पुरस्काराने सन्मानित
चारचौघी व आम्ही पार्लेकर मासिकात दुर्गभ्रमंती, इतिहास आणि पर्यटन या विषयावर लेखमाला प्रसिद्ध .
दिवाळी अंक – अजिंक्य महाराष्ट्र , चैत्र शोभा, आम्ही पार्लेकर मध्ये लेख प्रकाशित
चाणक्य नीती (कौटिल्य अर्थशास्त्र) या विषयावर आम्ही पार्लेकर मध्ये लेखमाला (जाने २०१६ ते डिसेंबर २०१६)
१२ वर्षे अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापिका
कार्यकारिणी सदस्या, केशवसृष्टी, उत्तन
भ्रमणध्वनी – ९८६७४५८५३५

# बाहुली

उंबरठ्या आतील पाऊल
बाहेर टाकताना
सतत एक जाणीव
एकेका नात्याची
जबाबदारी सांभाळण्याची
परत परत घोटवून
आतल्या आत उतरवायची
तिथे अहिल्येची शिळा झाल्याची
सतत टोचणी गुप्त मनाची
पुसटशी चाहुल किंवा
पुसटसा झंकार ही मनातला
हलकेच पुसुन टाकायचा
अन् पुन्हा उंबरठ्याआत
पाऊल टाकताना
होऊन जायचं संवेदना रहित
बाहुली कचकडी




**अल्पना कशाळकर**

**परिचय-** संवाद, कलामंच, साहित्य संवेदन, साहित्य मैफल, अक्षर भेट, चैत्र शोभा, क्षितीज दिवाळी अंक तसेच 'साहित्य'च्या त्रैमासिकात व अमेरिकेच्या 'अनुबंध' या ऑनलाईन त्रैमासिकात कविता प्रसिद्ध झाल्यात.

आकाशवाणी 'अस्मिता' वाहिनीवर कविता वाचन व ललितलेख वाचन, वनिता मंडळातील अनेक कार्यक्रमात सहभाग. दिवाळी संध्या अशा कार्यक्रमात गीत गायन.

सामाजिक कार्यात रुची. सध्या मुंबई मालाड पूर्व लायन्स क्लबच्या प्रेसिडेंट.



# ‘वजनदार’ साथीचे तबला वादक एस. व्ही. पटवर्धन



भरत चंद्रकांत कामत

आपण जन्माला येतो ते घर, घरातली माणसं, त्यांचे कळत नकळत होणारे संस्कार, उरी बाळगलेली मूल्ये, आपल्या कामावरची प्रचंडनिष्ठा, कठोर परिश्रमांची तयारी, साधना, झपाटलेपणा, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्या घरामुळे जोडली गेलेली कैक माणसं, हे सारं लाभायला भाग्य आवश्यक असतं. पूर्वजन्मीच सुकृत हे त्याला कारणीभूत असते. जुन्या पिढीने स्वत:ला मिळालेले विशिष्ट संस्कारांचे, विचारांचे, पाथेय, जसेच्या तसे आणि काही वेळा स्वत:च्या प्रतिभेने त्यात भर घालून शिस्तबद्ध रीतीने पुढील पिढीकडे पोचवणे, अशा कलापरंपरेतील संगीत घराण्यात जेष्ठ बुजुर्ग तबलावादक पंडित एस. व्ही.उर्फ बाबा पटवर्धन यांचा जन्म ८ ऑगस्ट १९२४ रोजी झाला. मूळचे सर्वजण श्रीवर्धन चे, एकूण चार भावंड, सर्वात मोठे बंधू माधवराव हे अंजनीबाई मालपेकर यांचे शिष्य, दुसरे बंधू वामनराव हे अनेक संगीत नाटकातून गद्य नट म्हणून नावारूपास आले. तिसरे अर्थातच श्रीराम म्हणजेच एस.व्ही पटवर्धन ज्यांना बाबा पटवर्धन म्हणून संबोधले जायचे आणि सर्वात धाकटे बंधू रामकृष्ण पटवर्धन हे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांचे पट्ट शिष्य होते.लहानपणापासूनच श्रीराम अर्थात बाबा पटवर्धन यांना संगीताची आवड आपल्या वडिलांमुळे लागली.त्यांचे वडील पंडित विष्णू बुवा पटवर्धन, उत्तम गायक होते.जुन्या काळात त्यांनी महाराष्ट्रभर आपले गायनाचे जलसे केले. तसेच विष्णुबुवांनी जुन्या संगीत नाटकातून गायक नट म्हणून अनेक भूमिका केल्या. वडिलांमुळे अनेक दिग्गज कलाकारांच्या, मैफिली ऐकण्याचा योग, बाबा पटवर्धन यांच्या आयुष्यात अनेकदा आला.अनेकांचे कार्यक्रम ऐकून बाबांनी आपली कला जोपासली. पुढे थोडे मोठे झाल्यावर तरुण वयातच,पंढरपूरचे प्रसिद्ध पखवाज वादक, पंडित दत्तोपंत मंगळवेढेकर यांच्याकडे बाबांची, गुरुकुल पद्धतीने रीतसर तबला व पखवाज ची तालीम अनेक वर्षे झाली.

पानसे घराण्याचे गोविंदराव बऱ्हाणपूरकर यांच्याकडूनही अनेक गोष्टी बाबांना शिकायला मिळाल्या. पुढे बाबा पटवर्धन यांनी उत्तम




तबलावादक, तडफदार पखवाज वादक तसेच उत्तम जलतरंग वादक, म्हणून आपले नाव कमावले. जलतरंग वादनामध्ये त्यांचे सहअध्यायी पंडित शंकर विष्णू कान्हेरे यांचाही सहवास त्यांना अनेक वर्ष लाभला. पुढे कान्हेरेबुवांनीच त्यांना मुंबईमध्ये येण्यासाठी मदत केली. १९५२ ते १९७३ इतका प्रदीर्घ काळ त्यांनी आकाशवाणी मुंबई केंद्रावर, तबलावादक व पखवाज वादक (स्टाफ आर्टिस्ट) म्हणून नोकरी केली. या नोकरीमुळे त्यांच्या आयुष्यात स्थैर्य प्राप्त झाले आणि आकाशवाणीमुळे त्यांचे नाव सर्व दूर प्रसिद्ध झाले. याच काळात बाबा पटवर्धन यांच्या असे लक्षात आले की आपल्या वादनात पखवाज चा बाज जास्ती आहे, त्याकरता तबलावादनाची विशेष तालीम आपल्याला मिळाली पाहिजे, म्हणून पुढे उस्ताद अमीर हुसेन खा साहेब यांचे ते गंडाबंद शागिर्द झाले आणि तबल्यातील विद्या अमीर हुसेन खान साहेब यांच्याकडून आत्मसात केली. या २१ वर्षात त्यांनी अनेक नामावंत गायक गायिकांबरोबर, तसेच वाद्यवादकांबरोबर तबला संगत केली. यामध्ये प्रामुख्याने नटसम्राट बालगंधर्व, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी, पंडित जसराज, पंडित राम मराठे, विदुषी माणिक वर्मा, पंडित कुमार गंधर्व, पंडित गजानन बुवा जोशी, पंडित गोविंदराव पटवर्धन, पंडित हरिप्रसाद चौरसिया, श्रीमती झरीन दारूवाला, पंडित कार्तिक कुमार, उस्ताद अब्दुल हलीम जाफरखान, व इतर अनेक नामावंत कलाकारां बरोबर त्यांनी तबला संगत केली. माझे वडील पंडित चंद्रकांत कामत यांची आणि पंडित एस. व्ही.पटवर्धन यांची खूप घट्ट मैत्री होती. एकमेकांमध्ये सांगितीक विचारांचे आदान प्रदान होत असल्याने, दोघांच्याही वादनात अनेक वेळा एकमेकांचा एकमेकांवर पगडा दिसून येतो, याचा प्रत्यय दोघांच्याही जुन्या ध्वनिमुद्रणांमधून आजही ऐकायला मिळतो. बाबा पटवर्धन यांनी इतर अनेक कलाकारांकडून उदाहरणार्थ उस्ताद अहमद जान थिरकवा, पंडित सामता प्रसाद, पंडित पंढरीनाथ नागेशकर यांच्याकडून एकलव्यासारखी विद्या प्राप्त केली व आपली एक स्वतंत्र वादन शैली निर्माण केली. पंडित गोविंदराव बऱ्हाणपूरकर, पंडित एस. व्ही.पटवर्धन, पंडित अंबादास पंत आगळे ही सर्व मंडळी खरंतर नाना पानसे पखवाज घराण्यातीलच मानली जात होती. लहानपणापासूनच मी एस. व्ही. पटवर्धन यांची तबला संगत ऐकतच वाढलो, यांच्या वादनातील सहजपणा मुलायमपणा आणि अत्यंत गोड हात मला कायम भावला. गायन व तंतुवाद्याबरोबर तबला संगत कशी करावी याचा वस्तुपाठ, (आदर्श) त्यांनी आमच्या पिढीसमोर ठेवला. त्यांच्या तबला वादनात पखवाजाचा बाज ते सहजपणे व तडफदारपणे वाजवायचे. त्यांनी संगत केलेली अनेक रेकॉर्डिंग आज युट्युब वर आपल्याला ऐकायला मिळतात, त्यात प्रामुख्याने पंडित राम मराठे, पंडित भीमसेन जोशी, विदुषी माणिक वर्मा यांच्याबरोबर केलेली तबलासंगत अविस्मरणीय आहे 'काय तुझ्या मनात सांग माझ्या कानात' या पंक्तीप्रमाणे संगत करताना, गायकाच्या मनातील लय ओळखून, अतिशय लयदार, आसदार, वजनदार, असरदार, वादन ते नेहमी करायचे. 'गळ्याचे वजन हाताला आणि हाताचे वजन गायकाच्या गळ्याला' अशी एकजीनसी संगत, ते प्रत्येक कलाकारांबरोबर करायचे. आपल्या वादनातून गायकाबरोबर सा...म्हणजे 'षडज' भरायचे .त्यामुळे त्यांच्या लयदार, आसदार, दमदार ठेक्यातून एकसंध एकजिनसी 'सा' चे गुंजन म्हणजेच वलय निर्माण होत होते. गायकाबरोबर लयकारी करताना ते अप्रतिम आवर्तन भरायचे, पण हे करताना कुठेही लयी शी मारामारी नाही, अथवा गायकावर कुरघोडी अजिबात नाही. अत्यंत तडफदार, पण मुलायम सहज, म्हणजे संगीताच्या च्या भाषेत बोलायचं झाले, तर 'हात हलका पण वजनदार' अशी त्यांच्या वादनाची खासियत होती. याचा प्रत्यय पंडित भीमसेन जोशी यांच्या, 'जो भजे हरि को सदा', या रेकॉर्डमधील त्यांची तबला संगत अतिशय गोड आणि मुलायम आहे. तसेच पंडित भीमसेन जोशी यांच्या राग तोडी, शुद्ध कल्याण, ललित, दरबारी, या LP रेकॉर्ड मधील त्यांची तबला संगत अविस्मरणीय आहे. तसेच पंडित

राम मराठे यांच्या अनेक संगीत नाटकांना त्यांनी तबला संगत केली, तसेच रामभाऊंच्या अनेक जलसा मधून अतिशय दमदार तडफदार संगत ते रामभाऊ बरोबर नेहमी करायचे. जुन्या पिढीतील ध्रुपद गायक डागर बंधू यांच्याही बरोबर त्यांनी पखवाजाची अप्रतिम संगत केली आहे. इतक्या मोठ्या कलाकाराला आयुष्य मात्र फार कमी लाभले, नियतीने त्यांच्यावर वयाच्या ४९ व्या वर्षी घाला घातला आणि तो अत्यंत दुर्दैवी ठरला. इतक्या लहान वयात गंभीर आजारामुळे १९७३ रोजी बाबा पटवर्धन अनंतात विलीन झाले. त्यांच्या या जाण्याने संगीत क्षेत्राचे खूप मोठे नुकसान झाले. इतक्या



कमी आयुष्याच्या कालखंडात आपली संगीताची मोठी कारकीर्द त्यांनी घडवली. त्यांनी केलेले कार्य आमच्या पिढीसाठी व येणाऱ्या पुढील पिढीसाठी खूप मोलाचे आहे . साथ संगतीचा आदर्श त्यांनी आमच्यासाठी घालून दिला आहे. त्यांचा अभ्यास करताना आमच्या पिढीला, एक जन्म ही पुरणार नाही. अतिशय जाणीवपूर्वक एस. व्ही.पटवर्धन यांच्याकडून मी अनेक गोष्टी शिकण्याचा प्रयत्न केला, आजही त्यांच्याकडून खूप शिकत आहे. ८ ऑगस्ट बाबा पटवर्धन यांचा वाढदिवस असतो, त्यानिमित्ताने त्यांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम साष्टांग दंडवत.

८ ऑगस्ट २०२३ ते ८ ऑगस्ट २०२४ हे पंडित एस. व्ही.पटवर्धन यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. या वर्षभरात अनेक वेगवेगळे कार्यक्रम



करण्याचा मानस, त्यांची कन्या प्रसिद्ध भरतनाट्यम नर्तिका संध्या धर्म यांनी योजिला आहे.यानिमित्ताने जन्मशताब्दी वर्षातील पहिला कार्यक्रम, दिनांक ८ ऑगस्ट रोजी आयोजित केला होता. या कार्यक्रमात पंडित एस व्ही पटवर्धन यांचे छायाचित्र, तालयोगी पंडित सुरेश तळवलकर यांच्या

शुभहस्ते भारत गायन समाजाला प्रदान केले गेले. याच कार्यक्रमात श्री निखिल घोरपडकर यांचे पखवाज वादन आणि श्री मिलिंद तुळणकर यांचे जलतरंग वादनवादन होणार देखील झाले. रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून पंडित एस. व्ही पटवर्धन यांना मानवंदना दिली.


**भरत चंद्रकांत कामत**

भारतातील आघाडीच्या तबला कलाकारांपैकी एक आहेत. त्यांना ए. आय. आर तर्फे तबल्यासाठी प्रथम पारितोषिक. सवाई गंधर्व महोत्सव, डोअरलेन फेस्टिव्हल , शंकरलाल महोत्सव यासारख्या अनेक प्रतिष्ठीत मैफिली प्रसिद्ध. ऑल इंडिया रेडिओ आणि दूरदर्शनचे नियमित प्रसारक.

९४२२३३०८९३





**अशुतोष उकिडवे**

१९९७ सालापासून लिखाणाला सुरूवात. कथासंग्रह, ललितलेख, प्रवासवर्णनं,अनुवाद अशी १२ पुस्तके प्रसिद्ध. तर यातील काही पुस्तके पुरस्कारप्राप्त.

याशिवाय बालसाहित्य, पुरातन संस्कृति व वस्तुवारसा, साहित्यसमीक्षा, भाषेवरचे वैचारिक व चिंतनात्मक लेख अशा बहुपेडी विषयांवर वर्तमानपत्र व मासिकांमधून नियमित सदर-लेखन. तसेच माहेर, मेनका, विपुलश्री, लोकप्रभा, अक्षरगंध, किस्त्रीम यांसारख्या मान्यवर दिवाळीअंकातून सातत्याने लिखाण प्रसिद्ध .



# प्रेरणा देवस्थळी

- भारतीय नौदल अधिकारी
- भारतीय नौदलाच्या युद्धनौकेवर नियुक्त झालेल्या पहिल्या महिला कमांडिंग ऑफिसर
- पश्चिम नौदल कमांडचा भाग असलेल्या वॉटरजेट एफएससी युद्धनौका 'आयएनएस त्रिंकट'वर नियुक्त
- मच्छीमारांना संरक्षण, घुसखोरी करणाऱ्यांविरोधात कारवाई आणि बचाव मोहिमा ह्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या.
- यापूर्वी फर्स्ट लेफ्टनंट म्हणून 'आयएनएस चेन्नई'वर कार्यरत.
- Tupolev TU -142 ह्या टेहळणी विमानावरील पहिल्या महिला निरीक्षक
- २००९ मध्ये भारतीय नौदलात रुजू.




# कार्लोस अल्कराज

- स्पॅनिश व्यावसायिक टेनिसपटू
- असोसिएशन ऑफ टेनिस प्रोफेशनल्स(ATP)नुसार, पुरुष एकेरीतील जागतिक क्रमवारीत अव्वलस्थानी
- जुलै २०२३ मध्ये, सात वेळा विजेतेपद मिळवलेला आणि गतविजेता नोवाक जोकोविचला नमवून विम्बल्डन स्पर्धा जिंकण्यात यशस्वी
- २०२३ विंबल्डन स्पर्धा, २०२२ यूएस ओपन आणि चार मास्टर्स १००० विजेतेपदांसह बारा एकेरी किताब  जिंकणारा टेनिसपटू
- २०२२ मध्ये, राफेल नदाल आणि जोकोविचला पराभूत करणारा पहिला किशोरवयीन खेळाडू
- वयाच्या १९ व्या वर्षी, यूएस ओपन २०२२ जिंकल्यानंतर जागतिक क्रमवारीत अव्वल ठरणारा सर्वात तरुण खेळाडू
- वयाच्या पाचव्या वर्षापासून टेनिस खेळण्यास प्रारंभ, सुरुवातीचे प्रशिक्षण वडिलांकडून.




# मोहम्मद शमी

- आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा जलद- मध्यमगती गोलंदाज
- ICC वर्ल्ड कप क्रिकेट २०२३ मध्ये सर्वाधिक (२४) बळी घेणारा गोलंदाज
- न्यूझीलंड विरुद्ध ५७ धावांत ७ बळी ही आजवरच्या नॉक आऊट खेळांतील सर्वोत्तम कामगिरी
- रणजी करंडक स्पर्धेत पश्चिम बंगाल राज्यातर्फे आणि भारतीय प्रिमियर लीगमध्ये कोलकाता नाईट रायडर्स  संघातर्फे खेळणारा क्रिकेटपटू
- २०१० मध्ये रणजी करंडक स्पर्धेत आणि २०१३ मध्ये भारतीय संघात पदार्पण
- २०१८ मध्ये घरगुती हिंसाचार, मॅच फिक्सिंग इत्यादी आरोपांमुळे चर्चेत.
- नंतर सर्व आरोपांतून मुक्त होऊन भारतीय संघात पुनरागमन.



## न्युज मेकर्स २०२३

# प्रज्ञानंद रमेशबाबू

- प्रतिभावंत युवा भारतीय बुद्धिबळपटू
- २०१३ मध्ये वयाच्या ७ व्या वर्षी इध्अ मिंस्टरचे विजेतेपद.
- २०१६ मध्ये वयाच्या १० व्या वर्षी तत्कालीन सर्वांत तरुण 'आंतरराष्ट्रीय मास्टर' बनण्यात यश.
- २०१८ मध्ये 'ग्रँडमास्टर'चा दर्जा प्राप्त. त्यावेळचा दुसऱ्या क्रमांकाचा लहान वयाचा ग्रँडमास्टर.
- २०१८ मध्ये १८ वर्षांखालील विभागात जागतिक युवा चॅम्पियन किताब प्राप्त.
- चॅम्पियन्स चेस टूर २०२२ च्या ऑनलाइन एअरथिंग्स मास्टर्स रॅपिड टूर्नामेंटमध्ये वर्ल्ड चॅम्पियन मॅग्नस कार्लसन विरुद्ध विजयी.
- २०२३ चेस वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत दाखल होणारा सर्वांत तरुण खेळाडू. गतविजेत्या कार्लसन कडून पराभूत मात्र २०२४ मध्ये होणाऱ्या कंडिडेट्स टूर्नामेंट या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी पात्र.
- डिसेंबर २०२३ मध्ये बहीण वैशाली हिला देखील 'ग्रँडमास्टर' किताब प्राप्त. बुद्धिबळाच्या इतिहासात ग्रँडमास्टर बनणारे पहिले भाऊ-बहीण.



**संकलन - प्रज्ञा काणे**
लेखिका व मुलाखतकार



# हम....... है तो क्या हुआ दिल वाले है!

अपंग व्यक्तींचाही काही लैंगिक गरजा असू शकतात याचा आपण कधी विचार केला आहे का? मी जाणीवपूर्णक इथे अपंग असा शब्द वापरला आहे. आता दिव्यांग हा शब्द वापरण्याची पद्धत आहे. पण माझी अपंग मैत्रीण सोनाली नवांगुळ हिने दिव्यांग शब्द का वापरायचा नाही किंवा तिचा विरोध का आहे हे फार सुरेख पद्धतीने सांगितले आहे. ती म्हणते 'अपंग व्यक्ती जे काही मिळवतो ते त्यांच्या कष्टाने, मेहनतीने आणि वेळोवेळी घेतलेल्या योग्य निर्णयांच्या बळावर मिळवतो, त्यांच्यात काही दिव्यत्व असतं म्हणून त्याच्या जगण्यात काहीही कमी अधिक होत नाही. ना त्याचं अपंग असणं हा कुठल्या पाप पुण्याचा भाग आहे. जेव्हा आपण दिव्यांग असा शब्द वापरतो तेव्हा अपंग व्यक्तींनी आणि चळवळींनी आजवर जे काही कमावलेले आहे ते पुसले जाते. शरीरात काहीतरी व्यंग आहे म्हणून व्यक्ती अपंग आहे. काहीही दिव्य त्यात नाहीये' असं ती अगदी ठासून सांगते आणि ते मलाही पटलेलं आहे. त्यामुळे या लेखात जाणीवपूर्वक अपंग हा शब्द वापरलेला आहे आणि दिव्यांग हा शब्द टाळलेला आहे.



मुक्ता चैतन्य

अपंग व्यक्तींचे लैंगिक जीवन हा आपल्यासाठी, समाजासाठी पूर्णपणे दुर्लक्षित विषय आहे. अपंग व्यक्तींचाही मानसिक, भावनिक गरजांच्या बरोबर लैंगिक गरजा असतील हा विचार आपण कधीही करत नाही. कारण सर्वसाधारण समाज म्हणून अपंग व्यक्तीला शारीरिक भूक असू शकते हेच आपल्याला माहित नसतं. व्यक्ती अपंग आहे म्हणजे त्याला कसलीही शारीरिक भूक नाही, त्या जाणीवाच नाहीत किंवा असल्या तरी त्याबद्दल त्यानं बोलणं अपेक्षित नाही हे समाज म्हणून आपण गृहीत धरलेलं आहे पण हे खरं आहे का? असू शकतं का? असा जेव्हा विचार करायला सुरुवात होते तेव्हा शारीरिक गरज ही फक्त लिंग आधारित असते का हा प्रश्न उपस्थित होतो. संभोगाच्या पलीकडं माणूस आहे हे आपण अनेकदा विसरून जातो. शरीराच्या निरनिराळ्या भागात होणारे स्पर्श, नुसतीच उबदार मिठी, प्रेमळ नजर, कधी हलकं तर कधी दीर्घ चुंबन याही मानवी गरजा आहेत ज्या प्रत्यक्ष संभोगाच्या अलीकडे पलीकडे आहेत आणि तितक्याच गरजेच्या आहेत. पण याचा विचार आपण एरवीही करत नाही तर अपंग व्यक्तींच्या संदर्भात कसा करणार?

परदेशात मात्र हा संपूर्ण विषय अतिशय गांभीर्याने घेतला जातो. परदेशातही सगळं आलबेल आहे अशातला भाग नाही, पण निदान हा विषय दुर्लक्षित नाहीये. अपंग व्यक्ती खुलेपणाने डेटिंग एप्स वर स्वतःला रजिस्टर करतात. ज्या देशात देहविक्री हा कायदेशीर व्यवसाय आहे त्या देशांमध्ये अनेकदा पालक, मित्रपरिवार त्यांच्या अपंग मित्र मैत्रिणींसाठी सेक्स वर्कर्सच्या अपॉईंटमेंट्स बुक करतात. सेक्स सरोगेट नावाची एक सुविधा उपलब्ध असते. यात काम करणारे काहीवेळा सेक्सवर्कर्स असतात तर काहीवेळा रीतसर फक्त अपंग व्यक्तींना सुविधा उपलब्ध करुन देणारे तज्ज्ञ थेरपिस्ट असतात आणि या सगळ्यात



कुणालाही काहीही अनैतिक, चुकीचं वाटत नाही. कारण माणूस अपंग आहे म्हणून त्याला जीवनातला आनंद मिळू नये, किंवा तो त्याचा हकदार नाही असा विचार कुणीही करत नाही. हा सगळा विषय माझी मैत्रीण सोनाली नवांगुळ हिच्यामुळे माझ्या परिचयाचा झाला. मग त्यावर ऑनलाईन जगात वाचायला सुरुवात केली आणि मूलभूत मानवी हक्क, अधिकार आणि गरजा या सगळ्यापासूनच आपण समाज म्हणून अपंग व्यक्तींना किती दूर ठेवलेलं आहे याची पुन्हा पुन्हा जाणीव होत गेली.

सायकोलॉजी टुडे नावाचे एक वेबपोर्टल आहे. यातील एका लेखाचा इथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. हा लेख अपंग व्यक्तीच्या लैंगिक गरजांविषयीचे समज गैरसमज दूर करणारा आहे. यातील काही ठळक मुद्दे इथे आवर्जून देते. कारण वाचकांपैकी अनेकांना हे प्रश्न असू शकतात. मनात गैरसमज असू शकतात. हे गैरसमज दूर होणं आवश्यक आहे.

अपंग लोकांना लैंगिक गरजा नसतात.

प्रत्येक व्यक्ती निरनिराळ्या संदर्भात अपंग असतो. म्हणजे प्रत्येकात काही ना काही कमतरता असते. अपंग लोकांची कमतरता डोळ्यांना दिसते इतकेच. अलैंगिक १ टक्के वगळता, प्रत्येकी व्यक्तीला लैंगिक गरजा आहेत आणि शारीरिक सुखाचा आनंद घेण्याची इच्छा असते. एखाद्या गंभीर स्वरूपाच्या अपंग व्यक्तीमध्ये देखील लैंगिक गरजा असू शकतात. अपंग व्यक्तींना अनेकदा त्यांच्या इच्छा उघडपणे मांडता येत नाहीत कारण त्यासाठी पोषक सामाजिक वातावरण नसतं.

अपंग व्यक्ती आकर्षक नसतात.

प्रत्येक जण कुणा दुसऱ्याला आकर्षक वाटू शकतो. अनेकदा अपंग नसणाऱ्या व्यक्तीला अपंग व्यक्ती आकर्षक वाटू शकते. त्यात काहीही चुकीचे नाही. आकर्षण दुतर्फ़ा असेल तरच कुठलंही नातं तयार होतं.. त्याचा व्यक्ती अपंग असण्या-नसण्याशी संबंध नाही.

अपंग व्यक्तींना इतक्या अडचणी असतात की लैंगिक सुखासाठी त्यांना एनर्जीच नसते. हा ही गैरसमज आहे. लैंगिक सुख हे जीवनातील अत्यावश्यक सुख आहे आणि ते मिळवण्याचा प्रत्येकाला समान अधिकार आहे.

अपंग व्यक्ती संभोग करू शकत नाहीत.

काहीवेळा काही अपंगत्वामध्ये योनी संभोग अशक्य असतो. पण लैंगिक सुख मिळवण्याचे इतर अनेक मार्ग असतात.

काही अपंग व्यक्तींना सतत सहाय्यक लागतात. अशावेळी लैंगिक सुखासाठी जो एकांत लागतो तो कसा मिळणार ?.

हे खरे आहे की अनेक अपंग व्यक्तींना सतत सहाय्यक लागतो. पण हा सहाय्यक त्यांना सेक्स पार्टनर किंवा इतर संदर्भात मदत करुन दूर होऊ शकतो.

अपंग व्यक्तींबद्दल पूर्वग्रह मनात ठेवण्यापेक्षा असे कुठलेही प्रश्न मनात येत असतील तर गैरसमज जोपासण्यापेक्षा ते दूर करणं अधिक गरजेचं आहे.

आता थोडं सेक्स सरोगेटबद्दल.

ही संकल्पना आपल्याकडे पचणे जरा कठीण आहे कारण आपला समाज लैंगिकतेला धरुन प्रचंड नैतिकतेच्या अवाजवी कल्पना आणि धारणांमध्ये अडकलेला आहे. सगळा समाज सज्जन आहे का? तर मुळीच नाही, पण समाज म्हणून सज्जन असल्याचा नैतिक मुखवटा मात्र आपण घट्ट चिकटवून घेतलेला आहे. त्यामुळे असे कुठलेही विषय आले की आपल्याला बिचकायला होतं. पण न बिचकता, जरा मनाच्या खिडक्या मोकळ्या करुन या विषयाकडे बघितलं तर याची गरज आणि गांभीर्य लक्षात येईल. सेक्स सरोगेट्स ना सरोगेट पार्टनर ही म्हटलं जातं. जवळीक (इंटिमसी) आणि लैंगिकता या विषयातील प्रशिक्षित लोकच या प्रकारचे काम करतात. लैंगिक प्रशिक्षण, लैंगिकतेबद्दलची माहिती, सेक्स टॉय कसे वापरावे याचे प्रशिक्षण आणि अत्यंत खासगी लैंगिक अनुभव घेण्यात मदत अशा स्वरूपाचे काम ते करतात. अपंग व्यक्तीला स्वतःच्या शरीराची ओळख करून देणं, त्याविषयीचे समज गैरसमज दूर करण्यासाठी मदत करणं आणि या सगळ्याचा मनाशी असलेला संबंध समजावून देत त्यांना आत्मविश्वास मिळवून देण्याचं काम ते करतात. अनेकदा अपंग व्यक्ती, थेरपिस्ट आणि सरोगेट पार्टनर मिळून काम करतात.

याखेरीज डेटिंग ॲप्स, सेक्स टॉईज या सगळ्या गोष्टींचाही वापर अपंग व्यक्तीला सुखी लैंगिक जीवन जगण्यासाठी आवश्यक असतात. या सगळ्याचाही समावेश यात केलेला असतो. शरीराला होणारे निरनिराळे स्पर्श, त्यातून मिळणारे सुख कसे समजून घ्यायचे याची माहितीही हे थेरपिस्ट आणि सरोगेट पार्टनर्स त्यांच्या क्लायंटला शिकवतात.

आपल्याकडे या सगळ्या गोष्टी इतक्या स्वच्छपणे कधी सुरु होतील माहित नाही. पण निदान अपंगांकडे 'अरेरे' म्हणून बघण्यापेक्षा एक सक्षम व्यक्ती म्हणून बघणं अतिशय आवश्यक आहे. तरच, त्यांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक गरजा समाज समजून घेऊ शकेल आणि त्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक व्यवस्था उभारू शकेल.


**मुक्ता चैतन्य**

संस्थापक, सायबर मैत्र - ग्रे चॅरिटेबल फाऊंडेशन

मुक्त पत्रकार, लेखिका आणि सायबर व समाज माध्यमांची अभ्यासक.

डिजिटल wellbeing trainer

आजवर विविध वृत्तपत्रांतून, मासिक व दिवाळी अंकांमधून लेखन.




# इस्रो : आकांक्षा पुढती जेथे अवकाश ठेंगणे!



अंबरीश पवार

नमस्कार मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

२३ ऑगस्ट २०२३ रोजी भारताचे चंद्रयान चंद्रावर अवतरले आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इसरो प्रत्येक भारतीयांच्या मनात घर करून गेली! ही ऐतिहासिक घटना आपण सर्वांनी पाहिली असेल ह्यात द्वंद्व नाही. युट्युबवर आजवरचा सर्वाधिक पहिला गेलेला हा इव्हेंट आहे. ह्या आधी भारतात क्रिकेट सोबत सर्वांना एक पणाची जाणीव करून देणारे विज्ञान असेल असे वाटले नव्हते पण काही असेना, ह्या विज्ञानाने सर्वांना एकत्र आणले. गेली अनेक दशके अंतराळ क्षेत्राला आपण आपल्या 'डोक्यावरील' गोष्ट समजत होतो पण चंद्रयानाच्या अभूतपूर्व यशानंतर मात्र हेच अंतराळ क्षेत्र बहुतांशी लोकांच्या डोक्यात व मनात रुजले. अर्थातच, ह्यात सर्वात मोलाचा वाटा असेल तो ह्या इसरो मधील डाऊन टू अर्थ असलेल्या सर्व शास्त्रज्ञ, अभियंते व इतर कर्मचारी मंडळाचा.

चंद्रयानाच्या यशामुळे इंस्पायर झालेल्या इसरोने आपला पुढील १० वर्षांचा रोडमॅप तयार केला आहे. आपल्या सूर्यमालेतील कानाकोपऱ्यापासून ते अनंतावर पसरलेल्या ब्रह्मांडाचा खगोलाचा सखोल अभ्यास करणार आहे. जणू काही अंतराळ क्षेत्रात नवनवीन मोहिमांची सरबत्ती सुरू होणार आहे. चंद्रयान-४, मंगळयान-२, शुक्रयान व बहुचर्चित गगनयान! अशी अनेक मिशन्स इसरोने हाती घेऊन धडाडीने तडीस नेण्याचा संकल्प केला आहे. आपण अश्याच महत्वाच्या मिशन्सबद्दल जाणून घेणार आहोत.

**१) NISAR : नासा - इसरो सिंथेटिक अपरचर रडार:-**

ही इसरो व नासाची संयुक्त मोहीम आहे. निसार हे एका प्रकारचे रडारच आहे जे आपण अवकाशात सोडणार आहोत. रडार म्हणजे एका जागी राहून दूरवर असलेल्या वस्तूची स्थिती किंव्हा अंतर आणि त्या वस्तूची आपल्या सापेक्ष गती ओळखता येते. रडारचा उपयोग मुख्यत्त्वे संरक्षण दलात व विमान क्षेत्रांत होतो. पण गेली अनेक वर्षे ह्याचा उपयोग विवीध क्षेत्रांत होण्यास सुरुवात झाली. NISAR मध्ये ह्या रडारचा वापर पृथ्वीवरील जमिनीचे आणि बर्फाच्छादित प्रदेशाचे निरीक्षण करण्यात येईल. रडार मार्फ़त मिळालेल्या इमेजेसमुळे भूगोलाचा अभ्यास करणे सोपे जाईल. त्यासोबत पृथ्वीवरील भूकंप, सुनामी, सातत्याने कमी होणाऱ्या हिमनगाचे निरीक्षण करेल. एका अर्थी हे मिशन पृथ्वीवर घडणाऱ्या इकॉलॉजीकल गोष्टींच निरीक्षण करेल. अंतराळात

पाठविण्यात येणारे हे आजपर्यंतचे सर्वांत महागडं रडार आहे. किंमत जवळपास ७५ अब्ज रुपये!! त्यात भारताचा वाटा हा जवळपास ७८० कोटी रुपये!! निसारचे प्रक्षेपण साधारणपणे २०२४ च्या सुरुवातीला इसरो तर्फे भारतातून केले जाईल.

**२) शुक्रयान :-**

संध्याकाळी सूर्य मावळल्यानंतर आकाशात सर्वांत तेजस्वी दिसणारा ग्रह म्हणजे शुक्र. अर्थात तो काही वर्षभर दिसत नाही, पृथ्वी सापेक्ष स्थितीनुसार तो एकतर संध्याकाळी काही वेळ किंवा सूर्योदयाच्या अगोदर काही वेळ दिसतो. शुक्राच तेज सर्वांत जास्त असण्यामागच कारण हे त्याच अतिशय घनदाट वातावरण. अतिशय तप्त व विषारी असे त्याचे वातावरण ज्यात प्रामुख्याने सल्फर आढळतो. तसेच वातावरणसोबत शुक्राची भौगोलिक स्थितीही खूप जाज्वल्य आहे, म्हणजेच त्यावर अनेक जिवंत ज्वालामुखी पर्वत आहेत ज्यातून असंख्य प्रमाणत ज्वालारस उत्सर्जित होत असतो. म्हणून शुक्रावर ज्वालारसाचे समुद्रच असण्याची शक्यता आहे. एक गंम्मत म्हणजे, ह्या सल्फरचे अतितप्त वातावरणामुळे सल्फयुरिक ॲसिड तयार होऊन चक्क पाऊस पडतो! पण सल्फयुरिक ॲसिडचा! अश्या ह्या तेजस्वी व तप्त ग्रहाच्या वातावरणाचा आणि ज्वालामुखी पर्वतांचा अभ्यास करेल. चंद्राप्रमाणे शुक्राच्या जमिनीवर एखादे लँडर किंवा रोव्हर उतरवणे शक्य नाही कारण तेथील अतिउष्ण वातावरण. म्हणून हे शुक्रयान शुक्राभोवती घिरट्या घालत राहील. २०२५ ला हे यान शुक्राकडे मार्गक्रमण करेल.

**३)मंगळयान २ :-**

बरोबर १० वर्षांपूर्वी मंगळयान १ चे प्रक्षेपण केले होते. २४ सप्टेंबर २०१४ रोजी भारताचे हे मंगळयान १, मंगळाच्या कक्षेत यशस्वीपणे स्थिर झाले होते. पहिल्या प्रयत्नात एखादे यान मंगळाच्या कक्षेत स्थिर करण्याचा एकमेव मान आपल्या इसरो ला लाभला व सर्व जगाच्या भुवया उंचावल्या! (काही ठिकाणी मिरच्या पण जोंभल्या!)

असो. असा हा अचाट पराक्रम गाजवून




अंतराळ क्षेत्रात भारताने आपला ठळक ठसा उमटवला. आता ह्यापुढे पुढील पायरी, म्हणजेच मंगळयान २. ह्या मोहिमेच्या प्रारंभी एखादे लँडर मंगळावर उतरविण्याचे नियोजन होते पण त्यात थोडा बदल करून आता फक्त एक ऑरबायटर मंगळाभोवती फिरत राहील. मंगळयान २ अथवा MOM २ म्हणजेच Mars Orbiter Mission २ असे नाव असेल. कदाचित पुढील मिशन मध्ये एखादे लँडर असू शकते. सध्या वापरण्यात येणाऱ्या ऑरबायटर मध्ये अद्ययावत यंत्रे (किंवा payloads) असतील जी ठराविक कार्य करतील. ह्या पेलोड्स मध्ये प्रामुख्याने काही प्रगत कॅमेरा असेल त्यास Hyper Spectral Imager म्हणतात. हा कॅमेरा मंगळाच्या पृष्ठभागाची छायाचित्रे घेईल व त्यावरून तेथील जमिनीवरील वेगवेगळी खनिजे, खडक, दगडे ह्यांचासखोल अभ्यास करेल. जेणेकरून मंगळाच्या पृष्ठभागाचा इतिहास कसा होता आणि सध्याच्या अवस्थेबद्दल कळण्यास मदत होईल. तसेच अजून काही पेलोड्स आहेत जी मंगळाच्या वातावरणाचा आणि मंगळाभोवती असलेल्या धुळीकणांचा अभ्यास करेल. गेल्या अनेक वर्षांच्या अभ्यासात असे कळले आहे की काही शे-हजार वर्षांपूर्वी मंगळावर वातावरण होते आणि ते नाहीसे कसे झाले ह्याची उकल होण्यास आपल्या पेलोड्सची मदत होईल. ह्या मंगळयान २ चे उड्डाण पुढील वर्षी अपेक्षित आहे.

**४) LUPEX : Lunar Polar Exploration mission :-**

वरील नावावरून तुम्हाला ह्या मिशन बद्दल थोडे कळले असेलच. चंद्राच्या ध्रुवीय भागांत हे यान जाणार आहे. म्हणजेच ह्या मिशन मध्ये सुद्धा आपल्या चंद्रयाना प्रमाणे एखादे लँडर आणि रोव्हर असेल. फक्त एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे मिशन इसरो व जपानची अंतराळ संस्था JAXA, हे एकत्रितपणे करणार आहेत. खरंतर ह्याची सुरुवात २०१७ पासून झाली. टप्याटप्याने हे मिशन चालू आहे. साधारणपणे २०२६ साली हे यान उड्डाण करेल. आपल्या चंद्रयानाच्या दक्षिण ध्रुवावर झालेल्या यशस्वी स्वारीमुळे बरीच माहिती मिळाली. ह्याच माहितीचा व अनुभवाचा उपयोग ह्या यानाच्या निर्मितीस होत आहे. LUPEX मधील रॉकेट व लँडर हे जपान विकसित करेल तर रोव्हर मात्र आपलं इसरो तयार करीत आहे. तसेच ह्या लँडर व रोव्हरवर अनेक पेलोड्स आहेत त्यात प्रामुख्याने भारतातर्फे विकसित केलेली उपकरणे बसविण्यात येतील. जवळपास १२-१३ पेलोड्स असतील. त्यातील ६ भारतीय बनावटीची आहेत. जेव्हा हे यान चंद्रावर उतरेल तेव्हा लँडर व रोव्हर अनेक प्रकारचे प्रयोग करतील. मुख्य उद्देश हा पाणी शोधणे आहे. त्यासाठी चंद्राच्या जमिनीचा, खडकांचा, क्षारांचा अभ्यास करेल. चंद्रावर ड्रीलिंग करेल, काही Samples गोळा करेल. तेथील मातीत लपलेल्या बर्फाचा, बर्फाच्या अवशेषांचा शोध घेईल व विश्लेषण करेल. जमिनीवरील गॅसेस व जमिनीचे थर्मल ऐनालिसिस करेल. अजून एक विशेष म्हणजे, चंद्रावर जवळपास सतत पडणाऱ्या मायक्रो उल्काचे किंवा त्यातील धुळीकणांचे निरीक्षण करेल!

**५) एस्ट्रोसॅट २ :-**

कदाचित बहुतांशी लोकांना ह्याबद्दल माहीत नसेल म्हणून सांगतो, की एस्ट्रोसॅट १ ही भारताची पहिलीवहिली अवकाशीय दुर्बीण आहे, जी २०१५ साली अंतराळात सोडली होती. तुम्हाला हबल, चंद्रा, किंवा नुकतीच अंतराळात पाठविलेली वेब टेलिस्कोप माहीत असेल. पण आपली एस्ट्रोसॅट ही फक्त टेलिस्कोप नसून त्यावर अत्यंत चांगले कॅमेरे बसविले आहेत. एखादी टेलिस्कोप ही काही 'विशिष्ट' नजरेतून बघत असते. त्या 'विशिष्ट' नजरा म्हणजे विद्युत- चुंबकीय वर्णपटाच्या (Electro - Magnetic Spectrum) च्या विविध 'छटा' ! त्यात अल्ट्राव्हायोलेट (UV), इन्फ्रारेड (IR), मायक्रोव्हेव, रेडिओ व्हेव, गॅमा

व्हेव, एक्स रेज आणि विसीबील व्हेव अशी अनेक 'अंतरंग' आहेत. जसे आपले डोळे हे वरील यादीतील विसीबल व्हेव सोडले तर इतर कोणत्याही व्हेव्ज पाहू शकत नाही तसेच एखादी टेलिस्कोप सुद्धा काही ठराविक व्हेव्ज पाहू शकते. एस्ट्रोसॅट सुद्धा एका प्रकारचा x-ray आणि UV टेलिस्कोप आहे. पहिल्या एस्ट्रोसॅटचा ५ वर्षांचा कालावधी कधीच संपला तरीही आजही ती ठणठणीत आहे व कार्यरत





आहे !, मागील मिशनचे कार्य पुढे नेण्याचे कार्य एस्ट्रोसॅट २ ही अवकाशीय दुर्बीण करेल. आपल्या ब्रह्मांडात अनेक प्रकारचे तारे आहेत जे प्रचंड प्रमाणात x - rays चे उत्सर्जन करतात. अश्या लहरींचा उपयोग करून त्यांच्याबद्दल जाणून घेऊ शकतो. जर का एखाद्या ताऱ्याचा स्फोट झाला तर त्यातून अनेक प्रकारची प्रारणे निघतात, x- rays सुद्धा असतात. तसेच ब्रह्मांडात होणाऱ्या ताऱ्याचा टक्कर, ग्लेक्सिजची टक्कर अश्या महाकाय घटनांतून सेकंदाच्या काही हजार भागांत अगणिक ऊर्जा, प्रारणे बाहेर पडतात व परिणामतः ब्लॅक होल्सची निर्मिती होते. अश्या घटनांचा अभ्यास ही एस्ट्रोसॅट १ अजून घेत आहे. हा लेख लिहिताना त्याने ६०० वी घटना नोंदल्याचे कळले !! खगोलशास्त्राचा अभ्यास व संशोधन करण्यास ह्या दुर्बिणीचा खूप वापर व उपयोग होऊ शकतो. २०२५ मध्ये एस्ट्रोसॅट २चे उड्डाण अपेक्षित आहे. त्यामुळे तुमच्या टेलिस्कोपच्या यादीत हबल, चंद्रा, वेब सोबत एस्ट्रोसॅट सुद्धा येईल अशी आशा करतो.

**६) गगनयान :-**

गगनयान. भारताचे सर्वात महत्वाकांक्षी मिशन ! एकविसाव्या शतकात आणि विज्ञानाच्या युगात आकाशाची सीमा ओलांडून थेट अंतराळात पंख पसरून मुक्तविहार करण्याचे स्वप्न व ध्येय आहे. हेच ध्यानात ठेवून मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०१९ साली अंतराळात भारतीय अंतराळवीर पाठवण्याचे घोषित केले. गगनयान मिशन काही भागांत प्लॅन केलेली आहे. ह्यात अंतराळवीरांची सुरक्षा प्रथम लक्षात घेऊन नुकतेच एक परीक्षण केले. TV-D1 म्हणजेच Test Vehicle Abort System. ह्यात एक अंतराळ कुपी अंतराळात पाठवून पुन्हा सुरक्षितपणे पॅराशूटच्या सहाय्याने बंगालच्या उपसागरात उतरवली. पुढील परीक्षणात, एक स्त्री रूपातील यंत्रमानव अंतराळ पाठविणार आहोत. ''व्योममित्र'' असे ह्या प्ल्स्दहदर् रोबोट चे नाव आहे. इसरोने हा रोबोट विकसित केलेला आहे. गगनयान ३ मिशन मध्ये भारतीय अंतराळवीर म्हणजेच Gagannaut अंतराळात झेप घेईल. ह्यासाठी हवाई दलातील ४ जवानांचे ट्रेनिंग सुरू आहे. गगनयान १ पुढील वर्षी मार्चपर्यंत उड्डाण करेल. गगनयान २ हे २०२५ मध्ये तर गगनयान ३ हे २०२६ मध्ये लाँच होईल.

**७) भारतीय अवकाश स्थानक :-**

जवळपास २ महिन्यांपूर्वी भारताने आपले स्वतःचे अंतराळ स्थानक बनवण्याचे ठरविले आहे. त्यास लागणारा आराखडा बनवण्याचे काम सुरू पण झाले. ह्या मिशनला अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. २०३५ मध्ये हे मिशन पूर्ण करण्याचा कयास आहे.

ही झाली काही ठळक मिशन्स. त्यासोबत काही अजून मिशन्स आहेत जी शेती, वातावरण, नेटवर्किंग, सुरक्षा अश्या अनेक क्षेत्रांशी संलग्न आहेत. ती सुद्धा वेळेत पूर्ण होतील ह्यात शंका नाही.

नोव्हेंबरच्या शेवटी इसरो अध्यक्ष श्री. सोमनाथ ह्यांनी २०४७ पर्यंतचा रोडमॅप मांडला. त्यात प्रामुख्याने चंद्रयान ४,५,६,७ मोहिमांची घोषणा केली. चंद्रावरील दगड मातीचे नमुने पृथ्वीवर आणणे, चंद्रावर रोबीटीक मिशन पाठविणे. तसेच २०३७ व २०४० मध्ये चंद्रावर मानवी मोहीमा पाठविणे, ज्यात चंद्रावर पायाभूत सुविधा व ऊर्जा निर्मिती केंद्र बनविणे. २०४७ ला चंद्रावर अवकाश पर्यटन सुरू करणे. अश्या महत्वाकांक्षी योजना आहेत.

वरील सर्व मिशन्सचा आढावा घेतल्यावर एक गोष्ट सांगावीशी वाटते ती म्हणजे ही सर्व मिशन्स सरकार अनेक प्रायव्हेट कंपन्यांना सोबत घेऊन करणार आहे, ज्यामुळे प्रचंड प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे. काही वर्षांपूर्वी आपण अनावधानाने नासा व युरोपीय अंतराळ संस्थांवर जास्त आकर्षित होतो पण येणारा काळ हा इसरोचा असणार हे मी ठामपणे सांगू शकतो.


**अंबरीश अनंत पवार**

एम. एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स),

खगोलशास्त्राची आवड.


'आम्ही पार्लेकर' मध्ये 'स्टार ट्रेक' , 'शोध शोधांचा' व 'घर तुमचं आमचं' या सदराचे लेखक.

संपर्क - ९६१९१९४६४०






# पाकिस्तान : अराजकाकडून विभाजनाकडे



संजय देवस्थळी

१३ डिसेंबर २०२३ रोजी वर्तमानपत्रातील एका बातमीने लक्ष वेधून घेतले. 'तहरीक ए तालिबान पाकिस्तान'शी संलग्न असलेल्या 'तहारीक ए जिहाद' या दहशतवादी संघटनेने डेरा इस्माईल खान जिल्ह्यातील खैबर पख्तुनख्वा प्रांतात असलेल्या लष्करी तळावर हल्ला केला. त्यामध्ये लष्कराचे २३ अधिकारी ठार आणि अनेक जखमी झाले. बातमी वाचताना पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी साधारणतः सहा महिन्यांपूर्वी जनतेला उद्देशून प्रसारीत केलेल्या भाषणाची आठवण झाली. पाकिस्तान अराजकाच्या मार्गावरून वाटचाल करत आहे आणि अशीच परिस्थिती कायम राहिली तर पाकिस्तानची पुन्हा एकदा शकले होतील असा इशाराच त्यांनी दिला होता. १९७१ साली पाकिस्तानमधून फुटून निघालेल्या बांगलादेशाचे उदाहरण त्यांनी दिले होते. पाकिस्तान आपले शेजारी राष्ट्र असल्याने तेथील घडामोडी, त्यानुसार बदलणारी अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय समीकरणे यांचा प्रभाव भारतावर पडणार हे उघड आहे. म्हणूनच भाषणातील शक्यता आणि तथ्य पडताळून पाहणे महत्वाचे आहे.

**पाकिस्तानची जडणघडण:**

१४ ऑगस्ट १९४७ रोजी अखंड भारताची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली. पाकिस्तानमध्ये पंजाब, सिंध, बलुचिस्तान, खैबर पख्तुनख्वा आणि केंद्रशासित आदिवासी विभाग (FATA : Federally Administered Tribal Area) या प्रांतांचा अंतर्भाव आहे. लष्कर, राज्यशासन, राजकारण, न्यायव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेवर तेथील पंजाबी लोकांचा जबरदस्त पगडा आहे. 'बळी तो कान पिळी' या उक्तीनुसार बाकी जनतेचे शोषण करणे हा आपला हक्क आहे अशीच यांची धारणा आहे. म्हणूनच बलुची, पठाण, सिंधी प्रांतियांमध्ये पंजाबी लोकांविषयी कमालीचा राग आहे. पंजाबी उच्चवर्गीयांची उठबस ब्रिटिशांबरोबर झाल्याने 'ढवळ्या शेजारी बांधला पवळ्या, गुण नाही लागला पण वाण मात्र लागला' या म्हणीनुसार कारभारातील निंदनीय गोष्टी पंजाबी अधिकारवर्गाने उचलल्या. सामाजिक शोषण, समाजात फूट पाडणे, मालमत्ता आणि धनसंचय करणे यात पाकिस्तानी पंजाबी कुठेही मागे नाहीत.

**पाकिस्तान मधील सद्य परिस्थिती आणि संरचनात्मक दोष:**

अल्ला, आर्मी आणि अमेरिका या तीन टेकूंवर



पाकिस्तान उभा आहे. इस्लामच्या अतिरेकामुळे शिया, सुन्नी, देवबंदी, बरेलवी , अहमदिया यांचे परस्परातील वाद विकोपाला गेले आहेत. संख्येने सर्वात अधिक असलेले सुन्नी मुस्लिम इतर पंथीयांच्या जीवावर उठले आहेत. प्रांतवाद आणि सांप्रदायिक वादातून हिंसाचार, हत्यासत्राच्या घटना सातत्याने घडत आहेत. २००१ ते २०१५ दरम्यान १४३१ सांप्रदायिक दंगलीत ४१७४ मृत्यू आणि ७२४० लोक जखमी झाल्याची नोंद आहे.

सुमारे ५०,००० मदरसा केवळ कुराण आणि जहाल इस्लामीकरणाचे शिक्षण देतात. दरवर्षी साधारण ३०-४० लाख विद्यार्थी बाहेर पडतात. नोकऱ्या आणि आधुनिक शिक्षणाच्या अभावाने हे तरुण दहशतवादात खेचले जातात. जगभरातील अनेक हल्ल्यात मदाश्यांचा हात सिध्द झाला आहे.

''अंगणात साप पाळले तर ते कधीतरी तुम्हाला चावणारच''-अमेरिकन सेनेटर हिलरी क्लिंटन यांचे पाकिस्तानच्या बाबतीत केलेले विधान आज सत्यात उतरले आहे. भारत आणि रशियाला शह देण्यासाठी निर्मिलेल्या आतंकवादी संघटना पाकिस्तानवरच उलटल्या आहेत. २०२२ साली झालेल्या विविध आतंकवादी हल्ल्यात २२९ नागरिक, ३७९ सुरक्षा रक्षक, ३६३ आतंकवादी असे ९७१ बळी गेले.

न्यायसंथा, संसद आणि प्रशासन या तीन स्तंभांवर देश चालतात. देशासाठी लष्कर असते पण पाकिस्तानात लष्करासाठी देश आहे. घटना, न्यायव्यवस्था, राजकारण यात निर्णायक हस्तक्षेप लष्कर करत असते. परराष्ट्र धोरण, अर्थकारण, नागरी प्रशासन यावर लष्कराचे अप्रत्यक्ष नियंत्रण आहे. अनेक उद्योगधंदे आणि देशातील बहुतांश जमीन लष्कराच्या मालकीची आहे. एकूण खर्चाच्या १९% खर्च लष्करावर केल्यावर विकास कामे, शिक्षण, आरोग्य यासाठी निधीच उरत नाही.

**पाकिस्तानची ढासळती आर्थिक परिस्थिती:**

पाकिस्तानची अर्थव्यवस्था केवळ परदेशी मदत आणि आतंरराष्ट्रीय नाणेनिधीवरच अवलंबून आहे. १९५० पासून एप्रिल २०२२ पर्यंत पाकिस्तानला १,८४,००० दशलक्ष डॉलर्स आर्थिक मदत मिळाली आहे. यामधील ४०% कर्ज २०११ - २०२० दरम्यान आणि १४% जुलै २०२० ते एप्रील २०२२ या चौदा महिन्यांच्या कालखंडातील आहे. कर्जफेडीसाठी नवीन कर्ज घेणे या दुष्टचक्रात पाकिस्तान अडकला आहे. पुढील तीन वर्षात कर्ज परतफेडीपोटी ८०,००० दशलक्ष डॉलर्स इतकी मोठी रक्कम भरायची आहे. सध्या चीन आणि अमेरिका हे देश पाकिस्तानला आर्थिक मदत देण्यास तितकेसे उत्सुक दिसत नाहीत. महागाई निदेशांक (३०%) गगनाला भिडला आहे. जीवनावश्यक वस्तू आणि इंधनाचे भाव सामान्य नागरिकांच्या अवाक्यापलीकडे गेले आहेत. दरडोई उत्पन्नातील वाढ अफगाणिस्तान वगळता आजूबाजूच्या देशांपेक्षा सर्वात कमी आहे. गरिबीचे प्रमाण ३९% इतके प्रचंड आहे आणि वाढीचा दर ५.५ %. देशाच्या एकूण उत्पनाचा विचार केल्यास श्रीमंत आणि गरीब यातील दरी वाढत चालली आहे. एकंदरीतच जनमानसात रोष खदखदत आहे. या सार्वत्रिक समस्या तर आहेतच पण बलुचिस्तान, सिंध आणि खैबर पख्तुनख्वा यांच्या खदखदत्या असंतोषाची आणखी खूप कारणे आहेत. जुलै महिन्यातील खैबर पख्तुनख्वाच्या बजोर प्रांतात जमीयत उलेमा इस्लाम संघटनेच्या (JUI-F) संमेलनावर झालेल्या हल्ल्यात ५० मृत्यू आणि ४०० लोक जखमी झाले होते. बलुचिस्तानात आत्तापर्यंत ५ उठाव झाले आहेत. अशा अनेक घटना पाकिस्तान अराजक आणि विभाजनाच्या मार्गावर वाटचाल करत आहे हेच दर्शवतात.

**बलुचिस्तान - पाकिस्तान वादाचे मुद्दे :**

बलुचिस्थानमधील प्रजा मुस्लिम असली तरी त्यांचा वंश, इतिहास, रीतिरिवाज, परंपरा खूप भिन्न आहेत. पंजाबी अरेरावीमुळे आपली ओळख धोक्यात आली आहे याचा सल सामान्य बलुची लोकांच्या मनात आहे. खरे तर बलुचिस्तान हा स्वतंत्र देशआहे असेच बहुतांश लोकांना वाटते. त्याला कारणही रास्त आहे. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी कलातचे (बलुचिस्तान) संस्थान स्वतंत्र होते. १८७६ साली झालेल्या करारानुसार त्यांच्या सार्वभौमत्वावर शिक्कामोर्तब झाले होते. जेव्हा भारताच्या स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले व विभाजन होऊन पाकिस्तान निर्मिती होणार हे निश्चित झाले त्यावेळेस कलातचे तत्कालीन अमीरांची (खान) यांची बाजू स्वतः बॅ. जिना यांनी १९४६ सालच्या कॅबिनेट मिशन मध्ये मांडली. झालेल्या करारानुसार १९४७ साली कलातने आपले स्वतंत्र अस्तित्व घोषित केले. फेब्रुवारी १९४८ साली अचानक जिना यांनी घूमजाव करून खानवर पाकिस्तानमध्ये सामील होण्यासाठी दबाव टाकायला सुरुवात केली. खान बधत नाही असे दिसल्यावर पाकिस्तानी फौजानी बलुचिस्तान मध्ये प्रवेश करत बळाच्या जोरावर पाकिस्तानमध्ये सामील झाल्याच्या करारावर स्वाक्षरी घेण्यात आली. बलुची लोकं हा दगाफटका विसरले नाहीत.

त्यांच्या परंपरेनुसार बदला घेण्यासाठी अनेक उठाव झाले आहेत. बलुची लोकांच्या दृष्टीतून पाहिल्यास हा स्वातंत्र्यलढा आहे. पहिल्या आणि दुसऱ्या लढ्याचे नेते अब्दुल करीम आणि नौरोझ खान यांच्याशी वाटाघाटी करून त्यांच्या कुटुंबियांची दगाबाजीने हत्या केल्याने बलुची लोकांचा पाकिस्तानी सैन्य आणि राजकारणी यांच्यावरील विश्वास उडाला आहे. आजही सत्तेविरुद्ध आवाज उठवणाऱ्या लोकांचे अपहरण करून, त्यांचा शारीरिक छळ झाल्याच्या खुणा असलेले त्यांचे मृतदेह रस्त्यांवर फेकून देण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. तांबे, सोने, लोखंड कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायूंचे साठे असले तरी मिळकतीचा नगण्य हिस्सा या भागाच्या विकासावर खर्च होतो हे बलुची लोकांनी ओळखले आहे.

आगीत तेल ओतण्याचे काम ग्वादर बंदर आणि सीपीइसी प्रकल्पांनी केले आहे. प्रकल्पाची योजना तयार करताना आपल्याला विश्वासात घेतले नाही हा सल बलुची मनात आहेच. या प्रकल्पांमुळे जवळजवळ ५० लाख पंजाबी लोक बलुचिस्तान येथे कायमस्वरूपी स्थलांतरित होतील असा अंदाज आहे. मुळात केवळ ६०-७० लाख संख्या असलेल्या बलुची लोकांना आपल्याच घरात आपण परके होऊ अशी भीती आहे. ग्वादर आणि सीपीईसी मुळे लागणाऱ्या मनुष्यबळामध्ये आणि येऊ घातलेल्या सुबत्तेमध्ये बलुची लोकांना डावलण्यात आले आहे. या प्रकल्पावर काम करणाऱ्या चिनी तंत्रज्ञांवर सशस्त्र हल्ले होण्यामागील हेच मूळ कारण आहे. आज पाकिस्तान सेनेने या प्रकल्पाला २५०००च्या आसपास सैन्य उभे करून स्थानिक लोकांवर शस्त्रे उचलली आहेत. थोडक्यात बलुचिस्तानच्या धुमसणाऱ्या ज्वालामुखीचा उद्रेक आता केव्हाही होऊ शकेल अशी परिस्थिती आहे.

**खैबर पख्तुनख्वाचा प्रांत आणि पाकिस्तान:**

तत्कालीन ब्रिटिश भारतात १९३७ आणि १९४६ साली झालेल्या निवडणुकीत पाकिस्तान चळवळसुरु करणाऱ्या मुस्लिम लीगचे अस्तित्व वायव्य सरहद्द प्रांतात कुठेच नव्हते. खुदाई खिदमदगार आणि नॅशनल





काँग्रेस यांचे संमिश्र सरकार सत्तेवर आले होते. सरहद्द प्रांत पाकिस्तानमध्ये सामील करण्यास खान अब्दुल गफार खान आणि त्यांचे भाऊ खान साहिब यांचा विरोध होता. पठाणी लोकांची अस्मिता आणि देशभवना यांचा मान राखत स्वतंत्र पख्तुनिस्तानाची निर्मिती व्हावी असा प्रस्ताव त्यांनी नाईलाजास्तव प्रतुत केला. सरकार आपल्या बाजूला नाही म्हणून ब्रिटिशांनी पाकिस्तानात विलीनीकरण करण्यासाठी जनतेचा कौल घेतला. सार्वमत आपल्या मनासारखे यावे म्हणून इस्लामचा हुकमी एक्क्याचा वापर आणि मुल्ला-मौलवींकडून दबाव टाकण्यात आला. १९४७ साली राष्ट्राध्यक्ष जिनांनी वायव्य सरहद्द प्रांताचे सरकार बरखास्त केली. पण तोपर्यंत स्वतंत्र पख्तुनिस्तानची कल्पना चांगलीच रुजली.

फुटीरता वादाचा दुसरा मुद्दा म्हणजे ड्युरँड रेखा. नकाशावर दिसणारी ईशान्य-नैऋत्य २,६४० किमी ड्युरँड रेषेलाअफगाणिस्तान आणि पाकिस्तान मधील सीमा मानली जाते. १८४७ साली झालेल्या युद्धात ब्रिटिशांनी अफगाणिस्तानचा काही प्रदेश जिंकुन भारताला जोडला. पुढे अफगाणिस्तानचे अमीर अब्दुर रहमान खान आणि ब्रिटिश सरकारचे चिटणीस ड्युरँड यांच्या १२ नोव्हेंबर, १८९३ साली झालेल्या करारानुसार ही रेषा अस्तित्वात आली. अनेक तज्ज्ञांच्या मते योग्य सर्वेक्षण केल्याशिवाय केवळ भौगोलिक परिस्थितीनुरूप रेखा निश्चित केली आहे. पश्तुनवंशीय लोकांना एकमेकांपासून वेगळे केल्याने या लोकांचा ब्रिटिश आणि पाकिस्तानी लोकांवर राग आहे. मुळात या कराराच्या वैधतेवर संशयाचे वातावरण आहे. आतापर्यंतसर्वच सत्ताधारी अफगाणिस्तान सरकारांनी या रेषेला आतंरराष्ट्रीय सीमा म्हणून ओळखायला स्पष्टपणे नाकारले आहे. दोनही स्वाक्षरीकर्त्यांनी आपापल्या देशांच्या विधिमंडळाची मान्यता मिळवलेली नाही, करार कालमर्यादित होता, करार सीमानिश्चितीचा नसून प्रभावक्षेत्राचा आहे, आंतरराष्ट्रीय नियमानुसार स्वाक्षरी करणारा एक पक्ष १९४७ पश्चात (ब्रिटिश भारत) नाही या कायदेशीर मुद्द्यांवर अफगाणिस्तानला हा करार अवैध असल्याचे वाटते. १९२१ च्या ब्रिटिश-अफगाण युद्धपश्चात झालेल्या करारानुसार तीन वर्षे उलटल्यानंतर केवळ एका वर्षाची नोटीस देऊन कोणताही एक पक्ष करार रद्द करू शकतो अशी तरतूद आहे. अनेक जागतिक कायदेतज्ज्ञांच्या मते अंतरराष्ट्रीय सीमेबद्दल

पाकिस्तानचा दावा बेकायदेशीर आहे. नकाशा नीट पहिले असताना या रेषेच्या दोनही बाजूला पश्तुन लोकांचे ऐतिहासिक काळापासून वास्तव्य आहे. त्यामुळेच आपले स्वतंत्र राज्य (अफगाणिस्तानातील) किंवा राष्ट्र असावे याच्या कायदेशीर आणि क्रांतिकारी चळवळी सुरु आहेत. एकंदरीतच पश्तुनिस्तानात मोडणारा केंद्रशासित आदिवासी प्रदेश, बलुचिस्तानचा आणि खैबर पख्तुनख्वा हे पाकिस्तानमधून कधीही निसटू शकतात. पाकिस्तानचे विभाजन होईल का ?

वसला असला तरी त्याची लोकसंख्या केवळ ५-६% आहे. इतक्या कमी लोकसंख्येच्या जोरावर क्रांती घडवून आणणे अशक्य वाटते. काद्री बलोच यांनी केलेले आवाहनावर कारवाई भारत असमर्थ आहे. १९७१ च्या बांगला देश युध्दात मुक्ती बाहीनी जवळ संख्याबळ होते. शेजारी भारताला प्रत्यक्ष सहभाग घेऊन मदत करणे शक्य झाले. बलुचिस्तानच्या बाबतीत शस्त्र, निधी, आंतरराष्ट्रीय स्तरावर समर्थन अशी अप्रत्यक्ष मदतच करू शकतो. अर्थात खैबर पख्तुनख्वाने पाकिस्तान विरुध्द जर लढा सुरु केला तर त्यात भाग घेऊन बलुचिस्तान




स्वत: स्वतंत्र होऊ शकतो.

पाकिस्तानापासून स्वतंत्र होण्यासाठी सर्व बलुची नेत्यांनी एकत्र येऊन भूमिगत सरकार स्थापन केले आहे. बलुच व्हॉइस असोसिएशनचे अध्यक्ष मुनीर मेंगल आणि बलोच पीपल्स काँग्रेसचे अध्यक्ष नाएला काद्री बलोच यांनी नुकत्याच काही मुलाखती दिल्या. बलुचिस्तानवरील अन्यायाला वाचा फोडताना त्यांनी पाकिस्तानच्या लष्कराकडून होणारे अपहरण, हत्या आणि अवयवांचा तसेच अंमली पदार्थांचा बाजार याचा उल्लेख केला. बलुचिस्तान मधील नागरिकांना स्वत:चा हक्क मिळवून देण्यासाठी भारताने सक्रिय पुढाकार घ्यावा अशीही मागणी या सरकारने केली आहे. बलुचिस्तान मध्ये पाकिस्तानी राजवटीबद्दल कितीही असंतोष खदखदत असला तरी पाकिस्तानच्या क्षेत्रफळाच्या ४४% भागात

२२०७ मधील लाल मशिदीवर झालेल्या हल्ल्याचा बदला घेण्याच्या इराद्याने बैतुल्ला महसूद यांनी फाटामधील टोळ्यांना एकत्र आणत 'तहरीक ए तालिबान पाकिस्तान' ची स्थापना केली. अमेरिकेच्या सल्ल्यानुसार पाकिस्तानचे सर्वेसर्वा मुशर्रफ यांनी हा हल्ला घडवून आणल्याची खात्री या संघटनेच्या जन्मास कारणीभूत होती. बदला म्हणून पाकिस्तान लष्कर, पोलीस तसेच निमलष्करी दलावर हल्ले करणे आणि संपूर्ण पाकिस्तानात 'शरियत कायदा' कायदा लागू करण्यासाठी लढा हे झर्ब-ए-अब्झचे लक्ष होते. या संघटनेने लक्ष साध्य करण्यासाठी अनेक दहशदवादी हल्ले केले.

१६ डिसेंबर २०१४ साली टीटीपीने पेशावर मधील आर्मी पब्लिक स्कुलवर केलेल्या हल्ल्यात १४९ माणसे (१३२ मुले) मृत्यमुखी पडली. ८ जून २०१५ काराचीमधील जीना इंटरनॅशनल एअरपोर्ट झालेल्या हल्ल्यानंतर मात्र पाकिस्तानी लष्कराने आतंकवाद्यांच्या संपूर्ण खातमा करण्यासाठी १५ जून २०१५ साली 'ऑपेरेशन झर्ब-ए-अब्झ सुरु केले. ३०००० सैनिकांनी फाटा प्रांत पिंजून काढला. या भागात लष्कर कदापि पाऊल ठेवणार नाही हे तेथील जनतेला जिना यांनी दिलेले वचन भंग झाल्यामुळे पाकिस्तानी लष्कर आणि सरकार यांच्याबद्दल संतापाची लाट आली.

झर्ब-ए-अब्झच्या कारवाईतून वाचण्यासाठी अनेक टी.टी.पी नेते अफगाणिस्थान येथे गेले आणि आतंकवाद थोडा कमी झाला. अफगाणिस्तामध्ये अनेक टी.टी.पी नेत्यांची धरपकड करण्यात आली. २०२१ नंतर तालिबान्यांनी अफगाणिस्तानवर आपली राजवट प्रस्थापित करायला सुरुवातझाल्यावर परिस्थिती संपूर्णपणे पालटली. तुरुंगातील बहुतांश टी.टी.पी नेत्यांची सुटका झाली. अफगाण तालिबान्यांनी इम्रामखान यांच्याबरोबर मध्यस्ती करून युद्धबंदीच्या नावाखाली अनेक टी.टी.पी कैद्यांची सुटका केली. काही टी.टी.पी ने काळातच युध्द्बंदी करार मोडून हिंसाचाराला सुरुवात केली.

सध्या नूर वली महंमद यांच्यासारख्या कुशलसंघटकाकडे टी.टी.पी चे नेतृत्व आहे. त्यांनी जवळपास २०च्या आसपास विखुरलेल्या संघटनांना एकत्र आणले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली इस्लामिक स्टेट ऑफ खैबर पख्तुनख्वा, अल कायदा या संघटनाही टी.टी.पी बरोबरच आहेत. बी. एल. ए ( बलोच लिबरेशन आर्मी ) आई टी.टी.पी यांची घासत वाढत आहे.

पाकिस्तानमधील भयानक परिस्थितीचे वर्णन करायचे म्हटले तर अतिरेकी हल्ल्याचे खूपच वाढलेले प्रमाण. एकट्या ऑगस्ट महिन्यात जवळजवळ ९९ हल्ले झाले झाले. पाकिस्तान तालिबानने बलुचिस्तानच्या पावलावर पाऊल टाकत फाटा, खैबर पख्तुनख्वा इतकेच काय बलुचिस्तान मध्ये भूमिगत साकार स्थापन केले आहे.

वास्तविक भारताने नवीन तालिबानी

जनतेला कोव्हिड लस पुरवून अनुकूल मत निर्माण केले आहे. तेथील प्रकल्पांचे काम सुरु करण्याची गळ भारताला घातली जात आहे. पश्तुनी लोकांची तर 'वहा हिंदुस्थान और यहां अफगाणिस्तान, फिर कहा आया पाकिस्तान' अशी ठाम समजूत आहे.

खैबर पख्तुनख्वा प्रांतातील डेरा इस्माईल खान या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी 'पश्तून महफूस चळवळ' सुरु केली आहे. शांतता मार्गाने पश्तुनी लोकांना पंजाबी आणि सिंधी लोकांप्रमाणे हक्क आणि दर्जा मिळावा यासाठी प्रयत्नशील चळवळ पाकिस्तानला डोकेदुखी ठरली आहे. हिंसक मार्गाने जाणाऱ्या आंदोलकांच्या पेक्षा सनदशीर, कायदेशीर मार्गांची पाकिस्तानला भीती वाटते. आपल्या लष्करी किंवा राजकारण्यांकडे कुशल नेतृत्व नाही म्हणून ही भीती. शांतताप्रिय लोकांना चिथावून त्यांना हिंसाचारासाठी भाग पाडण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. यामुळे रागावलेल्या एका नेत्याने 'बांगला देशाने तुम्हाला निर्वस्त्र केले पण आम्ही तुमची चामडी लोळवू.' असे म्हणत संयम सुटत असल्याचे संकेत दिले आहेत.



वेळोवेळी आतंकवादाशी मुकाबला करण्यासाठी अमेरिकेकडून अमाप पैसे आणि शस्त्रास्त्रे उकळणाऱ्या पाकिस्तान बद्दल आता त्यांचा भ्रमनिरास झाला आहे. कर्ज आणि व्याजाची थकबाकी यामुळे चीन ही उदासीन आहे. 'आई जेऊ घालीना आणि बाप भीक मागू देई ना' अशी अवस्था पाकिस्तानची झाली आहे. सिंध प्रांतामध्ये सुध्दा असंतोष वाढत आहे. फाटा येथील स्थानिक सरदार, बलुचिस्तान आणि पख्तुनी संघटना आणि नुकताच उदय पावून देशप्रेमाने झपाटलेला सुशिक्षित वर्ग जर एकत्र आला तर लवकरच बांगलादेश सारख्या इतिहासाची पुनरावृत्ती होईल. आपला मुलुख आणि गनिमीकाव्यात प्रवीण असलेल्या एकत्रित सेनेला तोंड देणेपाकिस्तानी सेनेच्या अवाक्यापलीकडले वाटते. Clock has started ticking, let us keep our fingers cross


**संजय देवस्थळी**

अभियांत्रिकी आणि व्यवस्थापनातील पदवी. चार कंपन्यांच्या संचालक पदावर काम केल्याचा अनुभव. स्वेच्छा निवृत्तीनंतर व्यवस्थापकीय सल्लागार. इतिहास, निसर्ग आणि पुरातत्त्वाचा अभ्यास आणि लेखन. वन्यजीव आणि इतिहासावर आधारित कॅम्पसचे आयोजन आणि मार्गदर्शन.

९८३३८६६४६२


# अद्वैत

देवाजीचा विशाल सागर
त्यातिल आपण मासे.
इच्छांची ती आग भयंकर,
काय करावे त्याचे ?
    चहू बाजुला पाणिच पाणी,
    जाणिव त्याची नाही,
    आशांचे ते पंख लाऊनी,
    उडण्याची मग घाई...
सागरातुनी उसळी मारून
घेतो जरी भरारी,
पुन्हा पुन्हा त्या पाण्यामधे,
कोसळतो माघारी.
    विशाल गगनी, उंच भरारी,
    ताप सरावा आस.
    वेडी आशा, छंद खुळा हा,
    हा तर नुसता भास.
मुक्त हवा अनुभवण्यासाठी,
खुशाल जावे वरती,
जल जेंव्हा ते नसते भवती,
प्राण येतसे कंठी...
    तगमग वाढे जशी जशी ती,
    अवचित होई ज्ञात.
    तूच देव तो, तूच जलाशय,
    तूच पोहणे त्यात.




**चारुलता काळे**
९८२१८०६८२७


**परिचय-**
कॉम्प्युटर मॅनेजमेन्ट, अनेक वर्ष व्यवसाय.
शालेय मुलांचे काउन्सिलिंग.
'मनस्वी' हा प्रकाशित काव्य संग्रह.
कथा, कविता, प्रवास वर्णन व इतर लेखन.
दूरदर्शन तसेच आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग.
**दिवाळी अंक सहभाग-** ता-यांचे जग मधील नॉर्वे आणी आइसलॅन्डचे प्रवास वर्णन लेख.

# रवी महाजन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स- बदलत्या नाशिकची नव्याने मांडणी करणारं नाव

**रवी महाजन बिल्डर्स आणि डेव्हलपर्स म्हणजे बदलत्या नाशिकची नव्याने मांडणी करणारं नावं. नव्या युगाची, नव्या धाटणीची, नव्या गरजांची पूर्तता करणारी घरे देणारं नावं.**



गेल्या ३२ वर्षांहून अधिक काळापासून ७० हून अधिक प्रोजेक्टच्या बांधकामाचा अनुभव असलेले व ३००० हून अधिक परिवाराचा हिस्सा झालेल्या विश्वासाचं प्रतिक.

‘काल काहीच नव्हतं इथे, आता बघ किती बदललयं’ असं नाशिकला आलेला प्रत्येक जण सांगतो आणि ते खरं आहे. नाशिक बदलतयं, वेगानं. अगदी सगळ्याच दिशांना वाढतयं. अनेक शहरे जोडणारी विमान सेवा असो वा भारतातल्या महत्त्वाच्या मोठ्या शहरांना थेट जोडणारे रस्ते असो, होऊ घातलेला आय.टी. पार्क असो वा मोठ्या ब्रॅण्डची पंचतारांकीत हॉटेल्स. आता नाशिक कुठेही थांबायला तयार नाही, थांबणारही नाही.

अशा नाशिकमध्ये गेली ३ दशकांहून अधिक काळापासून प्रचंड मेहनतीनं स्वत:चा ब्रॅण्ड उभा करणं सोपं काम नव्हतंच कधी. तेही बांधकाम क्षेत्रात जिथे ग्राहकांच्या स्वत:च्या घराबद्दल असणाऱ्या कल्पना, प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टीत कटाक्षाने बघितली जाणारी क्वॉलीटी, खूप सगळ्या अपेक्षां असतात, त्या पूर्ण करणं, त्यांच्या विश्वासाला जागणं, त्यांना आपल्या कुटुंबाचा सदस्य समजण आणि हे सगळं साध्य करण, टिकवण आणि सतत वाढवतं नेण हे अवघड शिवधनुष्य रवी महाजनांनी लिलया उचलले आहे.

शिक्षणाने स्वत: सिव्हिल इंजिनिअरिंग पूर्ण केलेले असल्यामुळे प्रत्येक छोट्या मोठ्या गोष्टी स्वत: तपासून मगच त्याची निवड करण, रोजच्या रोज प्रत्यक्ष साईटवर जाऊन तेथील कामेकामे समजावून सांगण, साईटवरील प्रत्येकाशी कामाची चर्चा करण, अडचणी सोडवण हे नियमितपणे ठरलेलचं. त्यामुळेच रवी महाजन म्हणजे क्वॉलीटी कामं ही ओळख ते निर्माण करू शकले. यामुळेच ‘आम्रपाली’ या प्रोजेक्टला त्या वर्षाचा ‘बेस्ट बिल्डींग ऑफ दि इअर’, ‘अमोदिनी’ प्रोजेक्टला अल्ट्राटेक सिमेंटचा मानाचा ‘बेस्ट कन्स्ट्रक्शन क्वॉलीटी ॲवॉर्ड’ तसेच ‘आराध्या’ या प्रोजेक्टला ’बेस्ट बिल्डींग ऑफ दि इअर’ हा पुरस्कार मिळाला आहे.



पुढील २ ते ३ दशकांचा विचार करुन निवडलेले प्रत्येक लोकेशन, तेथे साकारण्यात येणारा प्रत्येक प्रकल्प तेथील गरजांप्रमाणे डिझाईन केलेला असतो. तेथे येऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन बनविलेला प्रोजेक्ट व दर्जेदार घरासोबत जीवनासाठी लागणाऱ्या अनेक ॲमेनिटीजने समृध्द असलेली ही घरे म्हणूनच नाशिककरांनाही मनापासून आवडली आहेत. आज व्यवसायाचा वाढता भार संभाळण्यासाठी दोन्ही मुले, सुनबाई त्यांना मदतीसाठी सदैव तयार व तत्पर आहेत. अनेक वर्षांपासून सोबत केलेला सुशिक्षित व प्रामाणिक स्टाफ हे काम चोख सांभाळत आहेत. आज एकाच वेळी ३ भव्य प्रोजेक्टस् सुरु असून त्यात ६०० हून अधिक फ्लॅटची कामे सुरु आहेत. त्यात सर्वांना सहज आवडतील व परवडतील असे काठे गल्लीतील ‘आनंदवन’, इंदिरानगरमधील ‘अमृतधारा’ आणि लक्झरीअस प्रोजेक्टमध्ये अभिमानाने नावं घेतले जाईल असा आर. डी. सर्कल, सद्गुरू नगर जवळील ४ व ५ बि.एच.के. चा ‘अँटोनिया’.

**आनंदवन :** काठेगल्लीच्या छानश्या लोकेशनवर उभा राहतोयं भव्य प्रोजेक्ट ‘आनंदवन’, त्रिकोणी गार्डनजवळ, शांत रम्य ठिकाणी अत्याधुनिक सुखसोईंने सज्ज आनंदवन या परिसराची नवी ओळख बनू पाहतो आहे. रोजच्यासाठी लागणाऱ्या सगळ्या गरजा





Advotorial

अगदी हाकेच्या अंतरावर असणारा प्रोजेक्ट. २ व ३ बि.एच.के. स्पेशिअस लक्झरी तीही सर्वांना सहज परवडेल अशा दरात. बस स्टॉप, रिक्षा स्टॅण्ड, जवळच द्वारका स्टॉप, मुंबई आग्रा हायवे, पूना हायवे, रंगूबाई जुन्नरे हायस्कुल, पोद्दार स्कुल, नामांकित हॉस्पिटल्स्, पंचवटी, तपोवन, रेल्वे स्टेशन सगळं अगदी काही मिनिटांवर. सुंदर, प्रशस्त घरासोबत मुलांना खेळण्याची जागा, नेट क्रिकेट, पार्टी लॉन, क्लब हाऊस, इनडोअर गेम्स, ग्रिन जिम, मल्टीपर्पज कोर्ट, सिक्युरिटी केबिन व पुरेसं पार्कींग अशा २२ हून अधिक ॲमेनिटीज येथे आहेत. काम वेगात सुरु आहे. सॅम्पल फ्लॅट तयार आहे.

**अमृतधारा :** इंदिरानगरची शान वाढविणारा



हा प्रोजेक्ट. तसं इंदिरानगर त्यापैकीच एक. सुसंस्कृत, सुशिक्षित, संस्कारी इंदिरानगर आज कॉलेज रोड, गंगापूर रोडशी स्पर्धा करतयं. शॉपिंग मॉल असो वा सुपर मार्केट, शाळा, कॉलेजेस, इंजिनिअरींग कॉलेज, बस व



रिक्षाच्या सततच्या फेऱ्या, पेट्रोल पंप, फुड जॉईंटस्, हॉस्पिटल्स काहीही विचारा, इथे आहे सगळंच. तसं इंदिरानगर सगळ्यांच्याच सोईचं. अगदी ७०० मी. वर राजसारथी सोसायटी तर डिमार्ट मेगा मॉल व अशोका मेडिकेअर स्टार हॉस्पिटल अवघ्या ५०० मी.वर म्हणजे अगदी हाकेच्या अंतरावर. तसेच रेल्वे स्टेशनवर जायचे असो वा बस स्टँडवर, औद्योगिक नगरीत जायचे असो वा थेट शहरातल्या कोणत्याही भागात. इथून सगळचं सोईचं. प्रत्येकाला सुखाचा निवारा देणारं अगदी नावाप्रमाणं, जीवनाला संजीवनी देणारा प्रोजेक्ट. कालच्या पेक्षा आज अधिक चांगली लाईफस्टाईल हवी असेल त्या सर्वांसाठी. मोठं, छानं, देखणं घर तेही प्रत्येक खिशात सहज मावणारं. सर्वांची प्रायव्हसी जपणारं, कुटुंबातील प्रत्येकाच्या गरजा पूर्ण करणारं घर.



'अमृतधारा'मध्ये. २ व ३ बि.एच.के.चे खास साईजचे वेगवेगळे पर्याय देणाऱ्या ७ टॉवर्सचा १४ मजली भव्य प्रोजेक्ट. सुरक्षित गेटेड कम्युनिटी, २५+ जीवनावश्यक आधुनिक ॲमेनिटीजने परिपूर्ण आणि नव्या युगाशी नातं जोडणारा प्रोजेक्ट. तुम्हीही 'अमृतधारा' नक्की बघा, प्रत्येकाला सामावून घेणारा, सांस्कृतिक वारसा जपणारा. चला सुरू करु हे अमृत बांधिलकी जपणारं नवं नातं. जरुर भेट द्या. सुंदर, प्रशस्त घरासोबत मुलांना खेळण्याची जागा, नाना नानी पार्क, जिमनॅशिअम, ॲम्फिथिएटर, जागर्सकरिता ट्रॅक, पार्टीज- गेट टुगेदरकरिता क्लब हाऊस, बॉक्स क्रिकेट नेट, बास्केट बॉल रिंग, डेकोरेटिव्ह लॉबी, गार्बेज चुटे, ड्रायव्हरकरिता स्वतंत्र रुम, व्हिडिओ डोअर फोन, सिक्युरिटी केबिन आदी अनेक गरजेच्या ॲमेनिटीज येथे मिळतात.

**अँटोनिया :** सद्गुरु नगर, गोविंदनगर, आर. डी. सर्कलजवळ, सिटी सेंटर मॉल लिंकरोडवर साकारणारा, हा रवी महाजनांचा सुपर लक्झरिअस ४ व ५ बि.एच.के.चा ड्रिम प्रोजेक्ट 'अँटोनिया'. लक्झरीची व्याख्या बदलणारा, शहराची शान वाढवणारा आणि इथे रहायला येणार्या प्रत्येकाला अभिमान वाटेल व कोणालाही आपलं घर दाखवावेसं वाटेल असा प्रोजेक्ट. सर्व बाजूने ओपन असणारे व आकाशाशी स्पर्धा करणारे स्काय व्हिलाजचे टॉवर्स, भरपूर प्रकाश, खेळती हवा तुम्हाला जगण्याचा वेगळाच आनंद देतील. येथे होणाऱ्या सुपर लाईफस्टाईल ॲमेनिटीज तुम्हाला आयुष्यभर आनंद देणाऱ्या ठरतील.


'आम्ही येथे काय काय देतो आहे ते प्रत्यक्ष पहा, त्यामुळे जर तुम्ही स्वतःचा बंगला



बांधण्याचा विचार करत असाल तर तो विचार सोडा, येथे रहायला या. तुम्हाला हे घर बंगल्यापेक्षा कितीतरी अधिक लक्झुरीअस सुविधा व सुरक्षा देईल व सुसंस्कृत सोबत तुमचे स्टेटस् सिंबॉल बनेल. आम्हाला नक्की भेटा कारण घराकरिता पैसे तर कुठेही द्यायचेत आहे परंतू योग्य व आयुष्यभर साथ देणाऱ्या ठिकाणी तुमची आयुष्यभराची पुंजी लावणे व काळाबरोबर त्याचे मुल्य वाढत जाणे केव्हाही योग्य.' असे बिल्डर श्री रवी महाजन यांनी आवर्जून सांगितले.



# मादागास्कर - बुचकळ्यात टाकणारा देश



सतिश जोशी

मादागास्कर एव्हढा आपल्याला बुचकळ्यात टाकणारा देश माझ्या तरी पाहण्यात आलेला नाही.

मादागास्कर बेट भौगोलिक दृष्ट्या आफ्रिकेचा भागामध्ये गणला जातो आणि आफ्रिकेच्या किनाऱ्या पासून फक्त ४०० किमी अंतरावर आहे. तर आशिया खंडाच्या सर्वात जवळच्या टोकापासून ४००० किमी म्हणजे आफ्रिकेपेक्षा दसपटीहून अधिक दूर आहे. तरीसुद्धा मादागास्कर मधील रहिवासी वांशिक दृष्ट्या आफ्रिकेतील मूळ लोकांपेक्षा पूर्णपणे भिन्न असून इंडोनेशिया सारख्या आशिया खंडातील देशातील स्थानिक लोकांच्या जास्त जवळचे आहेत. मादागास्कर मधील मूळ भाषा आफ्रिकेत बोलल्या जाणाऱ्या कुठल्याही भाषेपेक्षा ऑस्ट्रोनेशिया - म्हणजे दक्षिण-पूर्व आशिया आणि ऑस्ट्रेलिया ह्यांच्या मधल्या सागरातील बेटांवर बोलल्या जाणाऱ्या विविध भाषांच्या जास्त जवळची आहे.

मादागास्कर अतिशय गरिबीत राहणाऱ्या लोकांचा श्रीमंत देश आहे. येथे सुपीक भूमी आहे, भरपूर पाणी आहे. इथल्या सारख्या दर्जाचे कोको बीन्स किंवा भुईमूग जगात इतरत्र क्वचितच पिकतात. इथे वनसंपत्ती भरभरून वाहते आहे (किंवा एकेकाळी तरी होती. जगात सर्वत्र विकासाच्या नावाने होणारा वनसंपत्तीचा विनाश इथेही झालाच आहे). सोनं, चांदी, तांबं, लोखंड, मँगॅनीज, ग्रॅफाइट अशी खनिजं तर विपुल प्रमाणात आहेतच पण आधुनिक जगातील काळं सोनं - खनिज तेल ह्याचाही मोठा साठा बेमोलांगा ह्या मादागास्करच्या पश्चिम किनाऱ्यावरील भागात आहे! पण तरीसुद्धा सामान्य जनतेचं जीवनमान जगातील सर्वात गरीब देशात मोडणारं आहे.

मात्र अश्या ह्या गरीब देशात स्वित्झर्लंड किंवा बेल्जियम सारख्या श्रीमंत आणि जगप्रसिद्ध चॉकोलेट उत्पादक देशात मिळणाऱ्या चॉकलेट्स एव्हढीच (किंवा त्याहीपेक्षा) उत्तम चॉकलेट्स बनविली जातात आणि एखाद्या 'बेलो त्सिरीबिहाना' सारख्या धुळीने भरलेल्या खेडेगावात - जिथे एकही पक्का रस्ता नाही आणि विद्युत पुरवठा सतत लपंडाव खेळत असतो - पत्र्याच्या टपरीत मिळणारा बॅगेट नावाचा फ्रेंच पाव पॅरिस मधील बेकरीत बनलेला असावा अश्या दर्जाचा असतो.

इथली प्रत्येक गोष्ट तोंडात बोट घालायला लावणारी आहे. येथील ८५% वनस्पती आणि प्राणी दोहोंच्या प्रजाती जगात इतरत्र कुठेही





आढळत नाहीत - झाडं, पानं, फुलं, पक्षी, कीटक, जलचर, वनचर सर्व काही इतर कोठेही पाहायला न मिळणारं!

ह्यातील काही विरोधाभासांचा उगम अर्थातच मादागास्करच्या इतिहासात आहे.

भूगर्भशास्त्रज्ञांच्या मतानुसार, सुमारे १८-२० कोटी वर्षांपूर्वी गोंडवन ह्या महाखंडाचे तुकडे होऊन - त्यातूनंच आजचे आफ्रिका, अण्टार्क्टिका, ऑस्ट्रेलिया आणि भारतीय उपखंड असे तुकडे वेगवेगळे निघाले. सुमारे ८-९ कोटी वर्षांपूर्वी मादागास्कर बेट भारतीय उपखंडा पासून तुटून वेगळं झालं. आणि आजपर्यंत एव्हढा दीर्घ काळ जगातील सर्व प्रमुख भूखंडांपासून विलग राहिल्यामुळे तेथील जीवनाची उत्क्रांती पूर्णपणे वेगळ्या वाटेनेहोत राहिली. समुद्रातून वाहून योगायोगाने मादागास्करला जी काही जीवन बीजे जगाच्या इतर भागातून पोचली असतील आणि त्यांचा स्थानिक जीवनाबरोबर संकर होऊन जे काही आनुवंशिक (Genetic) साधर्म्य मादागास्कर आणि इतर जगातील संबंधित प्रजातींमध्ये निर्माण झालं असेल तेव्हढंच.

उदाहरणार्थ - मादागास्करचे लीमर! सुमारे ६-७ कोटी वर्षांपूर्वी Primate ह्या गटातील प्राण्यांच्या (ज्यामध्ये मानवसकट, माकड, वानर, गोरिला, लोरीस वगैरे मोडतात) वंशवेली कुठल्यातरी समाईक पूर्वजापासून वेगवेगळ्या होऊ लागल्या. आणि त्याच सुमारास झालेल्या भूगर्भातील उलथापालथीमुळे विलगलेल्या मादागास्करवर अडकलेल्या ह्या पूर्वजांची पुढची उत्क्रांती आपल्या भाऊबंदांपेक्षा वेगळ्या वाटेने होऊन त्याची परिणीती आज दिसणाऱ्या, वांशिक दृष्ट्या जगातील इतर सर्व primate पेक्ष्या भिन्न अश्या लीमरमध्ये झाली. पहा पहिला फोटो किंवा Travellers Palm सारखं झाड. आज ते (त्याच्या विचित्र रुपामुळे) जगभरातील बागांमध्ये मुद्दाम लावलेलं तुम्हाला दिसेल (आपल्या पार्ल्यात सुद्धा खूप पूर्वी मी शाळेत असताना तृप्ती हॉस्पिटलच्या आवारात हे पाहिलेलं मला आठवतं). पहा दुसरा फोटो. पण फक्त मादागास्कर मध्येच ते निसर्गतः उगवतं. हे फार मजेचं (आणि उपयुक्त सुद्धा) झाड आहे. एकतर ते नारळाच्या खोडावर झावळी ऐवजी केळ्याची पानं उगवल्या सारखं दिसतं. ही पानं इतर झाडांसारखी चौफेर न उगवता



एका पूर्व-पश्चिम सरळ रेषेत उगवतात. त्यामुळे अरण्यात चुकलेला वाटसरू पानांच्या रांगेची दिशा पाहून आपण कुठे जायला हवं ते ठरवू शकतो. ह्याच्या खोडातील कप्प्यात साठलेलं पाणी (जरी घाण वासाचं असलं तरी) कंठशोष झालेल्या प्रवाशाची तहान भागवू शकतं. त्याची कोवळी पानं किंवा खोडाचा मऊ गाभा शिजवून भूक भागवता येते. आणि त्याच्या रुंद पानांपासून कामचलाऊ छत बांधून पावसा-पाण्यापासून आसरा ही मिळवता येतो. आता तुम्हाला कळलं असेल त्याला Traveller's Palm का म्हणतात किंवा गेको सारखे आश्चर्यकारक प्राणी. गेको (सरड्याची एक जात) जगभर सर्वत्र आढळतात. पण फक्त मादागास्कर गेको कमालीचे छद्मवेषी आहेत - ते आपल्या कातडीचे रंग आणि त्यावरील आकृतिबंध, ते ज्या फांदीवर बसले आहेत त्याच्याशी एव्हढे बेमालूम जुळवू शकतात, की तुमचं नाक त्या फांदीला चिकटेल एव्हढ्या जवळ गेलात तरी तुम्हाला तो गेको नक्की कुठे बसला आहे हे दिसत नाही. पहा तिसरा फोटो गेकोला लपायला वेळ मिळायच्या आधी काढलेला. आता चौथ्या फोटोत पहा तुम्हाला लपलेला गेको दिसतो आहे का?

लीमर इतकंच मादागास्करचं प्रतीक म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत ते बाओबाबचे वृक्ष. खरंतर बाओबाब आफ्रिका खंडात आणि ऑस्ट्रेलियात सुद्धा निसर्गतः उगवतात आणि आता तर जगभर सगळीकडे ते लावले गेले आहेत. मुंबईत सुद्धा शंभर पेक्षासुद्धा जास्त बाओबाब आहेत. पण मादागास्करसारखं दाटीवाटीने वाढलेलं बाओबाबचं जंगल इतरत्र क्वचितच दिसेल. बाओबाब दीर्घकाळ जगणारं (आणि कदाचित म्हणूनच) स्थानिक संस्कृतीत महत्वाचं स्थान असलेलं झाड आहे. किरिंडी गावातील - स्थानिकांच्या मते ३००० वर्ष जुन्या - बाओबाब वृक्षाची देवासारखी पूजा केली जाते. मला पायातले बूट काढून त्याच्या पुढे डोकं झुकवून मगच त्याचा फोटो काढता आला. मात्र बाओबाब वृक्षाचं सौन्दर्य पाहायचं असेल तर मुरुंदावा (Morondava) शहरापासून थोड्या अंतरावरील बाओबाब ऍलीला भेट द्यावी लागते. सूर्यास्ताच्या वेळेचे हे पहा बाओबाब ऍलीमधील दोन नेत्रदीपक फोटो.

निसर्गसौन्दर्य तर मादागास्करला भरभरून मिळालं आहे. निळ्याशार सागराला चमकत्या चांदीचा काठ असणारे किनारे आहेत, हिरव्या रंगाच्या लाखो छटा मिरवणारी घनदाट अरण्यं



आहेत. अँडासिबेला रेनफॉरेस्ट आहे, किरिंडीला पानगळीची (Deciduous) अरण्यं आहेत. मध्यभागात डोंगरदऱ्या आहेत, दक्षिणेकडील भागात सोनेरी वाळूच्या लाटांची वाळवंटं आहेत. बर्फ फक्त कुठेही पडत नाही. तेव्हढा एक सोडून, जो म्हणाल तो निसर्गाचा अविष्कार तुम्हाला इथे मिळेल. पहा अँडासिबेच्या सुंदर जंगलाचा, तिथे गोल्डन सीफाका लीमर (पहिल्या फोटोतला) शोधात फिरताना काढलेला फोटो.

ह्या सर्व निसर्गाविष्कारातील एका विशेष अद्भुत जागेबद्दल मी पूर्वीही लिहिलं होतं पण त्याची पुनरुक्ती करायचा मोह आवरणं शक्य नाही. शतकानुशतके पावसाच्या धारांनी कातले गेल्यामुळे बेकोपका गावाजवळील सुमारे साडेतीन लाख एकर क्षेत्रात एकेकाळच्या चुनखडीच्या डोंगरातील सर्वात कठीण भागाचे उंच उंच अणकुचीदार सुळके फक्त शिल्लक राहिले आहेत. त्याच काळात जमीनीवर वाहणाऱ्या नदी-नाले-झऱ्यांनी ह्या डोंगरांचा पाया पोखरून त्यांच्या गर्भात विस्तीर्ण गुहा खोदल्या. एकाच वेळी दोन्ही बाजूने होणाऱ्या ह्या निसर्गाच्या खोदकामामुळे बहुतेक गुहांची छतं विच्छिन्न होऊन उभारलेल्या भाल्याच्या फाळासारखे किंवा करवतीच्या पात्यासारखे त्यांचे तुकडे मात्र शिल्लक राहिले. हे आहे आजचं त्सिंगी नॅशनल पार्क. त्यातून जाणाऱ्या अभिमन्यूच्या चक्रव्यूहासारख्या फसव्या आणि चिंचोळ्या वाटेवरून न धडपडता (आणि ह्या भाल्याच्या फाळांवर हातपाय कापून न घेता) वरच्या शिखरावर पोचल्यावर दिसतो तो उभारलेल्या तलवारींचा क्षितिजापर्यंत पसरलेला सागर! पहा आठवा आणि नववा फोटो. केवळ अद्वितीय.



इतरत्र आफ्रिकेत आपल्या झीर्स्सू पूर्वजांपासून सुमारे २० लाख वर्षांपूर्वी मानव वंशाची (Genus 'Homo') उत्क्रांती झाली. मात्र मादागास्कर वरील झीर्स्सू ची उत्क्रांती कधीच मानवसदृश प्रजाती मध्ये झाली नाही.

त्यामुळे मादागास्करमध्ये मानवी वस्ती फार अर्वाचीन काळात प्रथम झाली. सुमारे ख्रिस्तपूर्व ३५० ते ख्रिस्तोत्तर ५०० ह्या कालखंडात आजच्या दक्षिण बोर्निओ बेटावरून आलेले दर्यावर्दी हे येथील प्रथम रहिवासी. म्हणूनच त्यांची भाषा इंडोनेशियन भाषेशी (कुठलीही आफ्रिकन भाषेपेक्ष्या) आणि त्यांचे कित्येक सांस्कृतिक आचार दक्षिण-पूर्व आशियातील संस्कृतीशी साधर्म्य दाखवणारे आहेत. उदाहरणार्थ हा दहावा फोटो पहा. हे वालीहा नावाचं मादागास्करचं राष्ट्रीय वाद्य आहे. एका पोकळ बांबू सभोवती बांधलेल्या तारा छेडून हे वाजवलं जात. ह्याचं मूळ इंडोनेशियात हजारो वर्षांपासून आजही वाजवल्या जाणाऱ्या अश्याच तंतुवाद्यात आहे.



नंतर ७ व्या शतकात अरब व्यापारी येथे येऊन पोचले, १० व्या शतकात आफ्रिकेतील बांटू लोकं आणि ११ व्या शतकात दक्षिण भारतीय लोकांनी मादागास्कर मध्ये वस्ती केली. त्यांनीच झेबू (गायींची एक जात) येथे आणून गोपालनाला सुरुवात केली. त्यामुळे आजच्या मालागासे लोकांत ह्या सर्व भिन्न-भिन्न वंशांची सरमिसळ दिसते. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी फ्रेंच सैन्याने बळजबरीने राणी रानावलोनाला कैद करून रियुनियन बेटावर डांबून ठेवलं आणि मादागास्कर फ्रेंच राजवटीचं गुलाम बनलं. जे सर्वच युरोपिअन वसाहतींमध्ये झालं तसंच मादागास्करलाही फ्रेंचांनी लुटून रावाचं रंक बनवलं. स्वातंत्र्य मिळाल्यावरही मादागास्करच्या अर्थव्यवस्थेवरील फ्रेंच पकड अनेक दशके पक्की होती. त्यामुळे स्थानिक मालगासे जनतेचं दारिद्र्य कायम राहीलं.

मात्र दुसऱ्या बाजूला फ्रेंच लोकांनी आपली खान-पान संस्कृतीही थोड्याफार प्रमाणात इथे आणलीच. मादागास्कर मधील खाण्या-पिण्यातील युरोपियन छटा आणि गुणवत्ता (चॉकलेट्स, बॅगेट, कॉफी, पेस्ट्री इ.) ह्यांचं मूळ ह्या फ्रेंच प्रभावातच असणार!



युक्रेन आणि रशिया



सोडून मादागास्कर हा युरोपमधील कुठल्याही देशापेक्षा मोठा देश आहे. मी तिथे दोन आठवडे काढून सुद्धा फक्त मध्यभागातील हायलँड्स आणि पश्चिमेकडील मुख्यतः मानांबोलो नदीच्या खोऱ्यातील प्रदेश पाहू शकलो. अजून तिथल्या चोकोलेट्सची आणि कोबा (तांदुळाचं आणि शेंगदाण्याचं पीठ, गूळ किंवा ब्राउन शुगर, कधीकधी मध आणि पिकलेली केळी ह्यांचे थर केळ्याच्या पानात गुंडाळून शिजवून केलेला हलवा - पहा शेवटचा फोटो) आठवण आली तरी तोंडाला पाणी सुटतं. जे पाहिलं/अनुभवलं त्यापेक्षा कितीतरी राहून गेलं. त्यासाठी पाहूया पुन्हा कधी योग्य येतो आहे ते.




**सतिश जोशी**

हॅपिनेस फॅक्टरी ह्या फायनान्शिअल टेकनॉलॉजि कंपनी मध्ये सध्या कार्यरत. मागील ३६ वर्ष TIFR, Patni Computer Systems, Igate Technologies ई. संस्थांमध्ये Computing Technology R&D आणि Innovation क्षेत्रात काम, २०१४ साली स्वेच्छा निवृत्त.

# सकल जनांचा आधारू!



सन्मित्र बंबेरकरकडे गेलो आणि समोरचं दृश्य बघून मला वेड लागलं नाही ही मी परमेश्वराची कृपा समजतो! बंब्या चटईवर मांडी घालून बसला होता. लहान मुलं एकमेकांना चिडवतात तशी त्याने जीभ बाहेर काढली होती आणि तो स्वत:च्याच डोक्यावर चापट्या मारत होता. मी टरकलो. याचं असं अचानक काय झालं? दोन- एक आठवड्यांपूर्वी तर तो ठीक होता. माझा भेदरलेला चेहरा पाहून वहिनी म्हणाल्या, ''व्यायाम चालू आहे.''

'व्यायाम हा असा?' मी काय घाबरलो होतो! ''सकाळ संध्याकाळ पंधरा मिनिटं केल्यावर हृदयविकाराचा धोका राहात नाही म्हणे.''

''कोणी लावला हा शोध?''

''ठाऊक नाही. आजकाल वॉटसपवर वाट्टेल ती माहिती मिळत असते!''

व्यायाम आटोपल्यावर बंब्या म्हणाला, ''तू सुद्धा दिवसातला अर्धा तास या व्यायामाला दे. पुढे किती व्याप, ताप आणि मुख्य म्हणजे पैसे वाचतील, कल्पना आहे? आरोग्यविमासुद्धा काढायला नको!'' मी दोन्ही कान पकडून त्याला स्पष्ट नकार दिला. बंब्या चटकन म्हणाला, ''बरी आठवण केलीस. तुला आणखी एक प्रकार दाखवतो.'' त्याने दोन्ही कानपाळ्या खालच्या बाजूने पकडून जीभ बाहेर काढली आणि नंतर वरची बाजू पकडून जीभ आत नेली. ''पुढे पुढे जीभ आपोआपच आत बाहेर करू लागेल.'' ''याने काय होतं?'' मी कुतूहलाने विचारलं.

''केस गळत नाहीत. कदाचित काही वर्षांनी मोकळ्या डोक्यावरही रान उगवू लागेल!'' आपल्या सुदृढ देहाची हा बंब्या काशी करून टाकणार याविषयी माझ्या मनात संदेह उरला नाही. बंब्याची मला चिंता वाटू लागली. एवढयात तो म्हणाला, ''हे प्रकार तू ट्रेनमध्ये, रस्त्यावर, ऑफिसमध्ये, कुठेही करू शकतोस.'' मी लोकलमध्ये हे प्रकार करतोय आणि सहप्रवासी माझा विडिओ काढताहेत असं चित्र माझ्या नजरेसमोर तराळून गेलं आणि मी दोन्ही हात कानावर ठेवून किंचाळलो, ''नाही!''

''तू लोकांचा विचार करू नकोस. आपली तब्येत, आपली जबाबदारी!'' बंब्या म्हणाला.

दोनच दिवसांनंतरचा प्रसंग. रस्त्याने चाललो असता पलीकडच्या बाजूने एक पुरुष व एक महिला, 'नीचे मुंडी वॉटसप धुंडी' अवस्थेत एकमेकांसमोर आले आणि साहजिकच त्यांची टक्कर झाली. मनुष्यसुलभस्वभावानुसार बाईने लगेच, ''डोळे फुटले का?'' विचारलं.

''दोघांनाही दिसतंय म्हणून तर आपलं हे असं झालं!'' असं सहजपणे म्हणून तो शांतपणे निघून गेला.

मोबाईलच्या करामती दिवसेंदिवस वाढतच चालल्या आहेत. त्याविषयी माझ्या मनात वारंवार काही प्रश्न उभे राहतात. उदाहरणार्थ,



सुधीर सुखठणकर

एरव्ही सतत, ''क्षणभर उसंत मिळत नाही.'' अशी तक्रार करणारे तासनतास मोबाईलला मात्र चिकटलेले असतात. मोबाईलमुळे मानेवर परिणाम होत नाही का? डोक्यावर तर तो आधीच झाला आहे! म्हणजे आपली स्मरणशक्ती क्षीण पावत चालली आहे. आपल्याला आता काहीही लक्षात ठेवावं लागत नाही. सगळं काही मोबाईलवर असतं.

आमच्या सोसायटीत प्रा. घोटीगावकर राहतात. या सद्गृहस्थांचा अनेक विषयांवर सखोल अभ्यास आहे. ते सदैव ग्रंथांत तर बुडालेले असतातच.शिवाय अनेकांशी, विशेषतः तरुण पिढीच्या संपर्कात राहून ते आपल्या ज्ञानभंडारात सतत भर घालीत असतात.

मी संध्याकाळच्या वेळेला गेलो. त्यांच्या समोर 'भरलेला' ग्लास होता. त्यांनी मलाही ऑफर केली. पण एवढया मोठ्या विद्वानासमोर अपेयपान करणं मला प्रशस्त वाटलं नाही. तेही म्हणाले, ''ग्लास मी फक्त ऑफर करतो. आग्रह करीत नाही." त्यांनी आपला मोबाईल बाजूला ठेवला आणि म्हणाले, 'बोला!"

''सर, वाचनसंस्कृती लयाला चालली आहे, म्हणून आपण कोकलत असतो. पण पाहावं तेव्हा आणि तिथे लोक मोबाईलवर काहीबाही 'वाचत' असतात."

''तुमच्या प्रश्नाचं उत्तर देण्याआधी मी एक दुरुस्ती करतो. लोक वाचण्यापेक्षाही 'बघत' असतात. तर, विडिओ माणसाच्या डीएनएतच आहे. आदिमानव चित्रलिपीद्वारेच परस्पराशी संवाद साधत होता. यावरून आठवलं, मी एका तरुणाला म्हटलं, 'लोकलमधल्या चेंगराचेंगरीत उभ्या उभ्या विडिओ बघण्याची एवढी काय तातडी असते रे?"

''मलाही नेहमी हाच प्रश्न पडतो." मी म्हणालो.

तर तो म्हणाला, 'आधी आम्हाला कधी एकदा स्टेशन येतं असं होऊन जायचं. ट्रेन मध्येच थांबली की आम्ही रेल्वेला शिव्या द्यायचो. आता विडिओमुळे तिथे ट्रेनचं काय चाललं आहे इकडे आमचं लक्षच नसतं. काहीजण तर विडिओ संपेपर्यंत ट्रेनमधून उतरतच नाहीत. ब्रह्मानंदे लागली टाळीचा अनुभव घ्यायचा असेल, तर विडिओला पर्याय नाही.' 'सदावर्ते, आज प्रत्येकाच्या कानात श्रवणबुचं असतात. पूर्वी मोकळ्या कानाची बाई टोमण्यांचा विषय व्हायची. आता प्रत्येक पुरुषाला कानात नीलदंत टाकावाच लागतो."

''नीलदंत?"

''म्हणजे ब्ल्यू टूथ हो! तो कानात नसेल तर तो माणूस मागासलेला ठरतो."

''सर, कधीपासून मला एक प्रश्न छळतो आहे. तरुण पिढी वॉटसप, मुखपुस्तिका, यू ट्यूबवरची माहिती वाचते. पण पुस्तक सोडा, साधं वर्तमानपत्रसुद्धा वाचत नाही." मी मूळ प्रश्नाला घट्ट चिकटून राहिलो.

''कागदाची ॲलर्जी हो! दुसरं काहीही नाही. काही मुलांचं तर अगदी लहानपणापासूनच कागदाशी हाडवैर असतं. निसर्गधर्मासाठी त्यांना कागदावर बसवलं, तर ती उठून




दुसरीकडे जाऊन बसतात. अभ्यासाच्या नावाखाली पुढे पंधरा वीस वर्षं हा कागदच आपल्याला छळत राहणार याची अगदी बालवयातच त्यांना जाणीव होत असावी आणि शिक्षण पूर्ण झाल्यावर ती कागदावर कायमचा बहिष्कार टाकत असावीत. दुसरं असं की, पुस्तकशत्रूंमध्ये आता वयाचा भेद राहिलेला नाही. माझ्या ओळखीत अनेक ज्येष्ठ आहेत, जे पुस्तक उघडल्यावर तिसऱ्या ओळीतच घोरू लागायचे. तेच आता मोबाईलवर तासनतास वाट्टेल ते वाचत असतात. वर वाचलेलं आणि न वाचलेलंही फॉरवर्ड करत राहतात. त्यांना वाचायला काहीही चालतं."

''सर, मला वाटतं, हे बाटगे वाचक आहेत! चोखंदळ वाचकाची स्वतःची आवड असते. कोणाला कथा आवडेल, कोणाला कादंबरी, तर कोणाला कविता! कोणी विनोदी साहित्यात रमून जाईल, तर कोणी चक्कम्हणजे आपली स्मरणशक्ती क्षीण पावत चालली आहे. आपल्याला आता काहीही लक्षात ठेवावं लागत नाही. सगळं काही मोबाईलवर असतं.''

आमच्या सोसायटीत प्रा. घोटीगावकर राहतात. या सद्गृहस्थांचा अनेक विषयांवर सखोल अभ्यास आहे. ते सदैव ग्रंथांत तर बुडालेले असतातच. शिवाय अनेकांशी, विशेषतः तरुण पिढीच्या संपर्कात राहून ते आपल्या ज्ञानभंडारात सतत भर घालीत असतात.

मी संध्याकाळच्या वेळेला गेलो. त्यांच्या समोर 'भरलेला' ग्लास होता. त्यांनी मलाही ऑफर केली. पण एवढया मोठ्या विद्वानासमोर अपेयपान करणं मला प्रशस्त वाटलं नाही. तेही म्हणाले, ''ग्लास मी फक्त ऑफर करतो. आग्रह करीत नाही." त्यांनी आपला मोबाईल बाजूला ठेवला आणि म्हणाले, ''बोला!"

''सर, वाचनसंस्कृती लयाला चालली आहे, म्हणून आपण कोकलत असतो. पण पाहावं तेव्हा आणि तिथे लोक मोबाईलवर काहीबाही 'वाचत' असतात."

''तुमच्या प्रश्नाचं उत्तर देण्याआधी मी एक दुरुस्ती करतो. लोक वाचण्यापेक्षाही 'बघत' असतात. तर, विडिओ माणसाच्या डीएनएतच आहे. आदिमानव चित्रलिपीद्वारेच परस्पराशी संवाद साधत होता. यावरून आठवलं, मी एका तरुणाला म्हटलं, 'लोकलमधल्या चेंगराचेंगरीत उभ्या उभ्या विडिओ बघण्याची एवढी काय तातडी असते रे?"

''मलाही नेहमी हाच प्रश्न पडतो." मी म्हणालो.

तर तो म्हणाला, ''आधी आम्हाला कधी एकदा स्टेशन येतं असं होऊन जायचं. ट्रेन मध्येच थांबली की आम्ही रेल्वेला शिव्या द्यायचो. आता विडिओमुळे तिथे ट्रेनचं काय चाललं आहे इकडे आमचं लक्षच नसतं. काहीजण तर विडिओ संपेपर्यंत ट्रेनमधून उतरतच नाहीत. ब्रह्मानंदे लागली टाळीचा अनुभव घ्यायचा असेल, तर विडिओला पर्याय नाही. सदावर्ते, आज प्रत्येकाच्या कानात श्रवणबुचं असतात. पूर्वी मोकळ्या कानाची बाई टोमण्यांचा विषय व्हायची. आता प्रत्येक पुरुषाला कानात नीलदंत टाकावाच लागतो."

''नीलदंत?"

''म्हणजे ब्ल्यू टूथ हो! तो कानात नसेल तर तो माणूस मागासलेला ठरतो."

''सर, कधीपासून मला एक प्रश्न छळतो आहे. तरुण पिढी वॉटसप, मुखपुस्तिका, यू ट्यूबवरची माहिती वाचते. पण पुस्तक सोडा,

साधं वर्तमानपत्रसुद्धा वाचत नाही.'' मी मूळ प्रश्नाला घट्ट चिकटून राहिलो.

''कागदाची ॲलर्जी हो! दुसरं काहीही नाही. काही मुलांचं तर अगदी लहानपणापासूनच



कागदाशी हाडवैर असतं. निसर्गधर्मासाठी त्यांना कागदावर बसवलं, तर ती उठून दुसरीकडे जाऊन बसतात. अभ्यासाच्या नावाखाली पुढे पंधरा वीस वर्षं हा कागदच आपल्याला छळत राहणार याची अगदी बालवयातच त्यांना जाणीव होत असावी आणि शिक्षण पूर्ण झाल्यावर ती कागदावर कायमचा बहिष्कार टाकत असावीत. दुसरं असं की, पुस्तकशत्रूंमध्ये आता वयाचा भेद राहिलेला नाही. माझ्या ओळखीत अनेक ज्येष्ठ आहेत, जे पुस्तक उघडल्यावर तिसऱ्या ओळीतच घोरू लागायचे. तेच आता मोबाईलवर तासनतास वाट्टेल ते वाचत असतात. वर वाचलेलं आणि न वाचलेलंही फॉरवर्ड करत राहतात. त्यांना वाचायला काहीही चालतं.''

''सर, मला वाटतं, हे बाटगे वाचक आहेत! चोखंदळ वाचकाची स्वत:ची आवड असते. कोणाला कथा आवडेल, कोणाला कादंबरी, तर कोणाला कविता! कोणी विनोदी साहित्यात रमून जाईल, तर कोणी चक्क'आता ते नातं दुरावल्याचा तुम्हाला त्रास नाही होत?''

''या युगात सेंटी होऊन नाही चालत! शिवाय आपण मित्र, नातेवाईक धरून फार फार तर किती नाती जपणार? शंभर दीडशे! वॉटसप आपल्याला हजारो नाती जोडून देतो. बरं, काही नात्यांत खंड पडला, तर कधीही एखादा जोक पाठवून नातं पुनर्जीवित करता येतं आणि ते भेटींचं सोडा हो! सदावर्ते, तुम्ही कधी कविता किंवा लेख लिहिला आहे का?''

''छे हो! आमचं कोण छापणार?''

''नाहीच छापणार! कारण संपादकाच्या खुर्चीत एक खडूस, निष्ठुर माणूस बसलेला असतो. तो नवीन लोकांना संधी देणारच नाही. वॉटसप मात्र सर्वांना आपल्या कवेत घेतं. वॉटसपामुळे आता कविजनदेखील साध्या भोळ्या माणसांना वेठीस धरत नाहीत. वॉटसपवर आपली ताजी फडफडीत कविता टाकून देतात. दलित साहित्यानंतर आता हौशी साहित्याचा काळ आलेला आहे. बरं, ते वाचण्याची सक्ती नाही. पाठवणाऱ्याला एक अंगठा टाकून ते फॉरवर्ड करून टाकलं की झालं! वाचलं का हे तुम्हाला कोणी विचारतदेखील नाही.''

''मला फायदे मान्य आहेत सर! पण एका प्रश्नाने माझी झोप उडवलेली आहे. सतत मोबाईलमध्ये असल्यामुळे माणसाची मान अवनत होऊ लागली आहे. काही वर्षांनी कदाचित त्याला मान सरळ ठेवताच येणार नाही. कधीही भ्रष्ट मार्गाचा अवलंब न केलेला, नियमितपणे आयकर भरणारा, कुणाचंही कर्ज न बुडवलेला माणूसही भविष्यात ताठ मानेने चालू शकणार नाही! पुढल्या पिढया तर कदाचित खालमानेनेच या जगात प्रवेश करतील!''

''सदावर्ते, त्याला इलाज नाही. आदिमानवाचं चित्र पाहिलंत, तर तो मानेत वाकलेलाच होता. मोबाईलमध्ये उत्क्रांतीचं वलयदेखील पूर्ण करण्याची क्षमता आहे!''

**सुधीर सुखठणकर**

९८९२७६५७४९

सुधीर सुखठणकर, गेली ३५ वर्षे विनोदी लेखन. महाराष्ट्र टाइम्स, सांज लोकसत्ता, लोकप्रभा तसेच अन्य अनेक वृत्तपत्रांतून विनोदी स्तंभलेखन, दिवाळी अंकांतून विनोदी कथा, लेख. आवाज, मोहिनी, आश्लेषा, साहित्य, साहित्य मैफल, बेळगाव तरुण भारत, श्री व सौ, वगैरे प्रथितयश दिवाळी अंकांसाठी लेखन.

# ज्येष्ठ

सहवासाचा चैत्र
संपला.
वैशाखाचा वणवा
विझला.
'ज्येष्ठ' जाहलो
आपण दोघे
आणि अचानक डोळ्यांमध्ये
आषाढाचा मेघ दाटला!

आठवणींचा रिमझिम श्रावण
किती लांबला आहे...
काय आपल्यासाठी तेथे,
काळ थांबला आहे?



**सदानंद डबीर**
(९८१९१७८४२०)

**परिचय-** कवी,गीतकार,गजलकार. सुरेश भटांनंतरच्या पिढीतले महत्वाचे गजलकार. एकूण चौदा पुस्तके प्रसिद्ध. त्यात आठ गजलकाव्य संग्रह. तसेच दुष्यंत कुमारांच्या गजलसंग्रहाचा मराठी समश्लोकी अनुवाद.
अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचा नव्या नाटकांसाठी गीत लेखनाचा सातत्याने चार वर्षे पुरस्कार.

**दिवाळी अंक सहभाग -** शब्द रुची,दर्याचा राजा,अधोरेखित, गजल मंथन,ता-यांचे जग.
ह्या दिवाळी अंकात कविता/गजल प्रकाशित.


सरकारी कोट्यातून फ्लॅट मिळवण्याच्या फंदात
कशाला पडलाय? प्रस्थापित सरकारविरोधात फेक रिपोर्टस्
फेक न्यूज चालवा- गॅरंटेड बंगला
नी व्हा मालामाल
चीन स्पॉन्सर
न्यूजलीक
अशी ही फेकाफेकी
श्रीनिवास
प्रभुदेसाई
'फेक न्यूज-प्रूफ' चॅनेल
चालवणार असाल तरच
लोन मिळेल!
सच्चु बँक
ऑफ इंडिया


और ये है एक करोड का प्रश्न -
सिने क्षेत्रातले बिग बी कोण?
१) भरत जाधव २) भरत दाभोळकर
३) भारत भूषण ४) बच्चन ज्युनियर
कौन बनेगा
करोडपती
डीप-फेक
चाबकी!


तुमच्या नंबर एकवाला चॅनेल, फेक-न्यूज, फेक रिपोर्टिंगवर चालवल नसाल तर मोठा धोका संभवतो. विमा उतरवा पटापट.
ZU TA TV
विमा एजंट



खबरदार ! याद राखा!
चांद्रभूमी बदनाम कराल तर
फेकन्यूज
पसरवाल तर !



यमराज, फेक न्यूज, फेक रिपोर्टिंगचा हा
बादशहा आहे ! त्याला नरकातसुद्धा थारा देऊ नका!
मधेच लटकावा...


फेक न्यूज, टी.व्ही.वरच्या वायफळ चर्चांचे अजीर्ण झालाय, मेंदू गंजलाय! ताबडतोब पेपर, न्यूज पाहणे, वाचणे बंद करा ह्यांचं!
डॉ. खरे M.D.


फेक रिपोर्टींग न केल्याने मिडियाहाऊसने ही वेळ माझ्यावर आणली

# अनुत्तरीत प्रश्न

तू  हरायला तयार नसतोस
आणि ...
मला जिंकायचं असतं
याच कारणासाठी चाललेला असतो
नित्य भावनांशी खेळ

न बोलताच
बरंच काही बोलून जातोस
तुझे निशब्द हावभाव
खुडवत राहतात
भावनांच्या कळ्या
रात्रभर...
अंगार फुलवत

मग हळूहळू मालवून जातं
मौनातलं चांदणं
अंधारलेलीच  राहते  पहाट
अन् दिवसालाही लागतं ग्रहण

ओसरून जातो मोसम
तेव्हा...
प्रश्न अनुत्तरीत राहतो
कोण जिंकलं अन्
कोण हरलं...



**लता गुठे**
९८७०६१७१२४
**परिचय**
लेखिका, प्रकाशिका, संपादिका म्हणून साहित्य क्षेत्रात केली पंधरा वर्षे कार्यरत. विविध विषयावर २१ पुस्तके प्रकाशित.  भरारी प्रकाशनातर्फे २५० पेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित. तार्‍यांचे जग व धमाल मस्ती या दोन दिवाळी अंकांचे गेली १३ वर्षे संपादन करतात. ४२ पेक्षा जास्त राज्यस्तरीय  पुरस्कार.
**दिवाळी अंक सहभाग -**
 अधोरेखित, झपुर्झा, मायबोली आरती, उर्मी, रत्नागिरी टाइम्स, जाणीव मनातली, खतरनाक, तार्‍यांचे जग, धमाल मस्ती या दहा दिवाळी अंकासाठी लेखन.

# चिमण्या

लहानपणी ना, मला खूपच हौस होती.

भल्या पहाटे उठून मी जायची माझ्या बाबांबरोबर ,

सेंटरवरती मिळणारं,काचेच्या बाटलीतलं आरेचं दूध आणायला.

तेव्हा---- तेव्हा माझा चिमुकला हात असे माझ्या बाबांच्या हातात

विसावलेला---- आश्वस्त

आणि माझ्या चालीनं चालण्यासाठी बाबांचीही पावलं होत

मंद---- मंद---

त्या पहाटवेळी वाटेतल्या हिरव्यागार झाडांवर

चालत असे चिमण्यांचा अखंड चिवचिवाट

तेव्हा वाटायचं की झाडाच्या प्रत्येक पानापानामागे                एकेक चिमणी लपून बसलीये की काय ?

मी झाले मोठी तेव्हा एक गाणं रेडियोवर नेहमी लागत असे,

बाबुल हम तेरे आंगन की चिडिया.

तेव्हा ---- तेव्हा मला ते चिमण्यांनी गदगदलेलं झाडच आठवायचं.

आज दूध तर काही आणायचं नसतं. भल्या पहाटे मी उठते ती मॉर्निंग वॉकला जायला.

तेव्हा वाटेत मला झाडं भेटतात—अबोल,नि:शब्दपणे उभी असलेली.

तेव्हा मला वाटतं, खरंच,कुठं गेल्या सा-या चिमण्या ?

बाबुल.बाबुल, अरे सांग ना, कुठं गेल्या चिमण्या ?



**सविता दामले**
९९३०३११५४६
**परिचय**
मराठी अनुवादिका, लेखिका, कवयित्री असून त्यांनी पत्रकारितेची पदविकाही घेतली आहे.राजहंस, मनोविकास, पॉप्युलर, मेहता अशा मराठीतील प्रसिद्ध प्रकाशकांसाठी ५० च्या वर इंग्रजी पुस्तक अनुवादित केली आहे. अनुवादासाठी अनेक राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.

**दिवाळी अंक सहभाग-**

 ऋतुरंग, अक्षरगंध, विपुलश्री आणि शैव प्रबोधन अशा चार दिवाळी अकांत लेख व कविता  आहेत.

# वाहत्या नदीच्या काठी


बागडत जाणाऱ्या नदीशी
हृदयस्पर्शी हितगुज करणं
प्रत्येकाला जमेलच असं नाही

जीवावर उदार होऊन
मारली असेल ज्यांनी उडी
तिच्या अवखळ पात्रात
त्यांनाच कळेल तिचं मन

असं वाटतं की
कुणीतरी घेतला असेलच ठाव
तिच्या खोल तळाचा

तरीही वाहत्या नदीच्या काठी बसून
नदीच्या लहरींशी हितगुज करणारा
दिसेलही एखादा चुकार कवी

जो लिहीत बसला असेल
नदीची रसधार गाथा
तिच्या वाहत्या जलधारेवर
आपल्या मनस्वी शब्दांना रेखाटत



**रमेश नागेश सावंत**

९८२१२६२७६७

**परिचय**

कवी , लेखक, अनुवादक आणि मुक्त पत्रकार

२५ राज्य पुरस्कार प्राप्त 'गहिवर' हा पहिला कवितासंग्रह (२०१२) , त्यांनंतर 'एकांतातल्या कविता', 'सूर गजलेचे' ( अ. भा.वसंत राशिनकर पुरस्कार ), 'जंगलगाथा'( तीन राज्यस्तरीय पुरस्कार ), 'मी देशाचा सातबारा लिहिन म्हणतो' ( संत नामदेव साहित्य पुरस्कार ) हे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत.गेल्या दहा वर्षांत २०० पुस्तकांची परीक्षणे विविध मासिकात आणि दैनिकात प्रसिद्ध झाली आहेत. 'ती चिनारची झाडे' आणि 'ओस की बूंद (हिंदीत ) ही अनुवादित पुस्तके प्रकाशित. या वर्षी ' होमी भाभा ' या पुस्तकाद्वारे बालसाहित्याच्या क्षेत्रात प्रवेश. डिसेंबर महिन्यात ' चिवचिव गाणी ' हा पहिला बालकविता संग्रह प्रकाशित होणार आहे.

**दिवाळी अंक सहभाग -** आश्लेषा, विश्वभ्रमंती या दिवाळी अंकात लेख.



**दिपा मांडलिक**

**परिचय**

२०१३ पासून अनेक दिवाळी अंकासाठी सातत्याने लेखन करीत विविध साहित्य प्रकार हाताळले आहेत. लेखिका प्राचीन मंदिराच्या अभ्यासक असून या विषयावरील त्यांच्या ' पराक्रमी हिंदू राजांची अद्वितीय मंदिरे ' या पुस्तकाला वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

**दिवाळी अंक सहभाग**

नवल दिवाळी अंक - प्रभावतीगुप्ता : प्राचीन महाराष्ट्रातील कर्तृत्ववान राज्यकर्ती

चंद्रकांत दिवाळी अंक - सप्त मतृका: एक प्रगल्भ संकल्पना

जत्रा दिवाळी अंक - द्राविडी प्राणायाम (विनोदी कथा)

आवाज दिवाळी अंक - काळाचा महिमा (विनोदी कथा)

आश्लेषा दिवाळी अंक - निसर्गाच्या कुशीतील सृजन ठेवा : टहाकरी, जगदंबा मंदिर

हेमांगी दिवाळी अंक - महाराष्ट्राचे आद्य लोक वाङ्मय : गाहा सत्तसई

# अर्थ काढणे म्हणजे पाप...

श्यामराव जगला फक्त देवासाठी
देवदेव करण्यात आयुष्य गेले
ना त्याने कधी कविता ऐकली
ना त्याने कधी कादंबरी वाचली ना
त्याने कधी आत्मचरित्रे वाचली
ना त्याने कधी व्याख्यान ऐकले
ना त्याने कधी संगीतावर भाष्य केले
ना त्याने कधी चित्रशिल्प बघितले ना
त्याने निसर्गाला कधी गुरु म्हंटले
ना त्याने कधी गाणे म्हंटले म्हटल्या
त्या फक्त आरत्या
या देवाचे कर त्या देवाचे कर मुलगी
झाली देवाची कृपा
मुलगा झाला देवाची कृपा
शाळेत प्रवेश मिळाला
ही तर देवाची कृपा...
आरत्या ओवाळल्या आरत्यामधला
अर्थ ?
अर्थ काढणे म्हणजे पाप... श्यामराव
आरत्या ऐकत मोठा झाला
श्यामराव आरत्या ऐकत एक दिवस
मेला....



**विजयराज बोधनकर**

९९२०४११८२८

**परिचय**

भारतातल्या मोठ्या शहरातून आणि लंडन व शिकागो येथे चित्रप्रदर्शन संपन्न झालीत, साहित्याची आवड असल्यामुळे लेखन वाचन करीत असताना पाच पुस्तके प्रकाशित झाली..हॅश टॅग कविता हा कवितांचा कार्यक्रम सादर करतात.


**दिवाळी अंक सहभाग -**

दीपलक्ष्मी, स्वबोध, आश्लेषा, मुंबई सकाळ..या दिवाळी अंकात लेख.



# ‘लोकांना चित्रपट आपला वाटायला हवा’

## क्षिती जोग



गणेश आचवल

**क्षिती अभिनयाचे संस्कार तुझ्यावर घरातूनच झाले , त्याविषयी सांग.**

**क्षिती -** अभिनयाच्या क्षेत्रात असलेली माझी आमच्या घरातील ही तिसरी पिढी आहे. आई बाबांच्या रूपाने मला माझ्या घरातच माझ्या कामाबद्दल प्रतिक्रिया देणारे खरे टीकाकार मिळाले. मुळात आई आणि बाबा दोघेही या क्षेत्रात असल्याने या क्षेत्रातील चढ उतार, यश अपयश, या क्षेत्रातील अनिश्चितता या सर्व गोष्टी मला माहित होत्या. कधी तुमच्याकडे खूप काम असेल, तर कधी कित्येक महिने कामही नसेल. अशा वेळी आपण सकारात्मक विचार करणं, निराश न होणं या गोष्टी सुद्धा मला समजत गेल्या. सर्वात महत्वाचं म्हणजे तुम्ही कितीही यशस्वी झालात, तरी डोक्यात हवा न जाऊ देणं, आपले पाय जमिनीवरच राहणं या गोष्टी सुद्धा या क्षेत्रात काम करताना महत्वाच्या आहेत.

**रुईया कॉलेजचा तुझ्या जीवनात खूप महत्वाचा वाटा आहे ना ?**

**क्षिती -** अर्थातच ! मी नेहमी सांगते की आज जी काही मी आहे ती रुईया कॉलेजमधील नाट्यवलय सारखी अतिशय महत्वाची संस्था आणि त्या संस्थेतुन काम करताना माझ्यावर झालेले अभिनयाचे संस्कार हा माझ्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा आहे. रुईया मध्ये असताना एकांकिका स्पर्धा केल्या, बक्षिसे मिळाली. ‘सादिया’ नावाचं एक इंग्रजी नाटक देखील केलं. मग मी इंग्रजी थिएटर देखील केलं. ऍलेक पदमसी यांच्या बरोबर देखील इंग्रजी नाटकात काम केलं. मला आठवतंय माझी पहिली मालिका मुंबई दूरदर्शनवरील ‘दामिनी’. तिथे ऑडिशनला गेल्यानंतर रोहिणी निनावे मला म्हणाल्या की तुला मी एकांकिकेत पाहिलं आहे. म्हणजे बघा, कॉलेजमधील एकांकिकांमुळे आपण मान्यवर व्यक्तींपर्यंत पोचत असतो आणि आपल्या कामाची दखल



घेतली जात असते. रुईया मुळे या क्षेत्रात काम करताना जो प्रोफेशनॅलिझम लागतो, जी शिस्त लागते,आपल्या कामाबद्दलचं जे प्रेम लागतं, त्या सर्व गोष्टी रुईयामुळे मिळाल्या आहेत.

**दामिनी मालिकेविषयी जाणून घ्यायला आवडेल .**

दामिनी मालिकेत भूमिका मिळाली, तेव्हा मी बारावीमध्ये होते. तेव्हा दूरदर्शन हे प्रमुख माध्यम होतं. आताप्रमाणे खाजगी वाहिन्या नव्हत्या. दामिनी मुळे मी घराघरात पोचले. लोक माझा ऑटोग्राफ घेऊ लागले, या मालिकेतील माझ्या भूमिकेचं खूप कौतुक झालं. तो दूरदर्शनचा काळ मी अनुभवला आहे. प्रेक्षक नाट्यप्रयोगानंतर भेटायला येत होते. माझ्या नाटकाप्रमाणेच मालिकेतील कामाबद्दल प्रतिक्रिया देत आणि मग माझी स्वाक्षरी घेत. तेव्हा मोबाईलमध्ये कॅमेरा नसायचा.

**टीव्ही या माध्यमाबद्दल तुझे मत काय ?**



जेव्हा खाजगी वाहिन्या सुरु झाल्या, तेव्हा त्यावर डेली सोप्स अर्थात दैनंदिन मालिका सुद्धा सुरु झाल्या. टीव्ही या माध्यमात खूप ताकद आहे. तुम्ही थेट घराघरात पोचता आणि ते सुद्धा तुम्ही रोज प्रेक्षकांना दिसत असता. तुमच्या चेहऱ्याला ओळख मिळते. वादळवाट मधील मी साकारलेली 'आळंदी छत्रे' ही व्यक्तिरेखा खूप गाजली. टीव्ही हे माध्यम जर योग्य प्रकारे वापरले तर समाज प्रबोधन आणि मनोरंजन यांचा उत्तम मेळ घातला जाऊ शकतो. मी हिंदी मालिका देखील केल्या. त्यात 'घर की लक्ष्मी बेटीया' मध्ये मी साकारलेल्या 'सरस्वती' या भूमिकेने मला ओळखले जाऊ लागले. आजही 'सरस्वती' या माझ्या भूमिकेचा लोक आवर्जून उल्लेखकरतात.

**हेमंत ढोमे आणि तुझी भेट कधी झाली ?**

मी हेमंतने काम केलेलं 'नवा गडी नवं राज्य' हे नाटक पाहिलं होतं . पुढे 'सावधान शुभमंगल' या नाटकात आम्ही एकत्र काम केलं होतं . त्या नाटकात सुहास जोशी, राजन भिसे, स्वाती चिटणीस, मी आणि हेमंत आमच्या भूमिका होत्या. त्या नाटकामुळे आमची मैत्री झाली, मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. आम्ही लग्नाचा निर्णय घेतला. 'सावधान शुभमंगल' नाटकामुळे आमचे सुद्धा 'शुभमंगल ' झालं.

**आपण निर्माती व्हावं, असं कधी वाटलं ?**

हेमंत आणि मी आम्हा दोघांची इच्छा होती की आपली स्वतःची निर्मिती संस्था असावी . पण ही कल्पना एवढ्या लवकर प्रत्यक्षात येईल असे वाटले नव्हते. ज्यावेळी झिम्मा चा विचार आला, त्यावेळी सात बायका परदेशी ट्रीपला जातात, अशी एक लाईन होती, पण हा विषय आणि आपलं म्हणणं लोकांपर्यंत आपल्याला जसे मांडायचे आहे, तसे पोचवायचे असेल तर आपणही निर्मिती करावी आणि 'झिम्मा'च्या निमित्ताने हे निर्माती होण्याचे स्वप्न सत्यात अवतरले. एक प्रेक्षक म्हणून आनंदी चित्रपट बघायला लोकांना आवडतात, हे माझे मत आहे. त्यामुळे निर्माती होताना एक गोष्ट ठरवली की आपण आपल्या निर्मिती संस्थेद्वारे आनंदी चित्रपटांची निर्मिती करायची. लोकांना चित्रपट बघून एक विचार मिळाला पाहिजे. काहीतरी सकारात्मक विचार,आशावाद कथेतून यायला हवा, हा विचार हवा. त्यामुळे झिम्मा निर्माण करताना हा सिनेमा 'आपला' हवा, हा विचार होता आणि हे एक टीमवर्क आहे, फक्त माझ्या किंवा हेमंतच्या एकट्याचे काम नाही. आमचे सर्व युनिट हे आमचे कुटुंब आहे .

**'तुमची मुलगी काय करते' ,या मालिकेत एक छोटीशी पण लक्षात राहणारी भूमिका तू केली होतीस ,त्याबद्दल सांग.**

चिन्मय मांडलेकर माझा चांगला मित्र आहे . त्याने सोनी मराठीकरिता 'तुमची मुलगी काय करते' ही मालिका लिहिली होती. त्यात एका पोलीस अधिकारी महिलेच्या भूमिकेसाठी त्याने मला विचारलं आणि मुख्य म्हणजे ही भूमिका



काही भागांपुरती होती. ती भूमिका उत्तम लिहिली होती. माझ्या नेहमीच्या भूमिकांपेक्षा वेगळी होती. मनवा नाईक ही माझी मैत्रीणच त्या मालिकेची निर्माती होती, त्यामुळे अजून एक कम्फर्ट झोन तयार झाला. या मालिकेतील माझ्या कामाचं खूप कौतुक झालं.

**आगामी वर्षात काय प्रोजेक्ट्स येतील ?**

मिसमॅच नावाच्या वेब सिरीजचा नवीन सिझन येतोय. तसेच आमच्या निर्मिती संस्थेद्वारे नवीन मराठी चित्रपटाचे काम लवकरच सुरु होईल .


**गणेश आचवल**

आकाशवाणीच्या एफएम रेनबो वाहिनीवर गेली २५ वर्षे रेडिओ जॉकी म्हणून कार्यरत मुक्त पत्रकार आणि प्राध्यापक सिने पत्रकारितेचा 30 वर्षांचा अनुभव अखिल भारतीय नाट्य परिषदेचा स्वराभिनय गौरव पुरस्कार विजेता